पुणे, रविवार, १६ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 108 • वर्ष ४ थे, अंक १०८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



नित्य आठवू शिवरायांना
P५



रहाणे इतिहास घडवणार?
१२

# गौप्यस्फोटांची धुळवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एकनाथ शिंदे , अजित पवार यांना मुख्यमंत्री करू अशी ऑफर देत राजकीय रंग उधळणाऱ्या नाना पटोले यांच्या रंगपंचमीत आज संजय राऊत यांनी काही काही गौप्य स्फोट करत धुळवड साजरी केली. तर त्या पाठोपाठ मंत्री संजय शिरसाठ यांनी उद्धव ठाकरे यांना बगल देत संजय राऊत हे स्वतःच मुख्यमंत्री होण्यासाठी इच्छुक होते यामुळे ठाकरे यांनी लंडनचा उपचार देखील बाजूला ठेवला असा गौप्यस्फोट करत या धुळवडीमध्ये आणखीन भर घातली.

भाजपासोबत महायुतीचे सरकार स्थापन होण्यापूर्वी एकनाथ शिंदे हे शिवसेनेशी काडीमोड घेत काँग्रेस सोबत जाणार होते असे संजय राऊत यांनी सांगितले. याबाबत तुम्ही पृथ्वीराज चव्हाण यांना विचारा त्यांच्यासोबत दिल्लीमध्ये पहाटेच बैठक झाली होती असाही खुलासा त्यांनी केला. यावेळी त्यांनी दिवंगत झालेल्या एका ज्येष्ठ काँग्रेसने त्याचे देखील नाव घेतले तथापि ते आता हयात नसल्यामुळे त्यांचा दाखला देत नाही. परंतु पृथ्वीराज चव्हाण हे याबाबत माहिती देऊ शकतात असे राऊत म्हणाले.



## लाडक्या बहिणीमुळे आदिवासी खात्याला कडकी

● ना . संजय शिरटस त्यांनी अर्थसंकल्पामध्ये आदिवासी विभागाच्या निधीला कात्री लावण्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली लाडक्या बहिणीचे लाड करण्याच्या नादामध्ये कधीही कपात न करण्यात येणारा आदिवासी खात्याचा निधी कपात करण्यात आला आहे हा या समुदायावर अन्याय आहे यापूर्वी कधीही असे घडले नाही याबाबत मी मुख्यमंत्री यांची स्वतः भेट घेणार असल्याची त्यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसची हात मिळवणे जवळपास केलीच होती परंतु काही हिशोब राहिल्यामुळे ते जमले नाही आणि मग त्यांनी गद्दारीचा धडा गिरवत भाजपासोबत हात मिळवणी केली असे ते म्हणाले.

संजय राऊत यांच्या या विधानानंतर नामदार संजय शिरसाट यांनी त्यांच्यावर मुख्यमंत्री होण्यासाठी खेळत असल्याचा आरोप केला. उद्धव ठाकरे यांना संजय राऊत हे शिव्या देतात. त्यांचा पाठीमागे एकेरी उल्लेख करतात किंबहुना सत्ता स्थापनेच्या घडामोडीमध्ये उद्धव ठाकरे यांना बाजूला ठेवून आपले स्वतःचे नाव मुख्यमंत्री पदासाठी पुढे यावे यासाठी ते प्रयत्नशील होते. याची कुणकुण उद्धव ठाकरे यांना लागल्यानंतर त्यांनी जातीने सर्व बैठका घेतल्या आणि प्रत्येक घडामोडी मध्ये ते स्वतः सहभागी झाले असा गौप्यस्फोट त्यांनी केला.

शिरसाट म्हणाले की संजय राऊत हे अत्यंत हीन पातळीवर ठाकरे यांच्याबद्दल बोलत असतात त्यांना प्रशासनातील अनुभव नाही त्याला मुख्यमंत्रीपदातलं काय कळतं त्यापेक्षा आपले नाव प्रोजेक्ट करा असे ते सहयोगी पक्षांच्या प्रमुखांना देखील सांगत होते असा गौप्यस्फोट त्यांनी यावेळी केला.

## युवा आक्रोश पदयात्रा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांनी पायात साखळ दंड आणि हातात बेडी घालून युवा आक्रोश पदयात्रा मध्ये सहभाग घेतला. पोलिसांनी जंगली महाराज रोडवर आंदोलन करताना त्यांना अटक केली. हा मोर्चा १९ तारखेला विधानसभेला घेराव घालणार आहे.

## At a Glance

### दहावी-बारावीचा निकाल १५ मेपूर्वी

**मुंबई :** इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची ११ फेब्रुवारीपासून तर दहावीच्या विद्यार्थ्यांची २१ फेब्रुवारीपासून परीक्षा सुरू आहेत. परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस अगोदर सुरू झाल्याने निकाल देखील १५ मेपूर्वीच जाहीर केला जाणार आहे. त्याअनुषंगाने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळांकडून तपासलेल्या उत्तरपत्रिकांचा दररोज बोर्डाचे अधिकारी आढावा घेत आहेत.

### दूध दरात दोन रुपयांनी वाढ

**पुणे :** लोकसभा आणि विधानसभा निवडणूक झाल्यानंतर महागाई कमी होईल, याकडं सर्वसामान्य जनता आस लावून बसली होती. मात्र, महागाई कमी होण्याऐवजी ती झपाट्यानं वाढतच असल्याचं दिसून येतय. त्यामुळं महागाईची झळ सर्वसामान्य लोकांना बसतोय. अशातच आता सर्वसामान्यांच्या दैनंदिन आयुष्यातील एक अविभाज्य घटक असलेल्या दुधाच्या किंमतीत 2 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. पुण्यात झालेल्या या बैठकीत शेतकऱ्यांच्या » पान ४ वर

### पंजाबमधील शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याची हत्या;

**पंजाब :** पंजाबमधील शिवसेना शिंदे गटाचे नेते मंगत राय मंगा यांची मोगा येथे गोळ्या झाडून हत्या केली. मंगत राय हे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख होते. याप्रकरणी पोलिसांनी शनिवारी ३ जणांना अटक केली आहे. शुक्रवारी रात्री मोगा येथील गिल पॅलेसजवळ त्यांच्यावर गोळीबार झाला होता. हल्लेखोरांकडून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. अरुण उर्फ दीपू, अरुण उर्फ सिंघा आणि राजवीर उर्फ लड्डो, अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. » पान ४ वर

### सोन्याची उच्चांकी उडी : ९० हजार पार

**जळगाव :** या आठवड्यात सोने आणि चांदीने महागाईचा उच्चांक मोडला. जानेवारीपासून ते मार्चपर्यंत दोन्ही धातुंनी मोठा पल्ला गाठला. दोन्ही धातुंनी या तीन दिवसात नवीन रेकॉर्ड नावावर नोंदवला आहे.

जळगावमध्ये सोन्याचे दर ९० हजारांच्या पार पोहचले आहे. सोने जीएसटीसह ९० हजार ६०० रुपयांवर पोहचले आहे. तर चांदी देखील एक लाखांच्या पार गेली आहे. जळगावच्या सुवर्ण बाजारात सोन्याचे दर विक्रमी पातळीवर पोहोचले आहेत.

## स्वदेशी बनावटीच्या एअर-टू-एअर क्षेपणास्त्राची चाचणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** भारताने स्वदेशी शस्त्र प्रणाली विकसित करण्याच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल टाकत, 'अस्त्र' या बियॉन्ड व्हिज्युअल रेंज एअर-टू-एअर मिसाईलचे यशस्वी चाचणी प्रक्षेपण केले आहे. ही चाचणी ओडिशाच्या किनारपट्टीवर 'एलसीए तेजस एएफ एमके 1' प्रोटोटाईप लढाऊ विमानावरून करण्यात आली. संरक्षण दलातील सूत्रांच्या मते, एरॉनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीने चांदीपूर किनाऱ्यावरून हे चाचणी प्रक्षेपण पूर्ण केले. चाचणीमध्ये क्षेपणास्त्राने एका हलत्या लक्ष्याचा अचूक वेध घेतला. या चाचणीमध्ये 'अस्त्र'च्या सर्व उपप्रणालींनी अचूक कार्य केले आणि मिशनची सर्व उद्दिष्टे » पान ४ वर

# 'कबरी'साठी 'बाबरी'ची धमकी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** औरंगजेबाची कबर आमच्या गुलामगिरीची, लाचारीची, आणि अत्याचारांची आठवण करून देते. महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर ही कबर काढावी. अन्यथा, बजरंग दल स्वभिमानी हिंदू समाजाला घेऊन रस्त्यावर उतरेल, आंदोलन करेल, मोर्चे काढेल, आणि आवश्यकता भासल्यास चक्का जाम करून कारसेवा करून ती कबर उध्वस्त करेल. बाबरी हटवासाठी जसे आंदोलन पेटविले त्याच धर्तीवर हे आंदोलन छेडले जाईल असा इशारा आज देण्यात आला.

क्रूरकर्मा औरंग्याची कबर हटाव आंदोलन पूर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी सर्व तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर होणार आहे. तसेच पुण्यात सोमवार, दिनांक १७ रोजी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी ११.३० वाजता आंदोलन करून मुख्यमंत्री यांच्या नावे निवेदन देणार आहेत, अशी माहिती विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्यावतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावेळी विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दलाचे प्रांत संयोजक नितीन महाजन, आणि प्रांत सह संयोजक संदेश भेगडे, श्रीपाद रामदासी उपस्थित होते.

किशोर चव्हाण » पान ४ वर

## न्यायालयाच्या अजब निर्णयावर संतापाची लाट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक पुन्हा घेण्याची वेळ येईल आणि जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण नाशिक सत्र न्यायालयाने नोंदवले आहे. नाशिक न्यायालयाच्या निरीक्षणानंतर शिवसेना ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाला आहे. राज्यातील सर्व लाडक्या बहिणींचा एक हप्ता देऊ नका. पण कृषीमंत्री माणिकराव कोकाटे » पान ४ वर

## जगातील 'मोस्ट वॉन्टेड' अबू खाफिजा ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इराण :** इराकी गुप्तचर सेवा आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आघाडीने इराक आणि सीरियातील इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेच्या प्रमुखाला ठार केल्याची माहिती इराकी लष्कराने दिली आहे. इराकचे पंतप्रधान मोहम्मद शिया अल-सुदानी यांनी ट्विटरवर दावा केला आहे की, अब्दुल्ला माकी मुसलेह अल-रिफाई उर्फ अबू खदीजा मारला गेला आहे.

इराक आणि सीरियातील इस्लामिक स्टेट (ISIS) या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या अब्दुल्ला माकी मुसलेह अल-रिफाई ऊर्फ अबू खदीजा ठार झाला आहे. अबू खदीजा हा इराक आणि जगातील सर्वात धोकादायक दहशतवाद्यांपैकी एक मानला जातो.



या दहशतवाद्याचा खात्मा करण्याच्या महत्त्वाच्या सुरक्षा यशाबद्दल आम्ही इराकी जनतेचे आणि सर्व शांतताप्रिय लोकांचे अभिनंदन करतो, असं इराकच्या पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

इराकच्या पंतप्रधानांनी शुक्रवारी ट्विटरवरून ही माहिती दिली. इराकचे पंतप्रधान मोहम्मद शिया अल-सुदानी यांनी » पान ४ वर

## बेशिस्त अन् तळीरामांवर मोठी कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** होळी धुळवडीच्या निमित्ताने झिंगलेल्या आणि बेशिस्त वाहन चालक असलेल्या पुणेकरांकडून पोलिसांनी एकाच दिवसात तब्बल 50 लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. गुन्हेगारीचं प्रमाण पुण्यात चांगलंच वाढलं आहे. काल धुलीवंदनच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर वाहतूक शाखेकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. पुणे शहर वाहतूक शाखेकडून होळी आणि धुलीवंदन साजरा करताना पुणेकरांनी सुरक्षा तथा शांतता अबाधित राखण्याच्या उद्देशाने केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे शहरात ३७ वाहतूक विभाग आणि संबंधित » पान ४ वर

## इंद्रायणीचे पाणी दूषितच

### जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केले मनाईचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात नुकताच गुलेन बॅरे सिन्ड्रोमने पुणेकरांच्या तोंडचे पाणी पळवले होते. दूषित पाणी हे या आजाराचे मुख्य कारण असल्याचे समोर आले होते. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी इंद्रायणी नदीचे पाणी पिण्यास मनाई करणारा आदेश जारी केला आहे. श्री क्षेत्र देहू येथे १४ ते १६ मार्च २०२५ या दोन तुकाराम बीज सोहळा पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश दिल्याचे समजते.

श्री क्षेत्र देहू येथील इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरावरील पाणी पिण्याकरीता व स्वयंपाकाकरीता उपयोगात आणण्यास सक्त मनाई



करण्यात येत आहे. तथापि, ते पाणी भांडी घासणे वा तत्सम अन्य कारणासाठी वापरता येईल. तसेच देहूतील ठिकठिकाणी असलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या नळाचे पाणी पिण्यासाठी वापरावे.

इंद्रायणी नदीच्या पात्रात कोणतेही कपडे धुवू नयेत, अगर कोणत्याही प्रकारे नदीचे पाणी दूषित होईल असे कृत्य करु नये. सदर दूषित पाणी पिल्याने लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम १३१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी आदेश नमूद केले आहे.





## संजय गांधी निराधार योजना मंजुरी पत्रक वाटप

**पुणे :** पुरोगामी चळवळीतील तसेच काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय हाजीभाई नदाफ यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग तथा भवानी ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या वतीने विभागातील संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या मंजूर पत्रांचे वाटप अंध, अपंग विधवा,निराधार,पवित्रत्या व ज्येष्ठ नागरिकांना महिला, भगिनींना वितरित करण्यात आले यावेळी सामाजिक कार्यकर्त्या पुष्पायादव व हाजी नदाफ यांनी सदर मंजुरी पत्रांचे वाटप केले तसेच वाढदिवसानिमित्त लाभार्थ्यांच्या वतीने हाजी भाई नदाफ यांचा सत्कार करण्यात आला यावेळी काँग्रेस पक्षाचे संतोष हंगर्गी संदीप कांबळे ईश्वर गायकवाड ,नरेश रामोशी, अभिषेक यादव, करण कांबळे, बाबू भंडारी इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अनुसूचित विभागाचे अध्यक्ष तथा संजय गांधी निराधार योजनेचे माजी चेअरमन व ब्लॉक काँग्रेस कमिटी भवानी चे अध्यक्ष सुजित यादव यांनी केले होते.



## लिंगायत महिला मंचतर्फे सशक्तीकरण शिबीर

**पुणे :** लिंगायत महिला मंचाच्या वतीने महिलांमधील सुप्त गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन आपटे रस्त्याजवळील सेंट्रल पार्क येथे करण्यात आले होते. महिलांच्या सशक्तीकरणासाठी तसेच त्यांच्या कौशल्यांना वाव देणारे विविध कार्यक्रम यावेळी घेण्यात आले.

महिलांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, ताणतणाव व्यवस्थापन आणि फिटनेस यासंदर्भात तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित महिलांना आपल्या दैनंदिन जीवनात आरोग्याला प्राधान्य देण्याची गरज आणि योग्य आहार, व्यायाम व मानसिक स्वास्थ्याची महत्वाची माहिती देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी उपक्रमासाठी सुप्रिया हत्ते, सुप्रिया गाडवे, नीना लिगाडे, राजश्री हापसे, सीमा तोडकर आणि सोनाली कोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.महिलांसाठी रुद्रपठण स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धांचे परीक्षण रूपा सुत्तट्टी आणि पल्लवी शिवकुमारश्री यांनी केले.



## भारती विद्यापीठात माजी विद्यार्थिनींचा सत्कार

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या, पूना कॉलेज ऑफ फार्मसी(एरंडवणे) तर्फे जागतिक महिलादिनानिमित माजी विद्यार्थिनींचा सत्कार पार पडला. या कार्यक्रमासाठी मदर अँड चाईल्ड हेल्थ केअर,ईर्षा संशोधन संस्था(भारती विद्यापीठ) च्या विभाग प्रमुख डॉ.साधना जोशी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.या कार्यक्रमात पूना कॉलेज ऑफ फार्मसीच्या १९८६ मधील माजी विद्यार्थीनी आणि विनसीया लाईफ सायन्सेस(पुणे ) च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा जोशी तसेच १९९१ मधील माजी विद्यार्थिनी आणि क्लिनीकल ट्रायल्स डेटा अँड ॲनालिटीकल्स्, (मुंबई )च्या सल्लागार इंद्राणी काकडे यांना औद्योगिक क्षेत्रातील उत्तम योगदान व कार्यासाठी गौरविण्यात आले.

डॉ. साधना जोशी यांनी विद्यार्थीनींना भारत सरकारद्वारे देण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक शिष्यवृत्तीबद्दल मार्गदर्शन केले.या वेळी पूना कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.आत्माराम पवार, उपप्राचार्य व भारती पीसीपी सखी महिला सशक्तीकरण विभागाच्या प्रमुख डॉ. वर्षा पोखरकर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संयोजन डॉ.मुग्धा सुर्यवंशी यांनी केले.

# अखेर 'जाळयात'...!




**पुणे** शिवाजीनगर भागातील मंगला चित्रपटगृहासमोर टोळीयुद्धातून तरुणाचा खून करुन पसार झालेल्या दोन वर्षानंतर अटक करण्यात आली. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केल्यानंतर आरोपीने पोलिसांना गुंगारा दिला होता.

## टोळीयुद्धातून खून; दोन वर्षानंतर जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवाजीनगर भागातील मंगला चित्रपटगृहासमोर टोळीयुद्धातून तरुणाचा खून करुन पसार झालेल्या दोन वर्षानंतर अटक करण्यात आली. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केल्यानंतर आरोपीने पोलिसांना गुंगारा दिला होता. त्याच्याकडून दोन पिस्तुले आणि चार काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.


पंडीत अण्णा कांबळे (वय २९, रा. ताडीवाला रस्ता, पुणे स्टेशन) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. अल्पवयीन असताना कांबळे याने एका तरुणाचा खून केला होता. यापूर्वी पिस्तूल विक्री प्रकरणातही त्याला अटक करण्यात आली होती, अशी माहिती परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिली. कांबळे आणि साथीदारांनी टोळीयुद्धातून मंगला चित्रपटगृहासमोर १५ ऑगस्ट २०१३ रोजी नितीन मोहन म्हस्के (वय ३५, रा. ताडीवाला रस्ता) याच्यावर कोयत्याने वार करून निर्घृण खून केला. या गुन्ह्यात शिवाजीनगर पोलिसांनी १७ आरोपींना अटक केली होती. याप्रकरणी पोलिसांनी 'मकोका' कारवाई केली. कारवाई केल्यानंतर तो पसार झाला होता. गेले दोन वर्ष पोलीस त्याच्या मागावर होते.

# प्रशासनाचा नागरिकांच्या 'जीवाशी खेळ'..!

### जीबीएस' आटोक्यात; टाक्यांच्या स्वछतेसाठी पालिका बिनधास्त

जीबीएसचा खेळ खल्लास झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने नेहमीप्रमाणे नागरिकांशी ' जीवघेणा खेळ' सुरु केला आहे; या रोगाचा काही प्रमाणात नायनाट झाल्याचे संकेत मिळताच प्रशासनाने टाक्यांच्या स्वच्छतेचा गाशा गुंडाळण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत प्रशासनाने ' कासवगतीने' अवघ्या ५२ टाक्यांची स्वच्छता केली आहे; उर्वरीत टाक्यांच्या स्वच्छतेसाठी प्रशासनाने धीम्या गतीची भूमिका घेतली आहे. प्रशासनाचा हाच खेळ नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही, परंतु याची जाणीव असतानाही प्रशासनाची हीच भूमिका आगामी काळात त्यांचीच डोकेदुखी ठरणार आहे. त्यामुळे प्रशासनाने त्यावर आताच ठोस भूमिका घेण्याची आवश्यकता असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'गुइलेन बॅरे सिंड्रोम'चे (जीबीएस) रुग्ण आढळल्यानंतर महापालिकेच्या पाण्याच्या सर्व टाक्यांची स्वच्छता करण्याची घोषणा महापालिकेने करूनही, आतापर्यंत १४४ पैकी ५२ टाक्यांचीच स्वच्छता करण्यात पाणीपुरवठा विभागाला यश आले आहे. उर्वरित टाक्यांची स्वच्छता लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.शहरात दोन महिन्यांपूर्वी जीबीएस आजाराचे रुग्ण सापडण्यास सुरुवात झाली.

सिंहगड रस्त्यावरील खडकवासला, नांदेड, धायरी, किरकिटवाडी आणि आजूबाजूच्या परिसरात या आजाराच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असल्याचे स्पष्ट झाले होते. या भागातील नागरिकांना मिळणारे पाणी दूषित असल्याने या आजाराच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता.

नागरिकांना दिले जाणारे पाणी शुद्ध असावे, यासाठी महापालिकेने क्लोरिनची मात्रा वाढविली. तसेच पाणी दूषित होऊ नये, त्यामध्ये कचरा पडू नये, यासाठी ज्या विहिरीतून पाणी दिले जाते त्यावर लोखंडी जाळीदेखील बसविण्यात आली. किरकिटवाडी, खडकवासला, नांदेड, नांदोशी, धायरी यासह आजूबाजूच्या परिसरात जीबीएस रुग्णांची संख्या वाढत होती. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या भागातील काही मलवाहिन्यांची कामे देखील करून घेतली आहेत. वाढत्या जीबीएस रुग्णांची संख्या लक्षात घेता महापालिकेने पाणीपुरवठा विभागाच्या शहरातील पाण्याच्या टाक्या खबरदारीचा उपाय म्हणून स्वच्छ करण्याचा निर्णय घेतला. महापालिकेच्या शहरात १४४ पाण्याच्या टाक्या आहेत. यामध्ये काही टाक्या भूमिगत असून, काही जमिनीवर आहेत. एकूण टाक्यांपैकी आतापर्यंत ५२ टाक्यांची स्वच्छता केली आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

'जीबीएसचा प्रादुर्भाव पाण्यातील जीवाणूंमुळे होतो. शहरातील इतर भागांमध्ये हा आजार पसरू नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे काम महापालिका प्रशासनाच्या वतीने केले जात आहे. सिंहगड रस्ता परिसरात असलेल्या २४ टाक्यांची स्वच्छता आतापर्यंत पूर्ण झाली आहे. या भागात जीबीएसचा प्रादुर्भाव अधिक आढळल्याने या भागातील पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्यास प्राधान्य देण्यात आले.

**अशी केली जातेय टाळाटाळ**

- स्वच्छतेसाठी योग्य व्यवस्थापनाचा अभाव
- पुरेशी काळजी घेण्यास प्रशासन असमर्थ
- स्वछतेसाठी ठेवावा लागतोय पाणीपुरवठा बंद
- पालिका देतेय वेळेचे कारण

# मिळकतकर वसूलीची दोरी आता 'ती'च्या हाती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महापालिकेच्या मिळतकराचे चालू आर्थिक वर्षाचे उत्पन्नाचे उद्दिष्ट २ हजार ७०० कोटी इतके आहे. मात्र, आता आर्थिक वर्ष संपण्यास अवघे पंधरा दिवस शिल्लक असतानाच आत्तापर्यंत २ हजार १६५ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे उद्दिष्टे गाठण्यासाठी मिळकतकर विभागाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यात आता पहिल्यांदाच महिला कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली आहेत. महापालिकेच्या मिळकतकर वसुलीसाठी आता मिळकतकर विभागाने थेट महिला कर्मचाऱ्यांनाच मैदानात उतरविले आहे. करवसुलीसाठी १२ दामिनी पथके तयार करण्यात आले असून, या पथकांनी दोनच दिवसांत 10 लाखांचा थकीत कर वसूल करत तीन मिळकती जप्त करण्याचे काम केले आहे.

ही दामिनी पथके थकीत मिळकतकरांच्या घरी जाऊन कर वसूल करण्याचे काम करत आहेत. एका दामिनी पथकात ५ महिला कर्मचाऱ्यांचा समावेश असून, अशी १२ पथके तयार करण्यात आल्याची माहिती मिळकतकर विभागाचे प्रमुख उपायुक्त माधव जगताप यांनी दिली.

या दमिनी पथकांनी पहिल्या दोन दिवसांत 10 लाखांचा थकीत कर वसूल केला आहे. त्याचबरोबर तीन मिळकती जप्त करण्याचे कामही केले आहे. धायरी येथे प्रत्यक्ष मिळकतकरधारकांच्या घरी जाऊन ही वसुली केली. सहायक आयुक्त अस्मिता तांबे, प्रशासन अधिकारी रवींद्र धावरे, सोपान वांजळे, रजनी शिंदे यांच्या मागदर्शनाखाली मध्यवर्ती दामिनी वसुली पथकाने ही वसुली केली आहे.

> मिळतकराचे चालू वर्षातील उद्दिष्ट २हजार ७०० कोटी इतके आहे. चालू वर्षखेरीपर्यंत अजून चारशे कोटींचा कर वसूल होईल. गतवर्षीच्या उत्पन्नाचा टप्पा निश्चितपणे पार केला जाईल.
>
> — **माधव जगताप,** उपायुक्त पुणे मनपा

# यश मिळेपर्यंत प्रयत्न करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयुष्य प्रचंड आव्हानात्मक आहे. मात्र आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटाला 'ऑल इज वेल' म्हणत विद्यार्थ्यांनी धीराने तोंड द्यायला हवं. यासह, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र ओळखून त्यात करिअर करायला हवं. आवडीचे क्षेत्र ठरल्यानंतर परिणामाची चिंता न करता 'नेवर गिव अप' वृत्ती स्विकारुन यश मिळेपर्यंत प्रयत्न सोडू नका आणि यश प्राप्तीनंतर त्यात झोकून देऊन आपले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करा , असे आवाहन प्रसिद्ध सिनेअभिनेते शरमन जोशी यांनी मांडले.

ते एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या सातव्या 'पर्सोना फेस्ट-२५' या वर्षातील सर्वांत मोठ्या कला महोत्सवाच्या समारोपात बोलत होते. याप्रसंगी, शरमन यांच्या पत्नी प्रेरणा चोप्रा-जोशी, 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र. कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ.सुदर्शन सानप, डॉ.विपुल दलाल, डॉ. रेणू व्यास, डॉ. सुराज भोयार आदी उपस्थित होते.

प्रा.डॉ.कराड म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना २००९ साली अमीर खान व शरमन जोशी यांचा सहभाग असणारा, 'थ्री इडियट्स' हा अतिशय सुंदर सिनेमा पाहण्यात आला. त्या सिनेमात देण्यात आलेल्या संदेशा प्रमाणे विद्यार्थ्यांना कला, डिजाईन आणि तंत्रज्ञान यांचा संगम असणारे व त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याचे शिक्षण देणारे एखादे विद्यापीठ असावे, अशा विचाराने एमआयटी एडीटी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

प्रास्ताविक डॉ.सुराज भोयार यांनी तर आभार, डॉ.सुदर्शन सानप यांनी मानले.




**पुणे** पर्सोना महोत्सवाच्या समारोप प्रसंगी, विद्यापीठात वर्षभरात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा 'बेस्ट पर्सोना ऑफ द इअर' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यामध्ये तन्वी बोगाडे, अनुष्का जोशी, शिवनेश मोरे, मृण्मयी गोडमाने, सौरेश जबे, तेजस डोंगरे, अक्षत वशीष्ठ, धीर जैन, ओंकार शिंदे, अमोघा पाठक, राहुल देवगावकर, कॅडेट हरमनदीप कौर, आर्या पाटणकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

# "रंग बरसे भीगे चुनरवाली...रंग बरसे"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रंगांचा सण होळी यंदा अग्रवाल समाज फेडरेशनतर्फे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रामवाडी कपिल नगरचा संपूर्ण परिसर या रंगारंग उत्सवामुळे आनंदाने उजळून निघाला. अग्रवाल समाज फेडरेशनच्या महिला समिती आणि युवा विंगच्या वतीने आयोजित या भव्य सोहळ्यात पुणे शहर आणि जिल्ह्यातून सुमारे २००० हून अधिक समाजबांधव, महिला, तरुण-तरुणी आणि लहान मुले सहभागी झाली. सर्वांनी एकमेकांना प्रेम आणि ऐक्याच्या रंगांनी रंगवले. डीजे आणि ढोल-नगाऱ्यांच्या तालावर नाचत पारंपरिक नृत्याचा आनंद घेतला.



कार्यक्रम अधिक आकर्षक करण्यासाठी राधा-कृष्णांच्या सजीव झांकीचे भव्य सादरीकरण करण्यात आले. कलाकारांनी द्वापर युगातील मथुरा-वृंदावनमधील होळीचे जिवंत चित्रण केले. जसेच राधा-कृष्णांच्या वेशभूषेत साजरा झालेल्या कलाकारांनी गुलाल उधळले, तसेच संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

ढोल-डीजेच्या तालावर रंगांचा जल्लोष

"रंग बरसे भीगे चुनरवाली..." आणि "होळी खेले रघुवीरा..." या गाण्यांच्या तालावर उपस्थितांनी मनसोक्त नृत्य केले. ढोल-नगाऱ्यांच्या गजरात आणि गुलालाच्या वर्षावात संपूर्ण वातावरण आनंदाने भारावून गेले. समाजातील सर्व वयोगटांतील लोकांनी एकत्र येऊन या रंगोत्सवाचा मनमुराद आनंद घेतला.

या भव्य सोहळ्यात अग्रवाल समाज फेडरेशनचे अध्यक्ष कृष्ण कुमार गोयल, उपाध्यक्ष विनोद शिवनारायण बंसल, सेक्रेटरी सीए के. एल. बंसल, कोषाध्यक्ष श्याम पी. गोयल, कोअर कमिटी सदस्य एम. बी. अग्रवाल, नंदलाल गुप्ता, नितिन अग्रवाल, मनोज एफ. अग्रवाल, महिला समिती अध्यक्षा नीता चंद्रशेखर अग्रवाल, उपाध्यक्षा मीना गोयल, सचिव उषा तुलस्यान, कोषाध्यक्षा लक्ष्मी गोयल, युवा विंग अध्यक्ष विकास गर्ग, पंकज अग्रवाल, हितेंद्र अग्रवाल, तसेच गोल्डन क्लबचे उपाध्यक्ष के. बी. गोयल, सुनील अग्रवाल आणि समाजातील इतर अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येरवडा, रामवाडी, चंदन नगर, पुणे अग्रवाल समाज, दापोडी अग्रवाल समाज, विश्रांतवाडी, खडकी, बोपोडी, चिंचवड प्राधिकरण यांसह समाजातील अनेक संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्य या उत्सवात सहभागी झाले. सर्वांनी एकमेकांना गुलाल लावून होळीच्या शुभेच्छा दिल्या आणि समाजाच्या ऐक्याला अधिक बळकटी दिली.

होळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी गूळ-गुजिया, ठंडाई, दही भल्ले आणि चविष्ट पक्वान्नांची विशेष सोय करण्यात आली होती. या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेत सर्वांनी हा सोहळा अविस्मरणीय बनवला. या भव्य आयोजनामागे महिला समितीच्या अध्यक्षा श्रीमती नीता चंद्रशेखर अग्रवाल, युवा विंगचे विकास गर्ग आणि आयोजन समितीच्या सर्व सदस्यांचे अथक प्रयत्न होते. त्यांच्या परिश्रम आणि समर्पणामुळे हा कार्यक्रम भव्य आणि अविस्मरणीय ठरला.

अग्रवाल समाज फेडरेशनतर्फे आयोजित हा होळी महोत्सव केवळ रंगांचा सण नव्हता, तर समाजाच्या एकजुटीचे, प्रेमाचे आणि परंपरांच्या जतनाचे एक उत्तम उदाहरण ठरले.

### संघटनेला बळकटी : मनोज एफ. अग्रवाल कोअर कमिटी सदस्य म्हणून नियुक्त


होळीच्या या आनंदोत्सवात अग्रवाल समाज फेडरेशनच्या कोअर कमिटीमध्ये नवीन सदस्याची निवड करण्यात आली. सेक्रेटरी सीए के. एल. बंसल यांनी मनोज फकीरचंद अग्रवाल (येरवडा) यांना कोअर कमिटी सदस्य म्हणून घोषित केले. उपाध्यक्ष विनोद बंसल यांनी त्यांना फेटा बांधून सन्मानित केले आणि कोषाध्यक्ष श्याम गोयल यांनी त्यांच्या नावाला अनुमोदन दिले. त्यांच्या निवडीमुळे अग्रवाल समाज फेडरेशन अधिक बळकट होईल.

# सध्या दीपिका काय करते?



बॉलिवूडमधील टॉप अभिनेत्रींपैकी एक असणारी दीपिका पदुकोण सध्या मुलगी दुआच्या संगोपनाचा आनंद घेण्यात रमली आहे. तिने मुलीला मीडियापासून दूर ठेवले आहे. मात्र अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत तिने मुलीशी संबंधित प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी आपण गुगलची मदत घेत असल्याचे स्पष्ट केले आहे. थोडक्यात आता ही अभिनेत्री गुगलवर 'आईपणाशी संबंधित प्रश्न' शोधण्यात व्यग्र दिसते आहे. गुगलवर शेवटचे काय शोधले होते? असा प्रश्न विचारता दीपिकाने हसून उत्तर दिले, मी शेवटची शोधलेली गोष्ट 'माझे बाळ अन्न तोंडातून बाहेर काढणे कधी थांबवेल?' हे होते. या मुलाखतीत दीपिकाला तिच्यासाठी सुट्टीचा अर्थ काय आहे, हा प्रश्नही विचारण्यात आला. यावर 'माझा सुट्टीचा दिवस घरी आराम करण्यात, हायड्रेटेड राहण्यात, मुलीला मालिश करण्यात, बाळासोबत वेळ घालवण्यात आणि अंथरुणावर आराम करण्यात जातो' असे उत्तर दिले. मागील वर्षीच्या सप्टेंबरमध्ये दीपिका आणि रणवीर पालक झाले होते. त्यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये गोड बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली होती.. त्यानंतर ३० सप्टेंबर २०२४ रोजी त्यांनी घरी आलेल्या गोंडस परीचे स्वागत केले. दिवाळीच्या निमित्ताने या जोडप्याने त्यांच्या मुलीच्या पायांचा फोटोही शेअर केला आणि चाहत्यांना तिचे नाव सांगितले. आता या गोंडस बाळाचा चेहरा कधी बघायला मिळतो याची दोघांच्या चाहत्यांना प्रतीक्षा आहे.





# जयपूरमध्ये रंगला सोहळा

अलिकडेच जयपूर एक्झिबिशन कन्व्हेन्शन सेंटर (जेईसीसी) येथे झालेल्या २५ व्या आयफा पुरस्कार सोहळ्यात 'लापता लेडीज' या चित्रपटाने मोठा विजय मिळवला. या चित्रपटाला वेगवेगळ्या श्रेणींमध्ये तब्बल दहा पुरस्कार मिळाले. अभिनेता कार्तिक आर्यन आणि चित्रपट निर्माता करण जोहर यांनी सूत्रसंचालन केलेला हा कार्यक्रम चांगलाच रंगला. यावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि उपमुख्यमंत्री दिया कुमारी देखील उपस्थित होत्या. यानिमित्त राजस्थानच्या संस्कृतीच्या रंगीत झलक दाखवून नृत्य सादरीकरणाची सुरुवात झाली. करिना कपूरने राज कपूर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांची 'प्यार हुआ इकरार हुआ,' 'ये गलिया ये चौबारा,' 'जीना यहान मरना यहान' ही गाणी सादर करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. अभिनेत्री कृती सेनन, कार्तिक आर्यन, शाहिद कपूर, माधुरी दीक्षित यासारख्या कलाकारांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात 'भूल भुलैया ३' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जिंकणाऱ्या कार्तिक आर्यनने आपला प्रवास सांगितला. या सोहळ्यात भारतीय चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी राकेश रोशन यांना गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट चित्रपट: मिसिंग लेडीज, सर्वोत्कृष्ट अभिनेता: कार्तिक आर्यन (भूल भुलैया ३), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री: नितांशी गोयल (मिसिंग लेडीज), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक: किरण राव (मिसिंग लेडीज), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता: रवी किशन (मिसिंग लेडीज), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री: जानकी बोडीवाला (शैतान), सर्वोत्कृष्ट खलनायक: राघव जुयाल (किल), सर्वोत्कृष्ट पदार्पण अभिनेता: लक्ष्य लालवानी (किल) हे काही महत्त्वाचे पुरस्कार चर्चेत राहिले



# ओटीटीवर 'वनवास'ची वार्ता

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे चित्रपट विशेष संदेश देण्याचे काम करतात. याआधी त्यांनी मनोरंजन करणारे अनेक चित्रपट दिले असले तरी आजकाल हा गुणी अभिनेता महत्त्वाच्या विषयांशी संबंधित चित्रपटांमध्ये काम करताना दिसतो. मध्यंतरीच त्यांचा 'वनवास' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आणि प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. आता थिएटरनंतर तो ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. थिएटरमध्ये पाहिला असला तरी ओटीटीवर हा चित्रपट पाहण्याचीही एक वेगळीच मजा आहे. चित्रपट बॉक्स ऑफिसवर कोणताही मोठा विक्रम करू शकला नसला तरी नाना पाटेकरांसारख्या ज्येष्ठ अभिनेत्याचा सकस अभिनय बघण्यासाठी तो नक्कीच बघायला हवा.


या चित्रपटात नाना पाटेकर यांनी एका वृद्धाची भूमिका साकारली आहे. चित्रपटाची कथा या पात्राभोवतीच फिरते. पत्नीच्या मृत्यूनंतर या पात्राला एकटेपणा भेडसावतो. एवढेच नाही तर तो डिमेंशियाचा बळी ठरतो. मात्र आपली संपत्ती दान करण्याचा निर्णय घेतल्यामुळे मुले त्यांना वाराणसीत सोडतात. जिथे तो एका अनोळखी व्यक्तीला भेटतो. पुढे तो नानाच्या पात्राची कुटुंबाशी भेट घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.

हा चित्रपट १४ मार्च २०२५ पासून झी फाईव्हवर बघता येत असल्यामुळे अनेकांना आनंद घेता येईल. 'वनवास'च्या कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर नाना पाटेकर, उत्कर्ष शर्मा, सिमरत कौर, खुशबू सुंदर आणि राजपाल यादव यांच्या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा अनिल शर्मा, सुनील सिरवैया आणि अमजद अली यांनी संयुक्तपणे लिहिली आहे. त्याचबरोबर अनिल शर्मा यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली आहे. थिएटरनंतर हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित येत असल्यामुळे तो अनेकांपर्यंत पोहोचेल यात शंका नाही.

# येणार 'उंटावरचा शहाणा'

मराठीत अनेक अर्थपूर्ण म्हणी आहेत. त्यातील एक असणाऱ्या 'उंटावरचा शहाणा' म्हणीला एका वेगळ्या ढंगात विनोदी स्वरूप देणारा 'उंटावरचे शहाणे' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सौम्या प्रोडक्शनच्या निर्मितीखाली तयार होणाऱ्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ ६ मार्च २०२५ रोजी दिमाखदार सोहळ्यात पार पडला. चित्रपटाचे निर्माते प्रशांत अनिल गवळी, दिग्दर्शक शुभम सुनील दळवी, छायाचित्रकार के. विजय, कार्यकारी निर्माता विष्णु घोरपडे आणि लाइन प्रोड्यूसर बजरंग मासाळ यांच्या उपस्थितीत मुहूर्ताचा सोहळा संपन्न झाला. चित्रपटाच्या शीर्षकाप्रमाणेच हा एक हलकाफुलका, विनोदी आणि मनोरंजनाने भरलेला प्रवास असणार आहे.

'उंटावरचा शहाणा' ही मराठी म्हण आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या विसंगत आणि गंमतीशीर प्रसंगांवर मार्मिक भाष्य करणारी आहे. हाच पैलू या चित्रपटात मनोरंजक पद्धतीने दाखवला जाणार आहे. समाजातील गमतीशीर आणि विसंगत गोष्टींवर हास्याचा चपखल तडका देत हा सिनेमा प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करणार आहे. अर्थात 'उंटावरचे शहाणे' हा केवळ विनोदी चित्रपट नसून तो भोवतालच्या जगाकडे मिश्किल नजरेने पाहण्याचा एक वेगळा दृष्टीकोन देईल. प्रेक्षकांना हलकं-फुलकं आणि ताजेतवाने करणारे मनोरंजन देण्याचा त्याचा प्रयत्न असेल. या सिनेमाच्या माध्यमातून




समाजातील काही विसंगतींवर हसत-हसत भाष्य करतानाच त्यातून एक महत्त्वाचा संदेशही देण्याचा दिग्दर्शकाचा मानस आहे. चित्रपटाच्या टीमकडून लवकरच कलाकारांच्या नावांची घोषणा करण्यात येणार आहे. या अनोख्या संकल्पनेवर आधारित चित्रपटाविषयी उत्सुकता वाढली असून प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# सगळेच नादान...

निर्माता दिग्दर्शक करण जोहरचा 'नादानियां' चर्चेत होताच. खरंतर त्याचं नाव 'स्टुडंट ऑफ द इयर ३' असायला हवं होतं. अर्थात हे नाव असते तरी त्यातील अनेक त्रुटी लक्षात घेता प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असता की नाही, या शंकेला जागा उरतेच. येथे दाखवलेले काल्पनिक कॉलेज जुन्या कॉलेजइतकेच छान असले तरी ते एखाद्या रिसॉर्टसारखे दिसते. कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती ब्रिगांझा मल्होत्रा इंग्रजीत पूर्ण वाक्ये बोलण्याऐवजी शॉर्टकटमध्ये बोलतात. विषयही तोच जुना आहे. म्हणजे मध्यमवर्गीय कुटुंबातील एखादा विद्यार्थी श्रीमंतांमध्ये आला तर सुरुवातीला वर्गमित्र चेष्टा करतात. पण नायक आपल्या प्रतिभेने नायिकेला प्रभावित करतो आणि मग ते नकळत एकमेकांच्या प्रेमात पडतात. पुढे घडायचे ते सगळे घडते. या चित्रपटात इब्राहिम अली खान आणि अभिनेत्री खुशी कपूरच्या भूमिकेबद्दल तसेच त्यांच्यातील केमिस्ट्रीबद्दल उत्सुकता होती. मात्र हे दोघेही आपापल्या पात्राला न्याय देण्यात कमी पडल्याचे स्पष्ट दिसते. 'नादानियां' चित्रपटातून दिग्दर्शनात पाऊल ठेवणारी शौना गौतमचाही प्रभाव जाणवत नाही. त्यामुळेच ही विखुरलेली कथा प्रेक्षकांनी नाकारली आहे. रिवा राजदान कपूर, इशिता मोईत्रा आणि जेहान हांडा या त्रिकुटाने लिहिलेला पटकथा खूपच कमकुवत आहे. तरुण पिढीच्या समस्या आणि संघर्ष दाखवण्यात लेखक खूपच कमी पडला आहे. हा चित्रपट लिंगभेदाचा मुद्दा उपस्थित करत असला तरी विषयाची खोली गाठण्यात तो अपयशी ठरला, हे मान्य करावे लागेल. त्याचबरोबर इब्राहिमला पालकांकडून अभिनयातील बरेच ज्ञान घ्यावे लागणार आहे.





# चर्चा एका डेटिंगची

युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा घटस्फोट झाला असून ते दोघेही आता वेगळे झाल्याची बातमी अलिकडेच आपण वाचली. मात्र घटस्फोटानंतर काही आठवड्यांनंतर सामन्यात या क्रिकेटपटूबरोबर एक नवीन 'मिस्ट्री गर्ल' दिसल्यामुळे लोकांमध्ये उत्सुकता वाढली होती. आरजे महवशचे नाव युजवेंद्र चहलच्या घटस्फोटाच्या बातमीत त्याच्याशी जोडले गेले आणि तेव्हाच त्याने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती.

आरजे महवश तिच्या व्हिडिओंमुळे सोशल मीडियावर अनेकदा ट्रेंडमध्ये असते, पण आता तर लोक तिला चहलची 'मिस्ट्री गर्ल' म्हणून टॅग करत आहेत. या क्रिकेटपटूच्या घटस्फोटाची बातमी प्रसिद्धीच्या झोतात आली होती तेव्हाच ट्रोलर्सनी महवशला या घटस्फोटाचे कारण सांगितले होते. आता आरजेने उत्तर दिले असून 'एखाद्या विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीसोबत पाहिले गेले तर याचा अर्थ तुम्ही त्यांना डेट करत आहात असा होतो का? माफ करा, हे कोणते वर्ष आहे? आणि मग तुम्ही किती जणांना डेट करत आहात? हे कोण कोणाला कसे विचारु शकतो?' असा प्रश्न केला आहे. इतकेच नव्हे तर इतरांची प्रतिमा लपवण्यासाठी मी कोणत्याही पीआर टीमला माझे नाव ओढू देणार नाही. लोकांना मित्रमैत्रिणी आणि कुटुंबासोबत शांततेत राहू द्या, असेही तिने सुनावले आहे.

अरीज महवश ही दिल्लीची रेडिओ जॉकी आहे. रेडिओ जॉकी असण्यासोबतच तो सोशल मीडियावर कंटेंट क्रिएटर देखील आहे. ती तिच्या उत्तम आवाजासाठी आणि मनोरंजक शैलीसाठीही ओळखली जाते. सोशल मीडियावर तिचे अनेक फॉलोअर्स असून इंस्टाग्रामवरही १.४ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत. महवाशला 'बिग बॉस' आणि नेटफ्लिक्स मालिकेत काम करण्याची ऑफर मिळाल्याचेही वृत्त आहे.

ख्रिसमसच्या निमित्ताने युजवेंद्र आणि आरजे महवश सर्वप्रथम एकत्र दिसले होते आणि तेव्हाच ते प्रसिद्धीच्या झोतातही आले होते. यानंतर दोघे बऱ्याच पार्ट्यांमध्ये एकत्र बघायला मिळाले. यामुळेच त्यांच्या डेटिंगच्या बातम्या बाहेर येऊ लागल्या. तथापि, महवशने मात्र ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे.

# आता विजेत्याची प्रतीक्षा

छोट्या पडद्यावर अभिनय दाखवणारे स्टार किती चांगले स्वयंपाक करतात याचा पुरावा 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'मध्ये स्पष्टपणे दिसून येतो. या कुकिंग शोला टीआरपीच्या टॉप लिस्टमध्ये स्थान मिळाले नसले तरी प्रेक्षकांना तो खूप आवडतोय. टीव्ही स्टार्सनी सजलेल्या या शोला आता त्याचा विजेता मिळाला आहे. सेलिब्रिटी मास्टरशेफची सुरुवात २७ जानेवारी रोजी झाली होती. आता सुमारे दीड महिन्यानंतर शो अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे. अंतिम फेरीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु टॉप ५ आणि विजेत्यांच्या नावांची चर्चा मात्र सुरू झाली आहे.

सेलिब्रिटी मास्टरशेफच्या टॉप ५ मध्ये पोहोचणारे स्टार तेजस्वी प्रकाश, गौरव खन्ना, निक्की तांबोळी, राजीव अदातिया आणि फैजल शेख असल्याची चर्चा आहे. या पाच स्पर्धकांमध्ये गौरव खन्ना हा स्टार 'अनुपमा'मध्ये अनुजच्या भूमिकेमुळे चर्चेत असून तो सुरुवातीपासूनच सेलिब्रिटी मास्टरशेफ विनरचा एक तगडा स्पर्धक समजला जात आहे. त्याने स्वयंपाक कौशल्याने अनेक वेळा परीक्षकांना प्रभावित केले आहे. त्यामुळेच आता तो शोची ट्रॉफी घरी घेऊन जाईल की नाही, हे बघणे रंजक ठरणार आहे. सेलिब्रिटी मास्टरशेफमध्ये एकूण १२ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यापैकी चार जण बाहेर पडले आहेत. आता दीपिका कक्करची पाळी आहे. ती शो गमावणार नाही परंतु हाताच्या दुखण्यामुळे



तिने स्वतःहून शो सोडण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटच्या एलिमिनेशनमध्ये कविता सिंगला बाहेर काढण्यात आले आणि त्यावर चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली. हा तिच्यावरील अन्याय असल्याचे अनेकांनी म्हटले. आता सगळ्यांनाच अंतिम विजेता कोण असणार, याची प्रतीक्षा आहे.



# अजूनही चर्चा 'छावा'चीच

गेल्या एका महिन्यापासून बॉक्स ऑफिसवर राज्य करणारा चित्रपट म्हणजे 'छावा'. 'क्रेझी' आणि 'सुपरबॉईज' छावासमोर आले खरे, पण छावाच्या कमाईवर परिणाम करण्याचे धाडस कोणीही करु शकलेले नाही. या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षक मिळत असले तरी 'छावा' ची क्रेझ कायम आहे. 'छावा' ने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ५०० कोटी रुपयांचा निव्वळ कलेक्शन आधीच पार केला आहे. मात्र ही घोडदौड जगभरातही दिसून येत आहे. या चित्रपटाने चौथ्या आठवड्यात प्रवेश करण्यापूर्वीच जगभरातील 'गदर २' चा विक्रम मागे टाकले होते. 'विकी कौशल'चा 'छावा' बॉक्स ऑफिसवर सर्वात जलद ५०० कोटींचा टप्पा ओलांडणारा चौथा हिंदी चित्रपट ठरला आहे. यापूर्वी, 'स्त्री २' (२२ दिवस), 'जवान' (१८ दिवस) आणि 'पुष्पा २' (११ दिवस) या तीन चित्रपटांनी सर्वात वेगाने हा आकडा गाठला होता. जगभरातील कलेक्शनबद्दल बोलायचे झाले तर 'छावा'ने परदेशात ८८.८४ कोटी रुपये कलेक्शन केले असून आणि भारतात एकूण कलेक्शन ६०९.६८ कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. त्यामुळेच तो टॉप १० सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये समाविष्ट झाला होता. लवकरच 'छावा'चे जगभरातील गल्ला ७०० कोटी रुपयांच्या पुढे जाईल अशी अपेक्षा आहे.




## सणसवाडीत गांजा बाळगणाऱ्या दोघांवर गुन्हा

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील भैरवनाथ मंदिर लगत असलेल्या ओढ्याजवळ दोन युवक गांजाच्या पुड्या घेऊन बसले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांना मिळाली, त्यांनतर पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक लहानू बांगर, पोलीस हवालदार श्रीमंत होनमाने, शिवाजी चितारे, पोलीस नाईक विकास पाटील, जयराज देवकर यांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता दोघा युवकांकडे प्लास्टिक मध्ये गांजा तसेच गांजा सेवन साठी लागणारे साहित्य मिळून आले, यावेळी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या जवळील गांजा जप्त केला, याबाबत पोलीस नाईक विकास जालिंदर पाटील रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अभिषेक साहेबराव सावंत वय २३ वर्षे रा. उरळगाव ता. शिरुर जि. पुणे व कुंडलिक मारुती चव्हाण वय ४२ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे हे करत आहे.

## शिक्रापूर परिसरात एकाच दिवसात तिघांचा गळफास

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये नेहमी वेगवेगळ्या प्रकारे आत्महत्याच्या घटना घडत असताना वढू बुद्रुक, कोंढापुरी व शिक्रापूर येथे एकाच दिवसात तीन वेगवेगळ्या इसमांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या असून वढू बुद्रुक येथे मंगेश रंगनाथ भंडारे वय ३७ वर्षे रा. वढू बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे, तर कोंढापुरी येथे गोविंद बोकरराव दुधारे वय ६० वर्षे रा. कोंढापुरी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. गोळेगाव ता. पूर्णा जि. परभणी आणि शिक्रापूर येथील बजरंगवाडी येथे विष्णू शेषराव चव्हाण वय ४० वर्षे रा. बजरंगवाडी शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. बेचखेडा ता. यवतमाळ जि. यवतमाळ या तिघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या मात्र कोणाच्याही आत्महत्येचे कारण समजू शकले नसून तिघा इसमांच्या पालकांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार दिलीप मोरे हे करत आहे.

## माजी प्राचार्य अरविंद खिरे यांचे निधन

**उरुळी कांचन :** येथील महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित, महात्मा गांधी विद्यालयाचे माजी प्राचार्य



अरविंद खिरे यांचे गुरुवार दिनांक १३ रोजी वयाच्या ८१ व्या अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले . ०१/०६/१९७२ रोजी उपशिक्षक म्हणून विद्यालयात रुजू झालेले खिरे सरांनी नंतर ०१/०३/१९९९ ते २८/०२/२००२ या काळात विद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम पाहिले व सेवानिवृत्त झाले. ज्ञानदानाचे काम करत असताना विद्यार्थ्यांप्रती प्रेम, कळकळ, निष्ठा व निस्वार्थ सेवा भावनेतून त्यांनी आपले काम केले.अध्यापनात इंग्रजी व मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते.तसेच साहित्यामध्ये सुद्धा आवड असल्याने त्यांनी अध्यापनाच्या सेवेबरोबर मराठी साहित्यामध्ये "एकेक किरण तेजाचा", "समईच्या शुभ्र कळ्या" असे काव्यसंग्रह लिहिले आहेत.

# 1500 दिव्यांगांच्या दिव्यदृष्टीचा आविष्कार

## चित्रकला स्पर्धेतून दृष्टीहिनांनी चितारली कला



> दिव्यांगांना आत्मसन्मानाने जगण्यासाठी सरकारने एक विशेष दिव्यांग इंडस्ट्री सुरू करावी. उच्च दर्जाची, शास्त्रीय पद्धतीने तयार करता येणारी उत्पादने जसे की हर्बल फिनेल निर्मिती अथवा सोप्यापद्धतीने बनविण्यात येणाऱ्या गोष्टी शासनाने दिव्यांगांकडून खरेदी कराव्यात त्यासाठी त्यांना विशेष तज्ञांकडून प्रशिक्षण देऊन त्यांचे जगणे सुलभ करावे.
>
> **- संस्थापक ध्यानमूर्ती रघुनाथ येमुल गुरुजी**

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** दिव्यांग इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (डिकाई ) या दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या संस्थेतर्फे नुकतीच आंतरशालेय चित्रकला स्पर्धा पार पडली.या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष. या स्पर्धेमध्ये एकूण १५०० पेक्षा अधिक दिव्यांग कलाकारांनी सहभाग घेतला होता. दिव्यांग मुलांच्या कलेला वाव देण्यासाठी पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग येथे या भव्य चित्रकला स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत दिव्यांग आणि इतर विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. ३५० हून अधिक विद्यार्थ्यांनी या चित्रकला स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. वय वर्षे ४ ते ९ वर्षे या वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आपला ऑनलाइन सहभाग नोंदवला.यानंतर प्रसिद्ध कलाशिक्षक जयंत टोले आणि त्यांच्या कलाशिक्षक टीमने यातून ३५० उत्कृष्ट चित्रांची निवड केली .यातून अंतिम ३० सर्वोत्तम चित्रांची निवड करण्यात आली.

स्पर्धेतून प्रत्येक गटातील सर्वोत्तम पाच बालचित्रकारांच्या चित्रांची निवड करण्यात आली. तिन्ही गटांतील पंधरा सर्वोत्कृष्ट बालचित्रकारांना रोख पंधराशे रुपये, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या संयोजनासाठी डिकाईचे सेक्रेटरी शेखर यादव आणि रमणबाग प्रशालेचे उपमुख्याध्यापक जयंत टोले यांनी पुढाकार घेतला. यावेळी डिकाईचे संस्थापक ध्यानमूर्ती रघुनाथ येमुल गुरुजी, बीव्हीजी ग्रुपचे संचालक हनुमंत गायकवाड, बांधकाम व्यावसायिक दिलीप कोटीभास्कर, सक्षम पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष अॅड मुरलीधर कचरे, उद्योजक नितीन कुलकर्णी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेच्या सभागृहात आयोजित पारितोषिक वितरण कार्यक्रमास अनेक पालक,शिक्षक आवर्जून उपस्थित होते.दिव्यांग जनांसाठी डिकाई आणि येमूल गुरुजी हे अत्यंत चांगल्या उद्देशाने काम करत आहेत. या कामासाठी बीव्हीजी ग्रुप सदैव डिकाई बरोबर असेल, असे हनुमंतराव गायकवाड म्हणाले.

# आरणगाव आलेगावच्या सरपंचपदी अनिता तोंडे विजयी



आरणगाव व आलेगाव पागा ता. शिरुर या ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंचपदी निवडीबद्दल अनिता तोंडे यांचा सन्मान करताना पदाधिकारी व ग्रामस्थ.

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**शिक्रापूर :** आरणगाव व आलेगाव पागा ता. शिरुर या ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंच पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत गुप्त मतदान पद्धतीने झालेल्या निवडणुकीत सरपंचपदी अनिता हरीभाऊ तोंडे यांची एका मताने निवड झाली आहे.

आरणगाव व आलेगाव पागा ता. शिरुर ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच बाळासाहेब रासकर यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडलाधिकारी नंदकुमार खरात व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी दिपाली झाडगे यांच्या नियंत्रणाखाली सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली, यावेळी मावळते सरपंच बाळासाहेब रासकर, उपसरपंच लीलाबाई भोसले, ग्रामपंचायत सदस्य महावीर दर्डा, अनिता तोंडे, राजेंद्र मखर, सतीश आरवडे, अमृता हरिहर, शीतल हंडाळ, सनिल माळी, संभाजी बेनके, जांभळकर हे उपस्थित होते, दरम्यान सरपंच पदासाठी अनिता तोंडे, कुसुम जांभळकर, अमृता हरिहर व शितल हंडाळ यांनी अर्ज दाखल केले दरम्यान कुसुम जांभळकर व अमृता हरिहर यांनी अर्ज मागे घेतल्याने अनिता तोंडे व शितल हंडाळ केल्याने दोघांमध्ये गुप्त पद्धतीने मतदान घेण्यात आले असता अनिता तोंडे यांना सहा तर शितल हंडाळ यांना पाच मते मिळाल्याने अनिता तोंडे यांची एक मताने सरपंचपदी निवड झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी नंदकुमार खरात यांनी जाहीर केले, तर निवडीनंतर अनिता तोंडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी यावेळी माजी सरपंच सतीश आरवडे, तंटामुक्ती अध्यक्ष वैभव शिंदे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक मखर, संतोष आरवडे, जयवंत तोंडे, योगेश तोंडे, गणेश मखर, कोंडीबा कुलाळ, शिवाजी तोंडे. सोन्याबापू तोंडे, गणेश थोरात, संतोष भालेराव, साहेबराव तोंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य दादा तोंडे, केशव तोंडे, कुसुम तोंडे, हनुमंत कोकाटे, सुनील जाधव, कृष्णा कोकाटे, प्रकाश चव्हाण, रामदास सूळ, विजय तोंडे, दत्तात्रय मखर, बापुराव कोकाटे, देवराम वडघुले यांसह आदी उपस्थित होते, तर यावेळी बोलताना गावातील सर्वांना बरोबर घेऊन गावचा विकास करणार असल्याचे नवनिर्वाचित सरपंच अनिता तोंडे यांनी सांगितले.

# सासवडच्या चिंतामणी रुग्णालयाचा महिला दिन साजरा



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**सासवड :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्वत्र महिलांच्या सन्मानाचे कार्यक्रम होत आहेत याच पार्श्वभूमीवर सासवड येथील चिंतामणी हॉस्पिटल मधील सर्व परिचारिका व नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थिनी यांना मोगऱ्याची रोपे देत वेगळ्या स्वरूपात महिला दिन साजरा करण्यात आला. जेष्ठ महिला उद्योजिका व साई रोप वाटीकेच्या सविता किशोर संगमनेरकर यांच्या वतीने देण्यात आलेल्या या रोप वाटप कार्यक्रमासाठी डॉ संजय रावळ, डॉ विनायक बांदेकर, डॉ संध्या खळदकर, जेष्ठ पत्रकार हेमंत ताकवले, किशोर संगमनेरकर, चित्रा हातीवलेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

धन्वंतरी पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉविनायक बांदेकर, हेमंत ताकवले, डॉ संध्या खळदकर यांनी या वेळी मनोगते व्यक्त केली. स्त्री जितकी कठीण तेवढीच कोमल असते असे सांगत डॉ खळदकर यांनी स्त्री शक्तीची महती सांगितली. सविता संगमनेरकर यांनीही महिला दिनाच्या निमित्ताने वृक्ष लावा, पर्यावरणाचे रक्षण करा असा सल्ला दिला. राजश्री शिवरकर, नुतन गोसावी सई खळदकर आदींनी कार्यक्रमाचे आयोजन केले.कविता साळवे यांनी सुत्र संचालन केले.

# उच्च शिक्षणाचे ध्येय डोक्यात ठेवले तर यश निश्चित



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**उरुळी कांचन :** विद्यार्थ्यांनी दहावी पासुनच शुद्ध हेतूने उच्च शिक्षणाचे ध्येय डोक्यात ठेवले तर यश निश्चितच पदरात पडते, त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ईश्वरी जगताप हिचे यश होय असे प्रतिपादन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांनी केले, ते येथील कु.ईश्वरी विकास जगताप हिने नुकतीच एमबीबीएस ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केल्याबद्दल सन्मान करताना बोलत होते.

भाजपचे व्यापार आघाडी महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष आणि शिवरत्न उद्योग समूहाचे संस्थापक विकास जगताप यांची कन्या ईश्वरी हिने दहावीच्या परीक्षेत ९८ टक्के गुण प्राप्त केल्यानंतर, वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदवी मिळवण्याचे स्वप्न उराशी बाळगून तसे प्रयत्न सुरू केले आणि आज एमबीबीएस ही पदवी प्राप्त करुन घेत उत्तुंग यश मिळवले, म्हणून परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असताना, अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत तिचा सन्मान करण्यात आला आणि तिला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी डॉ. गिरीश शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक आप्पासाहेब काळभोर, उद्योजक नानासाहेब लोणकर, भवरापूरचे माजी सरपंच उद्योजक सुभाष साठे, उरुळी कांचनचे माजी सरपंच भाऊसाहेब ल. कांचन, टिळेकर वाडी खामगाव टेकचे माजी सरपंच सुभाष लोणकर, नायगावचे माजी सरपंच बापूसाहेब चौधरी, कोरेगाव मुळचे माजी सरपंच प्रमोद बोधे, उरुळी कांचनचे माजी उपसरपंच युवराज कांचन, संजय आ. कांचन, सुनील गोते, रवींद्र बोराटे, पोलीस पाटील प्रवीण बोराटे, प्रशांत भोर आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

## 'कबरी' साठी 'बाबरी' ची धमकी

म्हणाले, आपले संपूर्ण आयुष्य दगाबाजी, विश्वासघात व हिंदू द्वेष यात घालविणारा, आपल्या सख्या भावांचे खून करणारा, बापाला कैदेत टाकणाऱ्या, काशी विश्वनाथ, मथुरा,सोमनाथ मंदिरे फोडणारा, छत्रपती संभाजी महाराज यांचा चाळीस दिवस छळ करणाऱ्या औरंगजेबाची कबर म्हणजे त्याने केलेल्या क्रूर आणि अन्यायाला प्रोत्साहन देण्यासारखे आहे, त्यामुळे कबर हटवली पाहिजे.

नितीन महाजन म्हणाले, औरंगजेबाच्या कबरीमुळे आजही त्याच्या विचारसरणीचे अनुयायी इतिहासावर बोट ठेवून त्याच मुघल शासकाच्या पावलावर पाऊल ठेवत या हिंदुस्थानात शरिया कायद्यानुसार वागत आहेत. २०४७ पर्यंत भारताला इस्लामिक राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या प्रवृत्तीला औरंगजेबाच्या कबरीतून प्रेरणा मिळते. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या मारेकऱ्याची कबर जतन करण्याची आवश्यकता नाही.

स्वतःच्या वडीलांना तुरुंगात टाकून मारणारा, स्वतःच्या भावांची क्रूरतेने हत्या करणारा घरातल्या लोकांना सोडत नाही त्याच्यासाठी राष्ट्रातले नागरिक व समाजाची काय किंमत असणार ? अशा राष्ट्रघातकी, क्रूर आणि हिंसाचारी प्रवृत्तीच्या औरंग्याचा करावा तितका निषेध कमी असेल.

## न्यायालयाच्या अजब निर्णयावर...

यांच्या मतदारसंघातील जनतेचा कौल घ्या, असे वक्तव्य शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या जयश्री शेळके यांनी केले आहे.

शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्याशी करणारे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे दोषी असून त्यांना शिक्षाही झाली आहे. मात्र, त्यांच्या शिक्षेवर स्थगिती न दिल्यास ते आमदारकीतून अपात्र ठरतील आणि त्यांच्या मतदारसंघात पुन्हा निवडणूक घ्यावी लागेल आणि हा जनतेचा पैसा खर्च म्हणून परवडणारा नाही, असे निरीक्षण कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षा स्थगितीच्या सुनावणीत नाशिक न्यायालयाने नोंदवले आहे.

## बेशिस्त अन् तळीरामांवर मोठी...

पोलीस स्टेशनकडून लावण्यात आलेल्या नाकाबंदीमध्ये वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकावर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ट्रिपल सीट,राँग साईड, ड्रंक अँड ड्राईव्ह अशांवर कारवाई करत तब्बल ३८६ वाहनं जप्त करण्यात आलेत. एकूण ६ हजार ११८ केसेस करण्यात आल्या असून ५० लाख ९४ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

## स्वदेशी बनावटीच्या...

पूर्ण झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'डीआरडीओ', भारतीय वायुदल, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड आणि या चाचणीमध्ये सहभागी असलेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ही चाचणी यशस्वी झाल्याने 'एलसीए तेजस एएफ एमके 1'मध्ये 'अस्त्र' मिसाईल समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील काही महिन्यांत अधिक चाचण्या घेण्यात येणार आहेत.

## जगातील 'मोस्ट...

सांगितले की, त्यांच्या देशाच्या गुप्तचर सेवा आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या संयुक्त कारवाईत खदीजा ठार झाला. पश्चिम इराकच्या अनबार प्रांतातील खदीजाच्या तळांना लक्ष्य करून हवाई हल्ले करून ही कारवाई करण्यात आली. बशर अल असद यांच्या पतनानंतर सीरियात ISIS च्या उदयाबद्दल इराकी अधिकारी चिंतेत असताना ही कारवाई करण्यात आली आहे.

## दूध दरात दोन रुपयांनी वाढ

हिताचे आणि दूध उत्पादकांचे काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. गाई-म्हशीच्या दुधात 2 रुपये वाढ करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. ही वाढ शनिवारी १५ मार्चपासून लागू करण्यात आली आहे. दुधाच्या दोन रुपये वाढीतून शेतकऱ्याला चार पैसे मिळावे, हाच एक दूध दरवाढीचा उद्देश असल्याचे महासंघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांनी सांगितले.

वाढलेले दूधाचे दर कसे?
गाईचे दूध - 56 ते 58 रुपये
म्हशीचे दूध - 72 ते 74 रुपये

## पंजाबमधील...

मोगा आणि मलौत पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. हल्लेखोर लपलेल्या ठिकाणाला पोलिसांनी वेढा घातला. यावेळी पोलीस पथकावर त्यांनी गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार सुरू केला. या चकमकीत तीन्ही संशयित आरोपी गोळ्या लागून जखमी झाले.

## समाज कंटकाकडून चारचाकीची काच फोडून नुकसान

**जुन्नर :** जुन्नर शहरातील व्यापारी आणि सतत वर्दळ असलेल्या सराई पेठेतील सार्वजनिक रस्त्यावर उभ्या केलेल्या 2 चार चाकींचे दि 15 रोजी पहाटे च्या सुमारास अनोळखींनी जाणीवपूर्वक नुकसान केलेले असून एका चारचाकी चे हेडलाईट चोरून नेण्यात आले असून तिच्या मागील काचेचे तर दुसऱ्या चारचाकी ची काच फोडून नुकसान करण्यात आलेले आहे.

सराई पेठ मध्ये राहणारे संदेश बोंबले आणि कैलास गोसावी यांच्या दोन चारचाकी असून आपल्या घरालगत रस्त्यावर ते नेहमीच पार्किंग करत असतात. शनिवारी पहाटे बोंबले यांच्या चारचाकी च्या दोन हेडलाईट चोरून नेण्यात आल्या असून चारचाकी ची मागील काच फोडण्यात आली आहे.

# शेतकरी आत्महत्या संबंधित केंद्राने धोरण आखावे : शरद पवार

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**बारामती :** राज्यातील वाढलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल बोलताना नुकताच शरद पवार हे दिसले आहेत. पवार म्हणाले की, . राज्यातील काही ठिकाणची परिस्थिती बिघडली आहे. काही लोकांनी सत्तेचा गैरवापर केला. सत्तेचा गैरवापर होत असेल तर सरकारने याची दखल घ्यायला हवी.

यावेळी शरद पवार हे बीडच्या सध्याच्या परिस्थितीबद्दल बोलताना देखील दिसले ते म्हणाले की, बीडमध्ये आजच्यासारखी परिस्थिती कधीही बघायला मिळाली नव्हती. राज्यात सगळीकडे धार्मिक वातावरण नाहीये.

पुढे शरद पवार म्हणाले की, निवडणुका होत राहतात, पुढच्या निवडणुकांवर अजून ठरवलं नाहीये. जयंत पाटील हे पक्ष सोडून जाणार असल्याची चर्चा सातत्याने रंगताना दिसतंय, याबद्दल एक विधान जयंत पाटलांनी केले होते. त्यानंतर जयंत पाटील हे काल बारामतीमध्ये गेले होते, यावेळी त्यांनी शरद पवारांची भेट घेतली. यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, जयंत पाटलांनी त्यांची भूमिका कालच स्पष्ट केली आहे. बीडबद्दल बोलताना पवार म्हणाले, बीडमध्ये मी स्वत:लक्ष देत होतो, निर्णय घेत होतो. आता मात्र, परिस्थिती बिघडली आहे.

### राज्यातील प्रश्न विचारू नका..! राष्ट्रीय विचारा...



● एआयचा वापर करू पिक घेतले जातंय. एआयमुळे ऊसाला पाणी कमी लागेल. एआयचा कृषी क्षेत्रात वापर करणार असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले. एआयमुळे कृषी क्षेत्राला मोठी मदत होत आहे. अजित पवार यांचा लेक जय पवार यांचा साखरपुडा आहे आणि जय पवार आणि त्याच्या होणाऱ्या पत्नीने शरद पवारांची भेट घेतली. जय पवारच्या साखरपुड्याला जाणार का? असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला असता ते भडकले आणि म्हणाले की, हा काही प्रश्न आहे का विचारायचा...?

**जाहीर नोटीस**

खालील तपशिलात नमूद केलेले मुळ दस्तावेज हे श्री . लहू नारायण वायकर आणि इतर रा.पाटण, मळवली, पुणे - ४१०४०५ यांच्या मालकीचे गट ५९ मधील बिनशेती प्लॉट नं. ४ यांसी एकूण क्षेत्र ४६११.२ चौ. फुट ४२८.३९ चौ.मी पैकी दक्षिणेकडील प्लॉट चे क्षेत्र २१४.९५ चौ.मी हि मिळकत, या मिळकतीचे मुळ दस्तावेज मधील पान नं.४८ व ४९ यांचे ताब्यातून हरविले आहेत / गहाळ झालेले आहेत व अथक प्रयत्न करूनही सदर दस्तावेज हे मिळून आले नाहीत. तरी सदर दस्तावेज मधील पान नं. ४८ व ४९ हे कोणासही मिळाल्यास अथवा त्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या व्यक्तीस संपर्क करून सदर मूळ दस्तावेज वा माहिती द्यावी असे नम्र आवाहन असे.

**हरवलेल्या दस्तावेजांचा तपशील :-** ज्योती सुनिल कर्णिक स्वतः करिता प्रज्ञा राकेश राजे यांची माता व कुलमुखत्यार म्हणून आणि इतर यांनी श्री. पराग गंगाधर जोगळेकर आणि सौ. पल्लवी पराग जोगळेकर यांचे हक्कांत लिहून दिलेले दि. ११/०७/२०१४ रोजीचे मा. दुय्यम निबंधक मावळ यांचे कार्यालयामध्ये अनु. क्र. ४२५२/२०१४ अन्वये नोंदणीकृत झालेले मूळ दस्तावेज (साखळी दस्तावेज) या खरेदीखताचे पान नं.४८ व ४९.

**अॅड. अजित बापू खामकर**
**ऑफिस नं. ०३, तळमजला, लक्ष्मी नारायण कॉम्प्लेक्स,**
**चिंचवडगाव मेन बस स्टॉप जवळ, चिंचवड, पुणे- ०३३/ मो. नं. ८६६८४१६७५७**

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
16•3•2025

# महाकुंभात खादी, रिअल इस्टेट झळाळली

**सरत्या आठवड्यात विविधरंगी बातम्या झळकल्या. सर्वप्रथम पुढे आलेले खास वृत्त म्हणजे महाकुंभात १२ कोटींच्या खादीची विक्री झाली. दुसरीकडे भारत आता रशिया, इराणऐवजी अमेरिकेतून इंधन आयात करणार असल्याचे समोर आले. याच सुमारास भारतात अब्जाधीशांची संख्या वाढणार असल्याचा निष्कर्ष समोर आला. याच वेळी रिअल इस्टेट क्षेत्रात छोट्या शहरांमधील गुंतवणूक फायद्याची ठरत असल्याचे दिसून आले.**

आर्थिक
महेश देशपांडे, अर्थतज्ज्ञ
राष्ट्रसंचार

एक लक्षवेधी वृत्त म्हणजे छोट्या शहरांतील रिअल इस्टेटमधील गुंतवणूक जास्त फायद्याची ठरत असल्याचे दिसून आले आहे. प्रयागराज येथे १४ जानेवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महाकुंभ दरम्यान राष्ट्रीय स्तरावरील खादी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात १२.०२ कोटी रुपयांच्या खादी उत्पादनांची ऐतिहासिक विक्री नोंदवण्यात आली होती. यावेळी बोलताना खादी ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोजकुमार यांनी सांगितले की प्रदर्शनात खादी उत्पादनांचे ९८ स्टॉल्स आणि ५४ ग्रामोद्योग स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये खादी उत्पादनांची विक्री ९.४६ कोटी रुपये तर ग्रामीण उद्योग उत्पादनांची विक्री २.२६ कोटी रुपये होती. यावेळी सहा राज्यांमधील २०५ मधुमक्षिकापालकांना २०५० मधमाशांच्या पेट्या, मध वसाहती आणि टूलकिटचे वाटप करण्यात आले. मधमाशी पाळणाऱ्यांना मधमाशांच्या पेट्या वाटप करण्यासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाने २०१७ मध्ये 'हनी मिशन' लॉंच केले. त्याअंतर्गत आतापर्यंत २० हजाराहून अधिक लाभार्थींना दोन लाख मधमाश्यांच्या पेट्या देण्यात आल्या आहेत. 'मन की बात'च्या ७५ व्या भागात मधुमक्षिकापालनाच्या फायद्यांविषयी चर्चा करताना पंतप्रधानांनी मधाव्यतिरिक्त मेण हेदेखील उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे, या मुद्द्यावर भर दिला होता. सूक्ष्म आणि लघु उद्योग मंत्रालयाच्या माहितीनुसार औषधे, खाद्यपदार्थ, कपडे आणि सौंदर्यप्रसाधने बनवण्यासाठी मेणाची मोठी मागणी आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी मधुमक्षिकापालनात सहभागी व्हायला हवे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल. त्यांच्या जीवनात गोडवा येईल आणि देश मध उत्पादनात स्वावलंबी होईल, असे मनोज कुमार यांनी सांगितले.

खादी क्षेत्रातील गेल्या दहा वर्षांमधील कामगिरीबद्दल बोलताना मनोजकुमार म्हणाले की खादी आणि ग्रामोद्योग




उत्पादनांच्या विक्रीमध्ये पाचपटीने वाढ झाली आहे. ३१ हजार कोटी रुपयांवरून एक लाख ५५ हजार कोटी रुपयांपर्यंत विक्री वाढली आहे. एकट्या खादी कापडाच्या विक्रीमध्ये एक हजार ८१ कोटी रुपयांवरून सहा हजार ४९६ कोटी रुपये अशी सहापट वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात १०.१७ लाख नवीन नोकऱ्याही निर्माण झाल्या आहेत. गेल्या दशकात खादी कारागीरांच्या उत्पन्नात २१३ टक्क्यांनी वाढ झाली असून त्यापैकी ८० टक्क्यांहून अधिक नोकऱ्या महिलांसाठी निर्माण झाल्या आहेत.

दरम्यान, अमेरिकेतून भारताला कच्च्या तेलाची निर्यात गेल्या महिन्यात दोन वर्षांमधील सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. रशियन तेल उत्पादक आणि टँकर्सवर अमेरिकेने घातलेल्या निर्बंधानंतर भारत पर्यायी पुरवठादारांच्या शोधात होता. 'केप्लेअर'च्या जहाज ट्रॅकिंग डेटावरून दिसून आले आहे की जगातील तिसरा सर्वात मोठा आयातदार आणि तेलाचा ग्राहक असलेल्या भारताला अमेरिकेतून तीन लाख ५७ हजार पिंप प्रति दिन कच्च्या तेलाची निर्यात होते. गेल्या वर्षी ही निर्यात दोन लाख २१ हजार पिंप प्रति दिन होती. भारताला कच्च्या तेलाच्या निर्यातीत झालेली ही वाढ हा संकेत आहे की इराण आणि रशियामधून तेल आणणाऱ्या जहाजांवर आणि कंपन्यांवर अमेरिकेने ऑक्टोबरपासून लादलेल्या निर्बंधांच्या अनेक फेऱ्यांनंतर भारताला या देशांसोबत कच्च्या तेलाचा व्यापार करण्यात अडचणी येत आहेत. भारताने गेल्या महिन्यात म्हटले होते की अमेरिकेकडून गेल्या वर्षीच्या 15 अब्ज डॉलरवरून नजीकच्या भविष्यात 25 अब्ज डॉलरपर्यंत इंधनखरेदी वाढू शकते.' शिप ट्रॅकिंग फर्म व्होर्टेक्सा'चे वरिष्ठ विश्लेषक रोहित राठोड म्हणाले की अलीकडे रशियन जहाजांवर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांमुळे भारत इतर ठिकाणांहून कच्च्या तेलाचा पुरवठा शोधत आहे. त्यासाठी प्रमुख खरेदीदारांमध्ये इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनचा समावेश आहे, तर सर्वात जास्त तेल ऑक्सीडेंटल पेट्रोलियम, इक्वीनॉर आणि एक्सॉन मोबिल आणि ट्रेडिंग हाऊस गुन्व्हर सारख्या अमेरिकेतील तेल उत्पादक कंपन्यांकडून विकले गेले.

आता एक खास बातमी. भारतातील श्रीमंत लोकांची संख्या सतत वाढत आहे.' नाइट फ्रँक' या जागतिक मालमत्ता सल्लागार संस्थेच्या अहवालानुसार दहा दशलक्ष डॉलर (सुमारे ८३ कोटी रुपये) पेक्षा जास्त मालमत्ता असलेल्या भारतीयांची संख्या गेल्या वर्षी सहा टक्क्यांनी वाढून ८५ हजार ६९८ झाली आहे. २०२३ मध्ये ही संख्या ८० हजार ६८६ होती. अर्थव्यवस्थेतील स्थैर्य आणि अन्य कारणांमुळे भारतात अब्जाधीशांच्या संख्येत भर पडणार आहे.' नाइट फ्रँक' चा अंदाज आहे की २०२८ पर्यंत भारतात उच्च निव्वळ मालमत्ता असलेल्यांची संख्या (एचएनडबल्यूआय) ९३ हजार ७५३ पर्यंत वाढेल. ही वाढ भारताचा मजबूत आर्थिक विकास दर, गुंतवणुकीच्या वाढत्या संधी आणि लक्झरी मार्केटचा विस्तार दर्शवते. भारतातील 'एचएनडबल्यूआय' ची संख्या २०२४ मध्ये ८५ हजार ६९८ पर्यंत पोहोचली असण्याची शक्यता आहे. २०२३ च्या तुलनेत ती सहा टक्के जास्त आहे. ही संख्या २०२८ पर्यंत 93 हजार ७५३ पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. करोडपतींशिवाय अब्जाधीशांच्या संख्येतही मोठी उडी दिसून आली आहे. २०२४ मध्ये भारतातील अब्जाधीशांची संख्या १९१ पर्यंत वाढेल. गेल्या वर्षी 26 नवे अब्जाधीश निर्माण झाले. २०१९ मध्ये ही संख्या फक्त सात होती. भारतीय अब्जाधीशांची एकूण संपत्ती ९५० अब्ज डॉलर (सुमारे ७९ लाख कोटी रुपये) आहे. ही आकडेवारी भारताला जगात तिसऱ्या क्रमांकावर आणते. अमेरिका पहिल्या स्थानावर (5.7 ट्रिलियन डॉलर) तर चीन (१.३४ ट्रिलियन डॉलर) दुसऱ्या स्थानावर आहे.' फोर्ब्स' च्या अहवालानुसार २०२४ मध्ये जगभरातील ७८ देशांमध्ये दोन हजार ७८१ अब्जाधीश होते. यामध्ये सर्वाधिक अब्जाधीश अमेरिकेत आहेत. भारताने या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे.

जमीन किंवा रिअल इस्टेटमधील गुंतवणूक अनेक पिढ्यांसाठी परतावा देते. तुम्हालाही दीर्घ मुदतीच्या परताव्यासाठी मालमत्तेत गुंतवणूक करायला आवडत असेल तर भारतात गुंतवणुकीसाठी फक्त दिल्ली-मुंबईसारखी शहरेच नाहीत, तर इतर अनेक शहरे रिअल इस्टेटमध्ये चांगला परतावा देत आहेत, हे जाणून घेणे फार महत्वाचे आहे. देशाच्या या भागात आणि नवीन उदयोन्मुख शहरांमध्ये रिअल इस्टेटची मागणी आणि त्याच्या किमतीत वाढ होत आहे. रिअल इस्टेट क्षेत्राचे भवितव्य आता दिल्ली-मुंबई-बंगळुरूसारख्या मोठ्या मेट्रो शहरांनी लिहिलेले नाही, तर देशातील टियर-2 आणि टियर-3 शहरांनी लिहिले आहे. घर खरेदी करणाऱ्यांकडून येथे मागणी वाढत आहे आणि विकासकदेखील मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवत आहेत. रिअल इस्टेट क्षेत्रातील आघाडीची संस्था' क्रेडाई' आणि' लियाझ फोराज' यांच्या संयुक्त अभ्यासात अनेक अनोख्या गोष्टी समोर आल्या आहेत. डेटा विश्लेषणाच्या आधारे, आढळून आले की विकासकांनी २०२४ मध्ये एकूण ३२९४ एकर जमिनीची खरेदी आणि विक्री केली आहे. यातील टियर-2 आणि टियर-3 शहरांमध्ये सुमारे ४४ टक्के जमीन खरेदी करण्यात आली.

पायाभूत सुविधांमध्ये सरकारच्या मोठ्या गुंतवणुकीमुळे छोट्या शहरांची कनेक्टिव्हिटी सुधारली आहे. त्याच वेळी ही शहरे खर्चाच्या बाबतीत अजूनही परवडणारी आहेत. त्यामुळे या शहरांमध्ये निवासी आणि व्यावसायिक वाढीच्या दृष्टीने लोकांची गुंतवणूक वाढत आहे. खरेदी केल्या गेलेल्या जमिनीपैकी जवळपास निम्मी जमीन विकासकांनी छोट्या शहरांमध्ये खरेदी केली आहे. या ६० छोट्या शहरांमध्ये घरांची विक्री २० टक्क्यांनी वाढली आहे. एकूण सहा लाख ८१ हजार १३८ निवासी युनिट्सची विक्री झाली आहे. मूल्याच्या दृष्टीने पाहिल्यास ही वाढ ४३ टक्क्यांनी वाढून ७.५ लाख कोटी रुपये झाली आहे. आलिशान घरांच्या विक्रीमुळे या वाढीला मोठी मदत झाली आहे. लक्झरी युनिट्सची विक्री एकूण मूल्याच्या ७१ टक्के होती. भारताच्या रिअल इस्टेट बाजाराचा आकार २२. ५ लाख कोटी रुपये आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत त्याचे योगदान ७.२ टक्के आहे. रिअल इस्टेटसाठी उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये गाझियाबाद, नोएडा, कल्याण, ठाणे यांसारख्या मोठ्या शहरांमधील सॅटेलाइट शहरांचा समावेश होतो. लखनऊ, जयपूर आणि भुवनेश्वर या राज्यांच्या राजधानीदेखील या श्रेणीत येतात.



# नित्य आठवू शिवरायांना

**आज काय परिस्थिती आहे पुण्याची? हिट अँड रन च्या केसेस वाढत आहेत, स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्टँड वर माता भगिनी सुरक्षित नाहीत, भर चौकात सिग्नल पोस्ट वर लघुशंका करण्या इतपत येथील मुलांचे धारिष्ट्य वाढले आहे. सोन्याचा नांगर फिरवितांना, कसबा गणेशाची स्थापना करतांना हे पुणे अपेक्षित होते? नक्कीच नाही. दुर्दैवाने शिवविचारांचा विसर पडल्याने ही परिस्थिति आली आहे.**

प्रासंगिक
मंगेश बरबडे
राष्ट्रसंचार



पुणे म्हणजे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी. छत्रपती शिवाजी महाराजांचा जिथे जन्म झाला तो शिवनेरी किल्ला पुणे जिल्ह्यातच. कसबा गणपतीची स्थापना करून मासाहेब जिजाबाईंनी ओसाड पुण्याला पुन्हा वसवले. बाळ शिवबा राजांकडून इथे सोन्याचा नांगर फिरवला. येथीलच लाल महालात शिवबाराजे बालपणी राहिले, खेळले, आणि हिंदवी स्वराज्याचे स्वप्न सुद्धा त्यांनी इथेच पाहिले. स्वराज्याची पहिली राजधानी किल्ले राजगड सुद्धा पुणे जिल्ह्यातीलच. पुण्याला अशी समृद्ध ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. सोमवार १७ मार्च रोजी फाल्गुन वद्य तृतीया म्हणजे तिथीने शिवाजी महाराजांचा जन्म दिवस. लवकरच म्हणजे ५ वर्षांनी २०३० साली आपण महाराजांची ४०० वी जयंती साजरी करू. पण जयंती साजरी करू म्हणजे नक्की काय करायचे? आज काय परिस्थिती आहे पुण्याची? हिट अँड रन च्या केसेस वाढत आहेत, स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्टँड वर माता भगिनी सुरक्षित नाहीत, भर चौकात सिग्नल पोस्ट वर लघुशंका करण्या इतपत येथील मुलांचे धारिष्ट्य वाढले आहे. सोन्याचा नांगर फिरवितांना, कसबा गणेशाची स्थापना करतांना हे पुणे अपेक्षित होते? नक्कीच नाही. दुर्दैवाने शिवविचारांचा विसर पडल्याने ही परिस्थिति आली आहे.

ही परिस्थिति बदलवायची असेल तर बालपणी जिजाबाई साहेबांनी शिवाजी महाराजांची जडण घडण कशी केली ते बघावे लागेल. महाराजांना रामायण, महाभारत, इतिहासातील गोष्टी जिजाबाई सांगत. संस्कृत व फारसी भाषेचा परिचय, मुळाक्षरे, गणित यासोबतच घोडेस्वारी, कुस्ती, तलवार, दांडपट्टा, धनुष बाण, भाला ई शस्त्रांचेही प्रशिक्षण महाराजांना दिले. शरीराने सुदृढ व मनाने स्थिरचित्त असे विचारी विवेकी व्यक्तित्व होते महाराजांचे. महाराजांना अन्यायाची चीड होती. महाराज मातृ-पितृ भक्त होते.

शहाजीराजांच्या अपघाती निधनानंतर मासाहेब सती जाणार होत्या, महत्प्रयासाने महाराजांनी त्यांना परावृत्त केले. त्याच



कालावधीत नेमके सूर्यग्रहण होते. मासाहेबांची नाजुक मनोवस्था बघता, त्यांना बरे वाटावे म्हणून, आणि तत्कालीन चालीरीतीप्रमाणे ग्रहणपर्वात पुण्यसंचयासाठी दान करण्याचे दृष्टीने महाराजांनी महाबळेश्वर येथे मासाहेबांची सुवर्णतुळा केली होती. ज्या काळात स्त्रीला उपभोग्य वस्तु यापेक्षा जास्त काही समजत नव्हते तेंव्हा महाराजांनी आपल्या आईच्या वजनाइतके सोने दान केले. केव्हडा मोठा सन्मान. महाराजांनी समस्त माता भगिनींना प्रतिष्ठा मिळवून दिली. बळजबरीने सीताहरण केल्याने रामायण घडले, भर दरबारात द्रौपदीची विटंबना केल्याने महाभारतात १८ अक्षौहिणी सैन्याचा संहार झाला. या गोष्टी महाराजांनी लहानपणीच ऐकल्या होत्या. कर्नाटक मोहिमेत बेलवाडीच्या देसाईणीची अप्रतिष्ठा केली म्हणून महाराजांनी सेखोजी गायकवाडचे डोळे फोडण्याची कठोर शिक्षा केली. आजही यादवाडच्या मारुती मंदिरात त्या देसाईणीच्या लहानग्या बाळास वाटी चमच्याने दुध पाजतानाचे महाराजांचे शिल्प या गोष्टीची साक्ष देते. स्त्री स्वराज्यातील असो की शत्रू मुलूखातील, तिची प्रतिष्ठा सर्वोच्च. असे घडवले होते जिजाबाईंनी महाराजांना.

आज बदलत्या जीवनशैलीनुसार एकत्र कुटुंबपद्धती राहिली नसल्याने संस्कार करणारे आजी आजोबा घरात नाहीत. छोट्या कुटुंबात आई वडील दोघेही नोकरी करत असल्याने तेही वेळ देऊ शकत नाही. मुलं पाळणाघरात, हे वास्तव आपण बदलू शकत नाही. पण आपण पुणेकर किमान एक गोष्ट नक्कीच करू शकतो. सोमवार १७ मार्च फाल्गुन वद्य तृतीयेला शिवजयंतीच्या दिवशी आणि इतरही दिवशी, शनिवार, रविवार, सुटीच्या दिवशी, जेंव्हा जमेल तेंव्हा आपल्या मुलांना घेऊन लाल महालात जायचे. त्या ठिकाणी त्यांना महाराजांच्या गोष्टी सांगायच्या. एक चांगले शिवचरित्र त्यांना वाचायला द्यायचे. महाराजांनी आपल्याला हिंदवी स्वराज्य दिले. आज स्वराज्याचा अर्थ आपण स्वैराचार घेत आहोत. तसे होऊ नये म्हणून नवीन पिढीसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवायचा. यावर्षी शिवजयंतीला हाच संकल्प आपण सगळे करूया. महाराज मातृभक्त होते आणि जिजाबाई गणेश भक्त होत्या. गणेशोत्सव ही आपल्या पुण्याची खास ओळख आहे. तो बुद्धीदेवता गणेश वर्षभर शिवचरित्राचा जागर करण्याची बुद्धी आपल्या सगळ्यांना देवो हीच प्रार्थना.

# भानौपो-तमल



**भारतीय नौसेनेच्या कार्यादेशानुसार तलवार-वर्गातील शेवटची युद्धनौका रशिया मध्ये बांधून तयार आहे आणि भारतीय नौसेनेकडे सुपूर्त करून सेवेत दाखल करण्यासाठी पीटर्सबर्ग येथे सिध्द आहे. २०० भारतीय नौ-सैनिक. सर्व प्रकारच्या स्वीकृती चाचण्या घेण्यासाठी रशियाला गेले असून जून २०२५ मध्ये भानौपो-तमल ही युद्धनौका भारतीय नौसेनेच्या सेवेत दाखल होईल.**

युद्धनौका
काशीनाथ देवधर
राष्ट्रसंचार

धारदार तलवारी प्रमाणे भानौपो-तमल या युद्धनौकेची अचूक प्रहार आणि उच्च गतिशीलते साठीची रचना व बांधणी केली आहे. एकाच मोहिमेवर ३००० किमी जाण्याची कार्यक्षमता असून ही ३० नॉट्स (समुद्र मैल) अर्थात 55 किमी प्रति घण्टा वेगाने मार्गक्रमण करू शकते. ही युद्धनौका स्टेल्थ तंत्रज्ञान चा पुरेपूर उपयोग करून जहाज बांधणी केली आहे.

स्टेल्थ तंत्रज्ञान म्हणजे ही युद्धनौका सहजतेने दिसणे, शोधणे दुरापास्त असेल, अगदी दूरबीण, रडार, सोनार,अवरक्त किरणे (Infrared) अशा पध्दती ने बघणे अथना किंवा शोधणे कठिण असते. भानौ पो-तमल याचे अजुनि वैशिष्ट्य म्हणजे ही युद्धनौका निर्देशित क्षेपणास्त्र ही अद्ययावत व अत्याधुनिक पद्धतीने डागण्याची क्षमता शत्रू साठी भयंकर ठरते. ही युद्धनौका विनाशिका वर्गातील युद्धनौकां पेक्षा लहान असतात आणि याची लांबी केवळ १२५ मीटर असून ३९०० टन पाणी विस्थापित करते त्यामुळे अतिशय हलकी व लहान असूनही जबरदस्त प्रहारक्षमता हे याचे महत्व.

या युद्धनौका बांधणीत 26% वाटा हा भारतीय उत्पादकांचा, उद्योगांचा आहे, अशा तलवार वर्गातील अत्यंत प्रगत तंत्रज्ञान युक्त रशियाने बांधलेल्या या भारतीय नौदलच्या शेवटच्या युद्धनौकेचे स्वागत करायला आपण तयार आहोत व जून २०२५ मध्ये ही सेवारत होऊन आपले सामुद्री सामर्थ्यात भर पडेल.

भानौपो- तलवार वर्गातील, तलवार, त्रिशूल आणि तबर या तीन युद्धनौका भारताने २००२-२००३ मध्ये रशिया कडून खरेदी केल्या. त्यानंतर २००६ च्या जुलै मध्ये भारत-रशिया यांच्या मधे त्याच वर्गातील अजूनि तीन युध्दनौका ज्यावरून ब्राह्मोस क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता असणाऱ्या युद्धनौका विकत घेण्याचा करार झाला. तेग, तर्कश आणि त्रिखंड २०१२ -२०१३ मध्ये त्या सेवेत दाखल झाल्या.

सप्टेंबर २०१६ मध्ये रशिया सोबत भारताने करार करून दोन अद्ययावत व अत्याधुनिक अशा भानौपो-तलवार वर्गाच्याच युद्धनौका रशिया मध्ये निर्मिती व बांधणी करून भारतीय नौसेनेत सेवेमध्ये येणार आणि त्याच वर्गातील अजुनि दोन युद्धनौका मात्र गोवा शिपयार्ड लिमिटेड या भारतातील जहाज बांधणी कारखान्यात उत्पादन / निर्माण करणार, मात्र रशिया व भारत दोन्हींच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून युद्धनौका अधिक सरस बनवणार. याच करारा नुसार भानौपो तुशील (INS-TUSHIL) ही युद्धनौका भारतीय नौदलाच्या सेवेत डिसेंबर २०२४ मध्ये संमिलीत झाली आणि आत्ता दुसरी म्हणजेच रशियातून येणारी शेवटची युद्धनौका जून २०२५ मध्ये नौसेनेच्या सेवेत रुजू होईल. राहिलेल्या दोन युद्धनौका भारतातच 'गोवा शिपयार्ड लिमिटेड' येथे निर्माण केल्या जातील त्यासाठी रुपये १३००० कोटींचा रशिया बरोबर करार झाला आहे, तसे भारत सरकारने ३० जानेवारी २०१९ ला 'गोवा शिपयार्ड लिमिटेड' ला कळवले.

या दोन युध्द नौकांमध्ये भारतीय प्रणाली/उप-प्रणाली यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जाणार आहे. या युद्ध नौकांच्या वर्गाला त्रिपूट (Triput) नाव देण्यात आले आहे. या नवीन वर्गाच्या युध्द नौकांवर BHEL (Bharal Heavy Electricals Limited) या भारतीय कंपनी निर्मित 76mm Gun, आणि बाकीचे शस्त्रास्त्र प्रणाली आणि संयंत्रे (sensors) उपयोगात आणण्यात येईल. जुलै 2024 मध्ये उत्पादन / निर्मिती सुरु झाली असून 43000 kW शक्ति चे (58000 अश्वशक्ती चे पॉवर प्लांट आणि 'मायक्रो प्रोसेसर कंट्रोल सिस्टीम' लावणार असून 2026-2027 मध्ये त्या दोन्ही युद्धनौका भारतीय नौसेनेच्या सेवत सहभागी होतील.

INS तमल युद्धनौका ही मुळातच ब्लू-बॉटर ऑपरेशन्स म्हणजेच खोल व दूर समुद्रातील कारवाई साठी असून नौसेनेच्या सर्व मितीच्या युध्दासाठी उदा० हवाई, जमिनी वर, पाण्याखालील युद्ध अथवा इलेक्ट्रॉनिक युद्ध या सर्व बाजू भक्कम असून युद्ध सिद्ध असणार आहेत.

INS-TAMAL भानौपो-तमल वर्गात असलेल्या युद्धनौकां करता सुसज्य अशी ७६ मिमी एस आर जी एम (Super Rapid Gun Mount) यामुळे नौदलीय युद्धशास्त्रांत तोफखान्याचे कार्यक्षमता वाढ झाली असते. त्याच प्रमाणे मुख्य क्षेपणास्त्रे डागण्या साठी ८ नलिकांद्वारा उर्ध्वगामी अग्निबाण प्रक्षेपक, दोन स्वदेशी त्रिपल टॉर्पेडो लॉंचर(ITTL), ३२४ मिमी व्यासाच्या टार्पिडो साठी निर्देशन आणि नियंत्रण प्रणाली तसेच Shtil SAM हे जमिनीवरून हवेतील शत्रू नष्ट करण्यासाठी असून स्व संरक्षण आणि आक्रमण दोन्हीसाठी प्रभावी क्षेपणास्त्रे डागण्याची क्षमता ही अन्य शस्त्रास्त्रे बरोबर विशेष त्वाने असेल.

**विश्वगुरुत्वाकडे वाटचाल**

अशा या रशियातून येणाऱ्या शेवटच्या क्षेपणास्त्र स्टेल्थ बोटी चे स्वागत करण्याने भारताची समुद्री शक्ती वाढतेच आहे पण अत्यंत आनंदा ची बाब, गोष्ट म्हणजे इथून पुढ अशा युद्धनौका सुध्दा भारतातच बनतील व स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करून हे क्षेत्र ही आपण पादाक्रांत केलेले असेल. "आत्मनिर्भर भारत" जगात या प्रमाणेच प्रत्येक क्षेत्रातील आपली ताकद वाढवत असून" रक्षा तंत्रज्ञानात" तर प्रामुख्याने स्वावलंबी होऊन विश्वगुरुत्वा कडे वाटचाल तेजीने करतोय.



# इलेक्ट्रॉनिक शाई

**आज संगणकाची विविध रूपे आपण पाहतो, ऐकतो, वापरतोही. किंबहुना आजच्या सेलफोन, व्हीडिओ गेम कॉन्सोल तसेच संगीतविषयक, वैद्यकीय आणि इतर अनेक उपकरणांमध्ये एक 'मूर्ती लहान पण कर्तृत्व महान' असलेला संगणक बसलेला असतो गेल्या दोन दशकांमध्ये संगणक ही वस्तू अगदी लहान गावांमध्येही राहणाऱ्या बहुसंख्य नागरिकांच्या परिचयाची झाली आहे.**



तंत्रज्ञान
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार
deepak@deepakshikarpur.com
संगणक तज्ञ

संगणकाच्या विविध क्षमतांची आणि वेगवान कार्यपद्धतीची भरपूर उदाहरणेदेखील आपणांस दिसतात. संगणकात वापरल्या जाणाऱ्या विविध उपघटकांच्या स्वरूपात गेल्या दशकात आमूलाग्र बदल झाल्याने त्यांचा आकार अक्षरशः दर महिन्याला कमी-कमी होत चालला आहे (आणि त्याच प्रमाणात कार्यक्षमता वाढते आहे) हे आपण सर्वजण डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहतोच आहोत. आजचे आधुनिक संगणक आणि तत्सम इतर उपकरणे ह्यांमधील सीमारेषा पुसट होत चालली आहे – म्हणजे असे की मनोरंजनाच्या साधनांमध्ये संगणकीय प्रणालींचा वापर वाढतो आहे तर संगणकाकडून आपणांस कामाबरोबरच मनोरंजन, संभाषण, आर्थिक व्यवहार ह्यांसारख्या बाबी मिळू लागल्या आहेत. सध्याच्या दिवसांत 'इ' (e) म्हणजेच इलेक्ट्रॉनिक हा प्रत्यय आपल्या दैनंदिन व्यवहारांशी संबंधित बहुतेक सर्वच बाबींना लावता येतो, नाही का? इ-प्रशासन, इ-पेमेंट, इ-खरेदी...आता इलेक्ट्रॉनिक शाई उर्फ 'इ-इंक' देखील विविध कामांसाठी उपयोगात आणली जात आहे, अगदी किंडल पासून इमारतींच्या अंतर्गत सजावटीपर्यंत. कशी ते वाचू.

गेल्या काही वर्षांत इ-इंकने 'इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले' ह्या प्रकारात चांगलेच पाय रोवायला सुरूवात केली आहे. अनेक पुस्तके प्रत्यक्ष संग्रही न ठेवता इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वाचण्याची मोठी सोय 'किंडल' ह्या साधनाने करून दिली आहे. तर आता इ-इंकचा वापर मोठे मॉल तसेच डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये केला जात आहे – वस्तूंवरील किमतीची लेबले बनवण्यासाठी आणि त्यांवरील माहिती बदलण्यासाठी! इमारतींची अंतर्गत सजावट करणाऱ्यांना म्हणजेच इंटेरिअर डेकोरेटर्सना इ-इंकमुळे एक नवीनच संधी मिळाल्यासारखे झाले आहे. ह्या इंकच्या विकसकांनी प्रिझम ही नवी फिल्म सादर केली आहे. ग्राहकाची गरज आणि आवडीनुसार घरातील भिंतींचा रंग, पोत आणि त्यावरील चित्रे इ. बदलत राहणे (ऍनिमेटेड पॅटर्न्स) इलेक्ट्रॉनिक इंक आणि प्रिझम फिल्ममुळे शक्य होणार आहे. "इ-इंक हे तंत्रज्ञान इ-बुक रीडर्स आणि प्राइस-टॅग्ज व्यतिरिक्त इतर अनेक ठिकाणी व अनेक प्रकारे वापरले जाऊ शकते" असे 'इ-इंक होल्डिंग्ज' ह्या कंपनीचे अध्यक्ष फ्रँक को ह्यांचे म्हणणे आहे. "प्रिझम ही आमची संकल्पना प्रत्येक वास्तूला सतत नव्या रूपात सादर करू शकेल." असेही ते म्हणतात. म्हणजे असे की खोलीची एखाद्या भिंतीवर (किंवा जिथे भिंत बांधणे गरजेचे अथवा शक्य नसेल अशा ठिकाणी लावलेल्या) प्रिझम च्या पडद्याचा रंग, एक बटण दाबून, वापरकर्त्याच्या पसंतीनुसार बदलता येईल. ही फिल्म भिंतीप्रमाणेच दरवाजे तसेच खिडकीच्या पडद्याच्या रूपात वापरता येते आणि छताला देखील आतील बाजूने लावता येते. हिचा रंग बदलण्याच्या पुढची पायरी म्हणजे तीवर चित्रे किंवा ऍनिमेशन्सही दाखवता येतात. ह्याचा चटकन डोळ्यापुढे येणारा एक व्यावहारिक उपयोग म्हणजे मोठ्या व्यावसायिक किंवा निवासी संकुलांमध्ये नवागताला मार्गदर्शन करणारे बदलते फलक. किंवा एखादी कॉन्फरन्स चालू असताना ती खोली 'बिझी' असल्याचे तिच्या दारावर दर्शवता येईल. किंवा एखाद्या प्रदर्शनाच्या स्थळी तेथील स्टॉल्सच्या रचनांचे आरेखनही...ह्या फिल्मच्या पृष्ठभागाचा पोत देखील बदलता येतो (म्हणजे किंचित परावर्तक किंवा प्लास्टिक इमल्शन पेंटसारखा दिसणारा इ. इ.). ही प्रक्रिया पूर्णपणे 'प्रोग्रामेबल' असल्याने ग्राहकाच्या गरजेनुसार तिचे नियोजन करता येते. अर्थात ह्या प्रोग्रामिंग साठी अगदी कमी ऊर्जा लागते असा भरवसा उत्पादकांनी दिला आहे! ही फिल्म पातळ असली तरी तिला लोकांनी जातायेता हात वगैरे लावला तरी चालतो, तसेच ती हवामानातील बदलही बऱ्यापैकी सहन करू शकते असा इ-इंक कंपनीचा दावा आहे – हो, हे गुण असणे गरजेचे आहेच! कारण हा भिंतीचा म्हणजेच अंतर्गत सजावटीचा भाग असेल तर तिला दोनचार धक्के लागणे अपरिहार्यच आहे.

ही फिल्म प्रोग्रामेबल असल्याने ठराविक काळानंतर (किंवा वैयक्तिक प्राधान्यानुसार) भिंतीचा रंग आणि तीवरील डिझाइन बदलणे ग्राहकाला शक्य होणार आहे – घराला नव्याने रंग देणे हा केवढा मोठा उद्योग आणि व्याप असतो ह्याची कल्पना बहुतेकांना असेलच! शिवाय हे काम दर 2-3 वर्षांनी करणे आवाक्याबाहेरचेच असते. त्या संदर्भात चटकन रंग बदलणारी भिंत हे एक वरदानच ठरू शकते. शिवाय आवर्ती खर्च कमी आणि डिझाइनची विविधता जास्त!

सध्या इ-इंक कंपनीने ह्या प्रिझम फिल्मचे उत्पादन छोट्या प्रमाणात सुरू केले आहे व ते 2025 च्या अखेरीपर्यंत पुष्कळच वाढवण्याची तिची योजना आहे. फक्त वास्तुविशारद, रचनाकार आणि अंतर्गत सजावटकारांचेच मार्केट डोळ्यांपुढे ठेवून उत्पादन केले जाणार असल्याने इलेक्ट्रॉनिक इंकचा वापर इ-बुक रीडर्समध्ये लगेचच होताना दिसण्याची शक्यता कमी आहे - रंगीत पुस्तके वाचण्यासाठी इच्छुक वाचकांना आणखी काही काळ वाट पाहावी लागेल!



# श्रद्धांजली सभा - दत्ता तरळगट्टी

परवा अंत्ययात्रेला जाण्याचा प्रसंग आला. एखादी व्यक्ती गेल्यानंतर निरोप मिळतो तो फोनवरून किंवा सोशल मीडियावर आलेल्या भावपूर्ण श्रध्दांजलीच्या मेसेजमुळे !!

या मेसेजच्या खाली मग ईमोजींची माळ लागते. कुणी टाईप करुन श्रध्दांजली वाहतो. कुणी नुसत्या ईमोजींचा वापर करतो.त्याच दिवशी त्याच ग्रुपवर कुणाचा तरी वाढदिवस असतो.त्याला शुभेच्छा आणि मृतात्म्यास श्रध्दांजली दोन्ही चालू होते. कुणीतरी सुचना टाकतो. उद्या वाढदिवसाच्या शुभेच्छा द्याव्यात. मग ते बंद होते.

अंत्यसंस्कारची वेळ कळविलेली असते. पण ठरलेल्या वेळेला ते होत नाही. कुणीतरी यायचे म्हणून थांबावे लागते. अरे, काय झालं कुठपर्यंत आलेत? आलेत जवळ एवढ्या उत्तरावर माणूस थांबतो. ठरल्या वेळेत सगळं झालं म्हणजे बर वाटतं. गेलेल्याला ही आणि पोहोचविणार्यांना ही!!! एकदा का उशीर होत गेला की पुढच्या सगळ्यालाच उशीर होतो.

एखादी मुलगी यायची राहिलेली असते मग ती आल्याचे समजल्यावर तिथेही थोडेवेळ थांबविले जाते. काही लोक अंत्यविधी मंत्रोच्चारसह करतात किंवा काही भडाग्णी देतात. कारण वेळ झालेला असतो लोक ताटकळलेले असतात. म्हणून लोकांच्या मन वेळेचा विचार करून लवकर आटोपते घेतले जाते. काही वेळेला अंत्यसंस्कार करणारे भटजी उपलब्ध असतील तर सर्व विधी पार पाडले जातात. खरं तर याला ही वेळ जातो पण काय करणार?जे करणे क्रमप्राप्त आहे ते करावेच लागते. सद्गती प्राप्त होईल या उद्देशाने सर्व सोपस्कार पूर्ण केले जातात.

हे सर्व मंत्राग्नी होत असताना इतस्ततः बसलेले लोक विविध प्रकारच्या चर्चा करत असतात. काही गेलेल्या व्यक्तीची,काही राजकारण, काही आणखीन वेगळी हसणे वगैरे चाललेले असते. काही लोक दूर बसून चर्चा हसणे करत असतात वाटते हे खरे मानसोपचारतज्ज्ञ असावेत. दु:खी प्रसंगातून सावरण्यासाठी काही हसण्यासारखे बोलत असावेत. जर गेलेली व्यक्ती कुणी असामान्य कर्तृत्व केलेली असेल तर मग तिथे श्रध्दांजली सभा लगेचच घेतली जाते.

सगळे विधी पार पाडून अग्नी दिल्यानंतर कुणी तरी उठतो आणि चला श्रध्दांजली वाहूयात म्हणून बोलायला सुरुवात करतो. प्रश्न असा पडतो की इतके वेळ सगळे बसून होते. तेव्हा सुरु करायला काय झालं होतं? सगळे जायला निघणार तेवढ्यात ही सभा सुरू होते. मागे लोक बोलून जातात याला आता बरं सुचलं? मग एकाच झाले की दुसरा दुसऱ्याचे झाले की तिसरा बोलणारांची माळच लागते. बरं अशा वेळी किती बोलावं हे कुणी सांगायचं. जणू काही ही व्यक्ती जाणार आहे हे गृहीत धरुन बोलायची अगोदरच तयारी केल्या सारखे काही जण बोलतात.

एक दोन चार वाक्ये बोलावित आणि थांबावं असं कुणाला वाटतच नाही. लोक केव्हापासून आले आहेत याचा विचार ही करत नाहीत. जो कुणी ज्येष्ठ नागरिक असेल त्याने बोलल्यानंतर शांतीपाठ म्हणून थांबवावे. एवढी समयसूचकता असावी असे वाटते. काही समाजात स्त्रिया स्मशानभूमीत येत नसतात. काही समाजातील तिथे येतात. कुणी एखादा क्रिया विधी झाल्यावर महिलांनी पुढे जावे म्हणजे घराकडे जा म्हणून सांगतात. समजा स्त्रियांपुढे अशी सभा सुरू राहिली तर स्त्रिया काय बोलल्या असत्या ते कल्पना करवत नाही. काही वेळेस तिथे रात्र असल्यामुळे किंवा फारच मोठी व्यक्ती असेल तर नंतर दोनतीन दिवसांनी श्रध्दांजली सभेचे आयोजन केले जाते. तिथे तर काय विचारुच नका चढाओढीने लोक बोलतात. वाटतं हे एवढं चांगलं हयातीत बोलले असतील का...?

अशा सभेत माझा आणि त्या गेलेल्याचा किती घनिष्ठ संबंध होता हे दाखविण्याचा खटाटोप करतात. गेलेल्याबद्दल बोलण्या पेक्षा मी त्याच्यासाठी काय काय केले, हे दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. काहीजण तर मगाशी ते असं म्हणाले ते कसं चुकीचे होते हे सांगून जातात. काही जण नको इतका पाल्हाळ लावतात. त्यात सुत्रसंचालक असेल तर त्याचे प्रत्येक दोन बोलणार्या व्यक्तीच्या मध्ये त्याच ही बरचसं ऐकावं लागत. ही सूत्रसंचालक मंडळी इथंही तोरा मिरवतात. कोणत्या परिस्थितीत काय आणि किती बोलावं हे बर्याच जणांना चांगलं समजत. आलेल्या लोकांपैकी जे कोणी ज्येष्ठ व्यक्ती असेल त्यांनी बोलावे व शांतीपाठ म्हणून श्रध्दांजली अर्पावी.वेळे नुसार दुखःद प्रसंगी आटोपशीर बोलायला हवं एवढच!हा एक विचार अनेकांच्या मनात असले आणि सर्वांना याचा अनुभव आलेला असेल.मी फक्त तुमच्या विचारांना पेपरवर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. समजून घ्यावे इतकेच!

# स्वतःला शोधा... यशाचे १० मंत्र



**स्वतःला शोधणे हा एक दीर्घकालीन प्रवास आहे, जो सतत सुरूच राहतो. हा प्रवास तुम्हाला केवळ यशाकडेच नाही, तर आनंदाकडेही घेऊन जातो. स्वतःशी प्रामाणिक राहा, आत्मनिरीक्षण करा, आणि तुमच्या आवडी, मूल्ये, आणि ध्येये यांचा योग्य समतोल साधा. यश मिळवण्याइतकेच स्वतःला शोधणेही महत्त्वाचे आहे, कारण बाह्य यशाने तात्पुरता आनंद मिळतो, पण स्वतःला समजून घेतल्याने कायमस्वरूपी समाधान मिळते.**



लक्षवेधी
प्रा. योगेश हांडगे-पाटील
(सहाय्यक प्राध्यापक)
राष्ट्रसंचार

### 1. स्वतःशी प्रामाणिक राहा

आपण काय आहोत, कोणत्या गोष्टी आपल्याला आनंद देतात, आणि कोणत्या गोष्टी आपल्यासाठी महत्त्वाच्या आहेत, हे समजून घेणे आवश्यक आहे. समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आपण आपल्या इच्छांकडे दुर्लक्ष करतो. म्हणून, स्वतःशी प्रामाणिक राहून, आपले खरे स्व ओळखणे गरजेचे आहे.

### 2. आत्मनिरीक्षणाचा सराव करा

दररोज काही मिनिटे शांत बसून आपले विचार, भावना, आणि कृतींचे निरीक्षण करा. कोणत्या गोष्टी तुम्हाला प्रेरणा देतात? कोणत्या परिस्थितीत तुम्ही सर्वाधिक आनंदी असता? या प्रश्नांची उत्तरे शोधा. ध्यान आणि माइंडफुलनेस हा यासाठी उत्तम मार्ग आहे.

### 3. तुमच्या मूल्यांशी जोडलं राहा

यश मिळवण्यासाठी समाजाने आखून दिलेल्या मार्गांवर न चालता, स्वतःच्या मूल्यांवर आधारित जीवन जगा. तुमच्या नैतिकतेशी, आवडीनिवडींशी, आणि तत्त्वांशी सुसंगत असेल तेच करा. बाह्य स्वीकृतीपेक्षा अंतर्गत समाधान अधिक महत्त्वाचे आहे.

### 4. आवडी आणि ध्येये स्पष्ट करा

तुमच्या आवडी काय आहेत? तुमच्या मनाला खरोखर आनंद देणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत? आपले ध्येय स्पष्ट असल्यास जीवन अधिक अर्थपूर्ण होते. तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टींकडे अधिक वेळ आणि ऊर्जा द्या.

### 5. पराभव स्वीकारा आणि त्यातून शिका

स्वतःला शोधण्याच्या प्रवासात चुका आणि अपयश येणारच. त्या गोष्टींना सकारात्मक दृष्टीकोनातून पाहा आणि त्यातून शिकण्याचा प्रयत्न करा. अपयश ही यशाच्या दिशेने जाण्याची पहिली पायरी आहे.

### 6. आत्मविश्वास आणि स्वीकृती

आपल्या कमतरता स्वीकारणे आणि त्यावर काम करणे हे स्वतःला शोधण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे आहे. स्वतःचा कमीपणा वाटून घेण्याऐवजी, त्यातून शिकण्याचा दृष्टिकोन ठेवा. स्वतःवर विश्वास ठेवल्यासच तुम्ही तुमचे सत्य जीवन जगू शकता.

### 7. सकारात्मक संगत ठेवा

तुम्हाला प्रेरणा देणाऱ्या, तुम्हाला समजून घेणाऱ्या आणि तुमच्या वाढीस मदत करणाऱ्या लोकांच्या सहवासात राहा. नकारात्मक लोकांकडून दूर राहा, कारण ते तुमच्या आत्मशोधाच्या प्रक्रियेत अडथळा आणू शकतात.

### 8. सतत शिकत राहा

नवीन गोष्टी शिकण्याची मानसिकता ठेवा. वाचन, प्रवास, नवे अनुभव आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान हे तुम्हाला स्वतःला अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेण्यास मदत करतात.

### 9. समाजाच्या मापदंडांपेक्षा स्वतःची व्याख्या ठरवा

समाज काय म्हणेल, लोक काय विचार करतील यापेक्षा तुम्हाला काय हवे आहे याचा विचार करा. बाहेरच्या जगाच्या अपेक्षांवर आधारित जीवन जगण्यापेक्षा स्वतःच्या आनंदासाठी, स्वतःच्या नियमांप्रमाणे जगा.

### 10. आभारी राहा आणि सध्याच्या क्षणाचा आनंद घ्या

स्वतःच्या जाणीवेपर्यंत पोहोचण्यासाठी, तुम्ही जे काही आहात आणि तुमच्याकडे जे काही आहे त्यासाठी कृतज्ञ राहा. भूतकाळाची चिंता किंवा भविष्याची भीती न बाळगता, वर्तमानात जगा आणि क्षणाचा आनंद घ्या.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण बाह्य यशाच्या शोधात इतके गुंततो की स्वतःला शोधण्याचा आणि समजून घेण्याचा वेळही काढत नाही. आपल्या वास्तविक ओळखीपासून आपण दूर जातो, आणि त्यामुळे मानसिक अस्वस्थता, असंतोष, व आत्मशोधाची गरज निर्माण होते. स्वतःला शोधणे म्हणजे आपले ध्येय, मूल्ये, आणि आवडी-निवडी समजून घेणे. हा शोध आपल्याला केवळ यशच नाही, तर खरा आनंदही मिळवून देतो. चला, स्वतःला शोधण्यासाठी 10 प्रभावी मंत्र जाणून घेऊया.



# प्रत्येक आरोप खरा मानता येत नाही!



**राजकारणात जसे आरोप प्रत्यारोप केले जातात. तसेच कौटुंबिक वादविवादामध्ये देखील आरोप प्रत्यारोप केले जातात. त्याचप्रमाणे विवाह्यबाह्य संबंध किवा प्रेमप्रकरणातही आरोप प्रत्यारोप केले जातात. मात्र, प्रत्येकवेळी आरोप खराच असेल, असे काही नसते. त्यामुळे एखाद्या महिलेने पुरुषावर केलेला प्रत्येक आरोप खरा मानता येणार नाही, असे निरीक्षण केरळ उच्च न्यायालयाने एका प्रकरणात मांडले आहे. - ॲड. गायत्री कांबळे**

किरकोळ कारणांवरून पती पत्नीच्या नात्यात दुरावा येण्याचे प्रमाण अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पती पत्नी आणि मुले एवढाच संसार अशी संकुचित मानसीकता आणि मनोवृत्ती वाढल्याने एकत्र कुटुंब पद्धतीला फाटा देण्यात येत आहे. त्यामुळे ज्या वेळी वादाचे प्रसंग येतील, त्या वेळी त्यातून मार्ग काढण्यासाठी वैचारिक आणि सामाजिक परिस्थितीचे आकलन करण्याची प्रकल्भता नसल्याने अतिशय कमी कालावधीत तरुण जोडप्यांचे घटस्फोट होत आहेत.

घटस्फोटांच्या प्रकरणात ही प्रगल्भता दाखविण्याची सामजस्याने प्रकरण हाताळण्याची गरज असते. तसेच गरज असते ती योग्य कायदेशीर सल्ला घेण्याची. कोणत्याही प्रकरणात योग्य कायदेशीर सल्ला घेतल्यास त्यातून बाहेर पडण्याचा एक निश्चित असा कायदेशीर मार्ग सापडतो. बहुतांशी प्रकरणात मध्यममार्ग काढला जातो. तसेच घटस्फोटांच्या अनेक प्रकरणात सुरुवातीलाच समोपचाराने वाद आरोप-प्रत्यारोप, द्वेष, अहंकार बाजूला ठेवून दोघांच्याही हिताचा मार्ग काढणे शक्य असते. तसेच काही वेळा न्यायालयाच्या माध्यमातून कायदेशीर दाद मागता येते.

परंतु, आज कुटुंबाबद्दल जी संकुचित मानसिकता सगळीकडे दिसते आहे. किबहुना तत्काळ रिझल्ट हवा, अशी प्रवृत्ती वाढत आहे. पण, भारतीय संस्कृती आणि संस्कार परंपरा पाहिली तर कुटंबाशिवाय सामाजिक व्यवस्थेला आधार प्राप्त होत नाही, हे समजून घेतले पाहिजे. केवळ नवरा-बायको आणि मुले एवढेच कुंटुब मर्यादित नाही, तर त्यात इतरांचाही समावेश आहे. कुटुंबातील पतीचे आई वडील, बहीण भाऊ तसेच पत्नीकडील तिचे आई वडील, बहीण भाऊ यांचाही विचार आपल्याला करावा लागतो. नाती ही अशी व्यापक अर्थाने एकमेकांना आधार देण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी असतात. त्यासाठीच कुटुंब व्यवस्थेला विशेष महत्त्व आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे. वैवाहिक आयुष्य नवरा-बायको पुरते मर्यादित मानले तरी कुटुंब पद्धतीमध्ये नात्यांना नातेसंबंधांना मोठे महत्त्व आहे. विभक्त झालेल्या कुटुंबाचा दुष्परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो हे कुणालाही नाकारता येणार नाही. घटस्फोट ही सर्वांत वेदनादायी गोष्ट असते. अपत्य असलेल्या दाम्पत्यांसाठी तर घटस्फोट क्लेषकारक असतो. त्यातून आरोप-प्रत्यारोप होतात. प्रत्येक वेळी आरोप प्रत्यारोपांमध्ये तथ्य नसते, असे नाही. पण, एखाद्या महिला किंवा पुरुषाने केलेला आरोप हा प्रत्येकवेळी खराच असेल, असेही नसते. असेच एक प्रकरण केरळ उच्च न्यायालयासमोर आले होते. त्याची सुनावणी करताना न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिपण्णी केली आहे.

काही महिन्यांमध्ये देशभरात पत्नी छळ करते असा आरोप करून पुरूषांनी आत्महत्या केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यानंतर महिला त्यांच्यासाठी असलेल्या कायद्यांचा वापर करून पुरूषांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवत असल्याचे आरोपही झाले होते. अशात आता, केरळ उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'लैंगिक गुन्ह्यांसह गुन्हेगारी प्रकरणांमध्ये, तक्रारदार महिलेने सांगितलेली प्रत्येक गोष्ट 'सत्य' आहे असे गृहीत धरता येणार नाही. कारण आजकाल अशा प्रकरणांमध्ये निष्पाप लोकांना अडकवण्याची प्रवृत्ती वाढली आहे.'

माजी महिला कर्मचाऱ्याचा लैंगिक छळ केल्याच्या आरोपाखाली एका पुरूषाला अटकपूर्व जामीन मंजूर करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले आहे.

उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'या प्रकरणात, पोलिसांनी आरोपीच्या सुरुवातीच्या तक्रारीची चौकशी केली नाही. महिला योग्यरित्या काम करत नसल्यामुळे तिला कामावरून काढून टाकले होते. त्यानंतर महिलेने आरोपीला शिवीगाळ करत धमक्या दिल्या होत्या.'

न्यायालयाने असेही म्हटले आहे की, 'फौजदारी खटल्याचा तपास म्हणजे तक्रारदार आणि आरोपी यांच्या प्रकरणाची चौकशी करणे. फक्त तक्रारदाराने मांडलेल्या प्रकरणाची एकतर्फी चौकशी होऊ शकत नाही. केवळ तक्रारदार महिला असल्याने, सर्व प्रकरणांमध्ये तिचे म्हणणे खरे असेलच असे नाही. तरीही पोलीस आरोपीची बाजू समजून न घेता तिच्या जबाबाच्या आधारे पुढे जातात.'

खोट्या गुन्ह्यांमुळे एखाद्या नागरिकाचे झालेले नुकसान केवळ पैशाने भरून काढता येत नाही. 'एका खोट्या तक्रारीमुळे त्याची सचोटी, समाजातील स्थान, प्रतिष्ठा इत्यादी गोष्टींना धक्का लागू शकतो. तपासाच्या टप्प्यातच गुन्हेगारी प्रकरणांमध्ये सत्य शोधण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी सतर्क राहिले पाहिजे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

## ...तर महिलांवरही कारवाई

'आजकाल लैंगिक अत्याचाराच्या गंभीर आरोपांसह निर्दोष लोकांना गुन्हेगारी प्रकरणांमध्ये अडकवण्याची प्रवृत्ती वाढली आहे,' असे म्हणून जर पोलिसांना वाटत असेल की महिला खोटे आरोप करत आहेत, तर ते त्यांच्यावरही कारवाई करू शकतात, असा सल्लाही न्यायालयाने पोलिसांना दिला आहे.

## आरोप-प्रत्यारोप

या प्रकरणात, महिलेने आरोप केला होता की, आरोपी हा ती महिला ज्या कंप्नीत काम करत होती त्या कंपनीचा व्यवस्थापक होता. त्याने लैंगिक हेतूने तिचे हात धरले होते. दुसरीकडे, संबंधित पुरुष आरोपीने महिलेकडून होणाऱ्या गैरवर्तन आणि धमक्यांबाबत पोलिसांकडे तक्रार केली होती. याचबरोबर महिलेने ज्या धमक्या दिल्या होत्या त्याचे ऑडिओ रेकॉर्डिंग असलेले पेन ड्राइव्ह देखील न्यायालयात सादर केले होत



# आधुनिक काळातील विज्ञानसूर्य : स्टीफन हॉकिंग





स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ साली इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे झाला. त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग जीवशास्त्राचे संशोधक होते. स्टीफन हॉकिंग यांच्या जन्माच्या वेळी डॉ. फ्रँक आणि इसाबेल या दाम्पत्याने उत्तर लंडनहून ऑक्सफर्ड येथे स्थलांतर केले, कारण तेंव्हा दुसरे महायुद्ध चालू होते. पण काही दिवसांतच ते पुन्हा लंडनला परतले कारण त्यांचे वडील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनमध्ये पार्सिटोलॉजी विभागाचे प्रमुख बनले होते. १९५० मध्ये हॉकिंग कुटुंबाने सेंट अल्बान्स येथे स्थलांतर केले. येथेच १९५० ते १०५३ अशी तीन वर्ष त्यांनी सेंट अल्बान्स स्कुल फॉर गर्ल्स या शाळेत शिक्षण घेतले. ही शाळा मुलींची असली तरी तिथे मुलांनाही प्रवेश दिला जात होता. स्टीफन लहानपणापासून हुशार होते. त्यांना गणित, भौतिकशास्त्र आणि संगीताची खूप आवड होती. स्टीफन हॉकिंग यांनी ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात विश्व उत्पत्ती शास्त्राचे संशोधन करण्यासाठी प्रवेश घेतला, पण अवघ्या २१ व्या वर्षी अमायो ट्रॉपिक लॅटरल स्क्लोरोसिस (एएलएस ) या असाध्य रोगाने त्यांना ग्रासले. स्टीफन हॉकिंग जेमतेम दोन वर्ष जगतील असे त्यांना सांगण्यात आले. आधी ते खूप निराश झाले पण त्याच इस्पितळातील एका रोग्याला पाहून त्यांना आशेचा किरण दिसू लागला. या आजाराने त्यांना बहुविकलांगत्व आले. चालण्याफिरण्यासाठी त्यांना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला. मग व्हील चेअरवर एक संगणक जोडण्यात आला. फक्त एक बोट

**व्यक्तिवेध**
**-श्याम ठाणेदार**
**राष्ट्रसंचार**

वापरुन ते संगणकावर काम करू लागले. १९८५ साली त्यांना न्यूमोनिया झाला. त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली या शस्त्रक्रियेनंतर त्यांचा आवाजही गेला पण त्यांनी हार मानली नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती, सकारात्मकता, कार्यमग्नता आणि जीवनाविषयीचे प्रेम या गुणांच्या जोरावर त्यांनी दुर्धर आजारावर मात करीत कृष्णविवरासंदर्भात अनेक संशोधन करुन जगाला अचंबित केले. कृष्णविवरासंदर्भात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या ब्रिफ हिस्ट्री ऑफ टाईम या पुस्तकाने अनेक विक्रम केले. या पुस्तकावर आधारित अनेक मालिका व चित्रपट निघाले. रॉजर पेनरोज या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी सापेक्षतेवादाच्या सिद्धांतावर आधारित अवकाश व काळाची सुरवात बिगबँगमध्ये झाली असेल तर कृष्णविवरात शेवट असेल असा सिद्धांत मांडला. कृष्णविवरे काळी नसतात. कृष्णविवरे उत्सर्जन करतात. ब्रह्मांडाला कोणतीही सीमा नाही असे सिद्धांत त्यांनी मांडले. त्यांची अनेक संशोधने ही काळाच्या पुढची होती. म्हणून त्यांना आधुनिक काळातील न्यूटन असे म्हणतात. स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी व स्तिमित करणारे आहे. काळाच्या पुढे असणारा हा शास्त्रज्ञ आधुनिक काळात होऊन गेला, ही गोष्टच पुढील पिढीला स्तिमित करणारी ठरेल. स्टीफन हॉकिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



# जब खोक्या 'गंगा नहाये' ...!

**जुलमी राजवट म्हणजे किती असावी ? आणि या राजवटीच्या मुखियांचे चेहरे देखील किती लबाड आणि ढोंगी असावेत याला काही प्रमाण आहे का? आता बघा ना प्रयागराजच्या त्रिवेणी संगमात डुबकी लावल्यानंतर सर्व पापांपासून मुक्तता होते हे आमच्या प्रभागातील बूथ प्रमुखा पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत प्रत्येकाने सांगितलं . मोठ मोठ्या धर्माचाऱ्यांनी देखील यावर शिक्कामोर्तब केले.**



'पापांपासून मुक्ती' म्हणजे ही गेल्या 144 वर्षांनंतर आपल्याला मिळालेली एक अनमोल संधी आहे .किंबहुना आपल्या पिढीमध्ये ही आपल्याला मिळालेली एकमेव संधी आहे .

आता यावर तुम्ही _ आम्ही जसा विश्वास ठेवला तसा खोक्या भाऊंनीही ठेवला. !!

इतकी मोठी संधी साधण्यासाठी खोक्या प्रयागराजला गेला. त्याने तेथे डुबकी लावली. गेल्या बारा वर्षात तो कधीही प्रयागला गेला नाही. प्रयागराजच नव्हे इतक्या वर्षात आलेल्या अनेक लहान मोठ्या कुंभमेळ्यांनाही त्याने कधी हजेरी लावली नाही .

मनसोक्त आणि सुखेनैव संचार करत त्याने आयुष्य जागवले . पैके कमावले. तसे उधळलेही. नोटांची बंडल फेकली. हात सळसळू लागले की काठी घ्यायची आणि समोरच्याला उताणा करत त्याचे तळपाय बडवायचे..... नामचीन गुंडच नव्हे तर थर्ड डिग्री देणाऱ्या पोलिसांनाही अशा कल्पना सुचू शकत नाहीत अशा नवनवीन कल्पना खोक्याच्या 'सुपीक' डोक्यातून आल्या. त्याने त्यावर मतदारसंघात ( चार-पाच) बऱ्यापैकी वचक



**विश्लेषण**
**अनिरुद्ध बडवे**
**राष्ट्रसंचार**

बसवला.

आता हे सगळं करत असताना त्याला जर तुम्ही गुन्ह्याचं, कलंकाचं , पापाचं _ शापाचं लेबल लावत असाल तर तो विषय वेगळा..!

बरं आता तुम्हीच सांगितलेल्या आणि पाजळलेल्या धर्मप्रकांडपांडित्या बरहुकूम , मुक्त होण्याकरिता प्रयागराजला गेला आणि तेथेच घात झाला .

बारा वर्षात एवढे माखलेले रक्ताचे हात भिजवून आणि ते पुन्हा दहादा धुवून देखील त्याच्यावर तुम्ही एकही कलंक लावू शकला नाही, मात्र प्रयागराच्या भूमीवर पाऊल ठेवताच थेट तीन तीन गुन्हे तुम्ही दाखल केले .

म्हणजे एकीकडं पाप मुक्त , शाप मुक्त होण्यासाठी तुम्ही रस्ते दाखवायचे आणि तेथे जाऊन मुक्त झाल्याचा आनंद व्यक्त करत असताना तुम्ही' जुन्या पापांचा हिशोब' लावत बसायच . हा कुठला न्याय ?

बंटी और बबली मधला शेवटचा प्रसंग आठवला . आयुष्यभर खोट्या नावाने प्रवास करणारा बंटी मौज मजेत जगतो. पहिल्यांदाच सहारनपुरच्या स्टेशनवर आपलं खरं नाव सांगतो आणि तिथेच तो पकडला जातो.... बिचारा खोक्याचं असंच काहीतरी झालं ! म्हणजे गेली बारा वर्षे चाललं होतं तेच 'आमचं बरं चाललं होतं', उजळ माथ्याने खोक्या बागडत होता.. गंगा , भागीरथी , यमुना-जमुना अशा प्रवाहांच्या दिशेला पोहण्याचेच नव्हे , चालण्याचे नव्हे तर तिकडे बघण्याचा देखील मोह त्याला झाला नाही.

मात्र पापक्षालनाच्या तुमच्या धर्मकथांवर विश्वास ठेवून तो प्रयागराजला गेला आणि स्वतःचा घात करून घेतला. आता कोण विश्वास ठेवेल तुमच्या या शुद्धीकरणाच्या कथा कहाण्यांवर ???

हे काही पटलं नाही . पुण्यमान खोक्याचा सुरू असलेला प्रवास आता शापयुक्त खोक्याच्या वेदनामय रस्त्याने जाईल.

आता खोक्या बाहेर आल्यावर धस _ मुंडे _ फुंडे सगळ्यांना सोडून मनसे जॉईन करणार आहे . कारण पोलिसांनी मुस्क्या आवळून त्याला परत आणण्याच्या बातम्या बघितल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्याला विमानातून आणले आहे आणि ते आणताना त्याच्या हातात त्याच्या हाय प्रोफाईल मोबाईलवर त्याने राज ठाकरे यांचे' गंगा नहाये' बाबतची मिमिक्री पाहिली आहे. आता केवळ राज ठाकरे यांच्यावरच विश्वास राहिला आहे !!

|| जय गंगे | नमामि गंगे ||

# बॉहो हॅट आणि स्कार्फ






**तरुणींसाठी बॉहो हॅट आणि स्कार्फ हे केवळ फॅशन स्टेटमेंट नाही, तर आत्मविश्वास व्यक्त करण्याचे साधन आहे. ही ॲक्सेसरीज कोणत्याही आउटफिटला खास लूक देतात आणि वेगळी ओळख निर्माण करतात. म्हणूनच, स्टायलिश आणि बिनधास्त राहायचे असेल, तर आपल्या वॉर्डरोबमध्ये बॉहो हॅट आणि स्कार्फ या दोन गोष्टी असायलाच हव्यात !**

आजच्या फॅशनच्या जगात, तरुणींमध्ये स्वतःची स्टाईल ठरवण्याची मोठी उत्सुकता असते. प्रत्येक व्यक्तीला आपली वेगळी ओळख निर्माण करायची असते, आणि म्हणूनच फॅशन ही केवळ कपड्यांपुरती मर्यादित न राहता संपूर्ण स्टाईल स्टेटमेंट बनते. त्यात ॲक्सेसरीजला खूप महत्त्व असते. बॉहो हॅट आणि स्कार्फ या दोन ॲक्सेसरीज अशा आहेत ज्या केवळ स्टायलिशच नाहीत, तर त्या व्यक्तिमत्त्वालाही एक वेगळा एज देतात.

**बॉहो हॅट – फॅशन आणि मोकळेपणाचा मिलाफ**

- बॉहेमियन म्हणजे मुक्त विचारसरणी, कला, स्वातंत्र्य आणि नैसर्गिक सौंदर्याचा संगम. बॉहो हॅट म्हणजे याच गोष्टींना अधोरेखित करणारी एक स्टायलिश ॲक्सेसरी. सध्या तरुणींमध्ये बॉहो हॅट्सचा खूप ट्रेंड आहे. ह्या हॅट्स वेगवेगळ्या प्रकारांत उपलब्ध आहेत आणि वेगवेगळ्या प्रसंगानुसार त्या परिधान करता येतात.
- बॉहो हॅटचे प्रकार आणि त्यांचा प्रभाव
- **फ्लॉपी हॅट** – मोठ्या आकाराच्या आणि मऊ काठाच्या हॅट्स उन्हाळ्यासाठी आणि बीच लूकसाठी परफेक्ट असतात.
- **फेडोरा हॅट** – थोड्या रफ अँड टफ लूकसाठी उत्तम पर्याय. ह्या हॅट्स कोणत्याही वेस्टर्न किंवा फ्युजन लूकला एकदम क्लास देतात.
- **पॅनामा हॅट** – हलक्या आणि आरामदायी कापडाच्या ह्या हॅट्स उन्हाळ्यासाठी सर्वोत्तम आहेत.
- **काऊबॉय हॅट** – जर तुम्हाला रग्ड आणि बोल्ड लूक हवा असेल तर काऊबॉय हॅट परफेक्ट आहे.
- **स्कार्फ** – स्टाईल आणि सोयीचा अनोखा मिलाफ
- स्कार्फ ही अशी ॲक्सेसरी आहे जी अनेक प्रकारांनी स्टायलिश आणि उपयुक्त असते. याचा उपयोग डोक्यावर, गळ्यात किंवा अगदी टॉप किंवा बेल्ट म्हणूनही करता येतो. एका साध्या आऊटफिटला स्कार्फ एका क्षणात क्लासी लूक देऊ शकतो.



**फॅशन**
**ज्योती हांडगे, पुणे**
**राष्ट्रसंचार**


- **स्कार्फचे प्रकार आणि स्टाईलिंग टिप्स**
- **सिल्क स्कार्फ** – हाय-फॅशन लूकसाठी वापरण्याजोगा, खास करून फॉर्मल आणि क्लासी आउटफिटसाठी.
- **कॉटन स्कार्फ** – कॅज्युअल वेअर किंवा उन्हाळ्यासाठी सोयीस्कर पर्याय.
- **वूलन स्कार्फ** – हिवाळ्यात उबदार आणि स्टायलिश दिसण्यासाठी उत्तम.
- **लॉन्ग स्कार्फ (स्टोल)** – हा गळ्यात गुंडाळून किंवा ओढणीसारखा वापरता येतो.
- **बॉहो हॅट आणि स्कार्फ** – परफेक्ट स्टाईल स्टेटमेंट
- ही दोन्ही ॲक्सेसरीज वेगवेगळ्या प्रसंगांसाठी परिधान करता येतात. काही स्टाईलिंग टिप्स –
- **कॅज्युअल डे आउट** – हलका फ्लोवी ड्रेस, फ्लॉपी हॅट आणि सिल्क स्कार्फ याने स्टायलिश लूक मिळतो.
- **बीच वेअर** – पॅनामा हॅट आणि टसर सिल्कचा स्कार्फ यामुळे बीचवर खास लूक मिळतो.
- **विंटर लूक** – वूलन स्कार्फ आणि फेडोरा हॅट तुमच्या विंटर वेअरला परफेक्ट टच देतात.
- **बोल्ड आणि बिंधास्त लूक** – काऊबॉय हॅट आणि क्रिएटिव्हली बांधलेला स्कार्फ तुमचा फॅशन सेन्स दर्शवतो.
- **फॅशनपेक्षा जास्त** – बॉहो स्टाइलचे आत्मभान
- बॉहो स्टाईल ही केवळ फॅशन नाही, तर एक विचारसरणी आहे. बॉहेमियन स्टाईल म्हणजे प्रयोगशीलता, स्वातंत्र्य आणि कलात्मक अभिव्यक्ती. म्हणूनच तरुणींना ह्या स्टाईलचा फारसा आकर्षण वाटतो. बॉहो हॅट आणि स्कार्फ ही ॲक्सेसरीज केवळ शोभेसाठी नाहीत, तर त्या व्यक्तिमत्त्वालाही ठळक करतात.



**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ( आरबीआय) सर्व बँकांची नियामक तर सिक्युरिटीज अँड एक्सचेंजेस बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) भांडवल बाजाराची प्रमुख नियामक संस्था. मुंबईतील न्यू इंडिया बँकेच्या पाठोपाठ इंडसइंड बँकेतील अनियमितता, अयोग्य जोखीम व्यवस्थापन, इन्सायडर ट्रेडिंग यामुळे पुन्हा एकदा लाखो भागधारकांना कोट्यावधी रुपयांचा "चुना" लागला आहे. या पार्श्वभूमीवर हे दोन्ही नियामक खरोखरच लायकीचे किंवा योग्य क्षमतेचे आहेत किंवा कसे हा गंभीर प्रश्न निर्माण होतो. फक्त "दुर्वा"उपटण्याचे काम या नियामक संस्था करतात काय? त्यांना जाब विचारण्याची व संबंधितांवर कडक कारवाई करण्याची गरज आहे. इंडसइंड बँक प्रकरणाचा घेतलेला धांडोळा.**

# 'रिझर्व्ह बँक' व 'सेबी' फक्त "दुर्वा" उपटतात काय ?





आर्थिक
प्रा.नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

इंडसइंड बँकेने गेल्या पाच वर्षात त्यांचा व्यवसाय वाढवताना अनिवासी ठेवींवर (एनआरआय) विशेष भर दिलेला होता. गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी जादा व्याजदरही देण्यात येत होता. बँकेच्या ताळेबंदानुसार डिसेंबर 2024 अखेरच्या तिमाहीमध्ये बँकेकडे 58 हजार 600 कोटी रुपयांच्या अनिवासी ठेवी होत्या. एका बाजूला ही ठेवीतील वाढ खूप चांगली झालेली असली तरी त्याचबरोबर बँकेचा ताळेबंद स्वच्छ असणे, बँकेचे परकीय चलन व्यवहार पारदर्शक व योग्य असणे अपेक्षित होते. परंतु बँकेची याबाबतची अंतर्गत रचना अत्यंत गुंतागुंतीची असून खूप जोखमीची होती. परकीय चलनातील ठेवी हा अत्यंत महत्त्वाचा व जोखमीचा विषय असतो. उदाहरणार्थ एखादा अनिवासी भारतीय बँकेत आला व त्याने एकरकमी दहा लाख डॉलर्सची मुदत ठेव एक वर्षासाठी ठेवली. तर या रकमेचे रूपांतर भारतीय रुपयांमध्ये त्यावेळेचा विनिमय दर लक्षात घेऊन केले जाते. अर्थातच ही रक्कम बँकेतर्फे कर्ज वितरणासाठी वापरली जाते. मात्र या ठेवीची मुदत संपली की किंवा मुदत संपण्यापूर्वीच तो ठेवीदार ही रक्कम परकीय चलनामध्ये परत घेऊन जातो. यामुळे परकीय चलनाची गुंतवणूक जोखीम बँकेला टांगत्या तलवारीसारखी असते. ही जोखीम कमी करण्यासाठी इंडसइंड बँकेने 'हेजिंग' च्या पर्यायाचा वापर केला. अर्थात अशा प्रकारे परकीय चलनातील व्यवहाराचे 'हेजिंग' करणे हा एक धोरणात्मक निर्णय असतो व तो बँकेने केलाच पाहिजे अशी आवश्यकता नसते.

प्रत्येक बँकेमध्ये 'ॲसेट - लायबिलिटी मॅनेजमेंट' विभाग असतो. त्यांची प्रामुख्याने जबाबदारी असते ती बँकेची सर्व येणी आणि देणी यांचे योग्य व्यवस्थापन करणे. अर्थातच यामध्ये परकीय चलनातील ठेवींचा समावेश असतो. त्यामुळे हा विभाग नेहमी एकूण मालमत्ता, दायित्व, व्यवसायातील रोख रकमेची ये-जा ( कॅश फ्लो) तसेच चलनविनिमय दरातील चढ उतार व त्यातील जोखीम या सर्वांवर बारकाईने लक्ष ठेवून असतो. वर उल्लेख केलेली मुदत ठेव हातात आली तर त्याचे रूपांतर साधारणपणे एक डॉलरला 87 रुपये असा दर लक्षात घेतला तर बँकेला 8.70 कोटी रुपये रक्कम हातात मिळते. त्यामुळे बँकेच्या अंतर्गत व्यवस्थेनुसार ही रक्कम चलनाचे खरेदी विक्री करणाऱ्या' ट्रेडिंग डेस्क' ला दिली जाते. त्यावेळी 8.70 कोटी रक्कम ॲसेट मॅनेजमेंट करणाऱ्या विभागाला मिळते. त्यानंतर हे दोन्ही विभाग एकमेकांना ठराविक मुदतीने म्हणजे पंधरवडा किंवा महिन्याने व्याजाची देवाण घेवाण करतात. अर्थात ते करताना डॉलर व रुपया यांचा विनिमय दर व प्रचलित व्याजदर लक्षात घेतला जातो. या ठेवीची मुदत संपते तेव्हा 'ट्रेडिंग डेस्क' दहा लाख डॉलर्स परत करते व त्या बदल्यात त्यांना 8.70 कोटी रुपये अधिक त्यांनी ठरवलेली फी मिळते. या सर्व व्यवहारांमध्ये डॉलर व रुपया यांच्या विनिमय दरातील चढ-उतार व व्याजदरातील फरक लक्षात घेऊन अंतर्गत रित्या हे व्यवहार पूर्ण केले जातात.

याच वेळी 'ट्रेडिंग डेस्क' हा काही आंतरराष्ट्रीय बँकांबरोबर परकीय चलनाचे डेरिव्हेटिव्हजचे व्यवहार करतात. म्हणजे कागदोपत्री डॉलर्सचे खरेदी - विक्री व्यवहार करतात. विनिमय दरामध्ये सातत्याने लक्षणीय चढ उतार होत असल्यामुळे बँकेची अंतर्गत यंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारातील खरेदी-विक्रीची जोखीम याचा ताळमेळ न बसल्यामुळे इंडसइंड बँकेला अशा व्यवहारात कोट्यावधी रुपयांचा फटका बसून तोटा झाल्याचे लक्षात आले. वरील उदाहरणात विनिमयाचा दर 80 रुपये झाला तर त्याचा किती फटका बसू शकतो हे लक्षात येऊ शकते. म्हणजे प्रत्येक अनिवासी ठेवी मागे आणि चलनाच्या विनिमय दरातील चढ उतारामुळे बँकेला काही लाख रुपयांचा तोटा होत राहीला. त्यातच त्यांना दिलेला जादा व्याजदर काही तोटा वाढवणारा होता व या सर्वाचा परिणाम बँकेच्या एकूण ताळेबंदावर अत्यंत विपरीत पद्धतीने झालेला होता. अर्थात या ठेवी फक्त डॉलर्समध्ये नसून अन्य चलनातील म्हणजे येन, युरो यामध्येही असल्याने त्यातील चढ उताराचा बसणारा जादा फटका सहज लक्षात येऊ शकतो.

इंडसइंड बँकेने बँकेच्या व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार या सर्व व्यवहारात सुमारे 2100 कोटी रुपयांचा तोटा बँकेला झालेला आहे. ही रक्कम बँकेच्या एका तिमाहीच्या नफ्याएवढी लक्षणीय आहे. आजच्या घडीला बँकेकडे 4 लाख कोटींच्या ठेवी आहेत तर 3.60 लाख कोटींची कर्जे त्यांनी दिलेली आहेत. बँकेचे एकूण भांडवल ( नेट वर्थ) 65 हजार कोटीच्या घरात आहे. तसेच सरकारी रोखे व बाँड्समध्ये एकूण गुंतवणूक 1.18 लाख कोटींच्या घरात आहे. म्हणजे एकूण ठेवींच्या तुलनेत जवळजवळ 45 टक्के ठेवींची बँकेची द्रवता आहे. तसेच आजच्या घडीला बँकेच्या सर्व मालमत्ता विकल्या व काही अनुत्पादित बुडीत कर्जे लक्षात घेतली तरीही सर्व ठेवीदारांच्या रकमा परत देण्याची क्षमता बँकेत आहे. त्यामुळे या बँकेत आजच्या घडीला तरी कागदोपत्री काही धोका वाटत नाही.

परंतु रिझर्व्ह बँक सहकारी बँकांना प्रचंड त्रास देतात, झारीतल्या शुक्राचार्या सारखे चांगल्या बँकांची अडवणूक करतात असे चित्र आहे. दुसरीकडे राष्ट्रीयकृत बँका किंवा इंडसइंड सारख्या खाजगी बँकांच्या बाबतीत नियामक मूग गिळून बसलेले दिसतात. रिझर्व्ह बँकेने एका परिपत्रकाद्वारे 1 एप्रिल 2024 पासून बँकांमधील डेरीव्हेटीव्हजच्या अंतर्गत व्यवहारांना बंदी घातलेली आहे. त्यामुळेच इंडसइंड बँकेने अंतर्गत लेखापरीक्षण केल्यानंतर त्यांना एवढा मोठा तोटा झाल्याचे लक्षात आले व त्यांनी ते मान्य केलेले आहे. हा तोटा अलीकडचा नाही. या बँकेला गेल्या पाच ते सात वर्षातील एवढा प्रचंड वाढणारा तोटा लक्षात आला नाही ही अंतर्गत लेखापरीक्षणातील गंभीर चूक आहे. बँकेचे जोखीम व्यवस्थापन व अंतर्गत व बाह्य लेखापरीक्षण प्रक्रिया यातील त्रुटी यामुळे चव्हाट्यावर आल्या आहेत. यात आर्थिक गैरव्यवहार झाला आहे किंवा कसे हे निश्चित सांगता येणार नाही पण इंडसइंड सारखा प्रकार अन्य काही बँकांमध्ये झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

इंडसइंड बँक सध्या विविध घडामोडींमुळे चर्चेत व अडचणीत येताना दिसत आहे. बँकेच्या प्रमुख वित्त अधिकाऱ्याने अलीकडेच तडका फडकी राजीनामा दिला. एवढेच नाही तर सर्वात गंभीर बाब आहे ती इनसाईडर ट्रेडिंग सारख्या गंभीर गुन्ह्याची. बँकेची सर्व अंतर्गत माहिती असणाऱ्या वरिष्ठ मंडळींनी गेल्या काही महिन्यात त्यांचे समभाग बाजारात विकून मोठा नफा कमावलेला आहे.

बँकेला मोठा तोटा झाल्याची त्यांनाच फक्त माहिती होती.त्यामुळे त्यांनी त्याचा वापर करून शेअरची बाजारात खुली विक्री केली. हा इनसाईडर ट्रेडिंग चा अत्यंत गंभीर गुन्हा आहे. बँकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी सुमंत कठपालिया यांनी सरासरी 1437 रुपयांना शेअर्स विकून 118 कोटी रुपये मिळवले आहेत तर उपप्रमुख कार्यकारी अधिकारी खुराणा यांनी 1451 रुपयांना शेअर्स विकून 70 कोटी रुपये मिळवले आहेत. या दोघांनी हे व्यवहार गेल्या काही महिन्यात केलेले आहेत. त्याचप्रमाणे अनेक परदेशी वित्त संस्थांनीही गेल्या सात आठ महिन्यात त्यांच्याकडील भाग भांडवलाची विक्री केली. त्यांच्याकडे 40.3 टक्के भाग भांडवल होते ते डिसेंबर अखेरीस 24.7 टक्क्यांवर घसरलेले आहे.गेल्या दोन-तीन महिन्यात अजून विक्री झालेली आहे. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे भारतातील स्थानिक वित्त संस्था व म्युच्युअल फंडांनी यामध्ये गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. त्यांचे भाग भांडवल 28 टक्क्यांवरून तब्बल 43 टक्क्यांपेक्षा जास्त झाले आहे. ज्या स्थानिक वित्त संस्था व म्युच्युअल फंडांनी गुंतवणूक केली त्यांचे बाजार मूल्य 10 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त घसरलेले आहे. आजमीतिला बँकेच्या प्रवर्तकांकडे 16 टक्के भाग भांडवल आहे तर स्थानिक वित्त संस्थांचे भाग भांडवल 50 टक्क्यांपेक्षा जास्त झालेले आहे. यामध्ये एचडीएफसी, आयसीआयसीआय, मिराई ॲसेट, स्टेट बँक ऑफ इंडिया, यूटीआय, एलआयसी,टाटा,महिंद्रा, क्वांटम असे देशातील सर्व टॉप 25 म्युच्युअल फंड आहेत. आणि या सर्वांना मोठा फटका बसलेला आहे त्यामुळे सर्वसामान्य गुंतवणूकदारांना साहजिकच मोठा चुना इंडसइंड बँकेच्या प्रकरणात लागलेला आहे यात शंका नाही. गेल्या सहा महिन्यात या शेअरचा भाव 50 टक्क्यापेक्षा जास्त घसरल्याने बँकेचे भांडवल मूल्य 14,000 कोटींनी पाण्यात गेलेले आहे. गुंतवणूकदारांच्या माहितीसाठी या इंडसइंड बँकेचा शेअर चा गेल्या वर्षभरातील उच्चांकी भाव 1576.35 रुपये होता तर सध्याची घसरण 606 रुपयापर्यंत खाली झालेली आहे. बँकेचे एकूण 4.10 कोटी ग्राहक असून 340 शाखा आहेत व 311 एटीएम आहेत. सर्व साधारण भागधारक 6.17 लाख म्हणजे जवळजवळ 84 टक्के आहेत. त्यात म्युच्युअल फंड,विमा कंपन्या व अन्य वित्त संस्था यांचा समावेश आहे.तसेच किरकोळ भागधारक 3.42 लाखाच्या घरात आहेत. या साऱ्या घडामोडी एक दोन चार दिवसात झालेल्या नाहीत. तब्बल वर्षभरापेक्षा जास्त काळ हा प्रकार सुरू आहे. अशावेळी रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि सेबी सारख्या प्रमुख नियमक संस्था केवळ "दुर्वा" उपटण्याचे काम करतात काय असा प्रश्न सर्वसामान्य गुंतवणूकदार विचारत आहे. केंद्रीय वित्त मंत्रालयाने या सर्व प्रकरणाची सर्वोच्च पातळीवर चौकशी करून गुंतवणूकदार व भागधारकांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा आहे.

# मीना आणि तिचा प्रवास

**एका मध्यमवर्गीय महिलेने आपले डॉक्टरी पेशातील काम आटोपते घेत, संसार आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या सगळ्या जबाबदाऱ्यांचे नियोजन करत प्रवासाची आवड जपणे आणि ती नेमक्या शब्दात सादर करणे हे आव्हानात्मक काम होते. पण मीना प्रभूंनी ते पेलले आणि एकापेक्षा एक सरस प्रवासवर्णनांची रास वाचकांपुढे ठेवली. आजही त्यांची पुस्तके त्या त्या परिसराची सखोल माहिती देतात. या लेखिकेला विनम्र आदरांजली.**

श्रध्दांजली
उष:प्रभा पागे, ज्येष्ठ अभ्यासक
राष्ट्रसंचार

मीना प्रभू यांचे निधन ही चटका लावून जाणारी घटना म्हणावी लागेल. रेडिओच्या निमित्ताने त्यांचा आणि माझा परिचय झाला. वाचनाची तसेच प्रवासाची आवड असल्यामुळे त्याआधीही लेखिका म्हणून त्या परिचित होत्याच, परंतु त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचा योग मात्र रेडिओमुळेच आला. तिथे मी कार्यक्रमाची निर्माती होते. त्याच काळात मीना प्रभूंचे 'माझे लंडन' हे पुस्तक खूप गाजत होते. मलाही ते खूप आवडले होते. खेरीज त्यांची इतरही काही प्रवासवर्णने वाचकांसमोर आली होती. असे असताना रेडिओवर त्यांच्या प्रवासाविषयी, एकटीने प्रवास करण्याच्या धाडसाविषयी काही तरी करावे, या विचाराने आम्ही त्यांना बोलावले. मनमोकळ्या गप्पा मारताना मीना प्रभू या लेखिकेबरोबरच एक चांगली व्यक्ती म्हणूनही त्या मला भावल्या. नकळत मैत्री जुळली आणि माझ्यासाठी ती लाडकी 'मीनाताई' झाली.

तिच्या प्रवासवर्णनाची भुरळही होतीच. मी डॉक्टर असले तरी आता डॉक्टरकीचा व्यवसाय करत नाही, नवरा प्रपंचाची सगळी जबाबदारी घेतो आणि मी प्रवासाची मुभा घेते, असे तिने सांगितले तेव्हाही ही बाब मला अतिशय नवलाची वाटली. पुढे तिची प्रवासवर्णने डोळ्याखालून जाऊ लागली तसतशी तिच्यातील माणसे पटकन जोडण्याच्या स्वभाववैशिष्ट्याचीही भुरळ पडत गेली. या कलेतूनच तिच्या व्यक्तिमत्त्वाचाही विकास होत होता. ती प्रगल्भ होत होती आणि तिच्या प्रवासवर्णनातही मनुष्यस्वभावाचे वेगवेगळे पैलू बघायला मिळत होते. त्याद्वारे ती वाचकांपुढे विविध अनुभव मांडत होती. मुख्य म्हणजे ती मध्यमवर्गीय कुटुंबातील होती. तिच्यावर मुलांची जबाबदारीही होती. मात्र हे सगळे सांभाळत, मुलांकडे तसेच संसारातील इतर जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष न करता, सगळ्याचे चोख नियोजन करत ती आपली आवड जोपासायची. माझ्याबरोबरच अनेकांना या गोष्टीचे फार कौतुक वाटायचे.

. विदेशात राहूनही तिने साहित्याच्या अनेक अंगांचा विचार केला होता. त्यातील एक अंग 'ललबाय'चे होते. याला मराठीमध्ये आपण बडबडगीते म्हणतो. खेरीज लहान मुलांना झोपवताना, रमवताना आपण अंगाईगीत गातो. या गीतांचाही तिने चांगला अभ्यास केला होता. त्यामुळेच बोलता बोलता आम्ही एक विचार केला आणि मराठीतील अंगाईगीते तसेच बडबडगीते आणि विदेशातील ललबाय यांचा तुलनात्मक कार्यक्रम करण्याची संकल्पना समोर आली. यावर काम करताना मीनाताईच्या यासंबंधीच्या अभ्यासाची व्याप्ती आणि खोली प्रकर्षाने लक्षात आली. असा एक हा सुंदर कार्यक्रम आम्ही एकत्र सादर केला. त्याला रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. आज त्याचे रेकॉर्डिंग उपलब्ध आहे की नाही, हे ठाऊक नाही. पण खरे सांगायचे तर त्याला मोठे संग्राह्यमूल्य आहे यात शंका नाही.

मीनाताई आणि शांताबाई सख्ख्या मैत्रिणी होत्या. शांता शेळके यांचे काव्यलेखन आणि मीनाताईची रसिकता याचा अतिशय चांगला संगम त्यांच्या मैत्रीतून आम्हाला पहायला मिळायचा. मीनाताई लेखनामुळे लक्षात राहिलीच पण, पाणीदार, चमकदार डोळ्यांमुळेही तिला विसरणे शक्य झाले नाही. श्यामल वर्ण, बोलके डोळे आणि मुक्त हास्य ही तिची बलस्थाने होती आणि यामुळेच ती अगदी जवळची होऊन गेली होती. नंतरच्या काळात रेडिओवर आम्ही 'माझं लंडन'चे क्रमशः वाचनही केले. त्यानंतर काही काळ गेला आणि मीनाताईचे नाव साहित्य संमेलनाच्या निमित्ताने वेगळ्या अर्थाने चर्चेत आले. तो अध्याय बराच गाजला आणि संमेलनाच्या अध्यक्षपदी तिची निवड होता होता राहून गेली. ही संधी हुकल्याची आम्हालाही हळहळ वाटली.

त्यानंतर मीनाताई पुणे-मुंबईमध्ये कायमची स्थायिक झाली आणि तिच्याशी नव्याने संपर्क वाढला. इकडे आल्यानंतर काही दिवसांमध्ये तिने एक प्रकल्प सुरू केला होता. पुण्यातील कर्वे रोडच्या मागील बाजूस तिने एक ग्रंथालय सुरू केले. तिथे छापील पुस्तकांबरोबरच वाचकांना ऑनलाईन पुस्तके वाचण्याची सोयही उपलब्ध करुन दिली होती. म्हणजेच वाचक तिथे 'किंडल'वर आपले आवडते पुस्तक वाचू शकत असत. त्या काळी ही कल्पना नाविन्यपूर्ण होती. आम्हाला त्याच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण होतेच. त्यानंतरही वेळोवेळी त्या ग्रंथालयाला भेट देण्याचे प्रसंग आले आणि वाचनाचा आनंद लुटता आला. या प्रयोगातून तिच्यातील कल्पकता आणि काळाबरोबर राहण्याच्या स्वभावाचाही प्रत्यंतर आला. तिचे अनेक दिग्गजांशी स्नेहपूर्ण नाते होते. बाबासाहेब पुरंदरे, पुलं, सुनिताबाई, आनंद यादव अशी अनेक नावे घेता येतील. या सगळ्यांनीच तिच्या वाचनाचे, मांडणीचे कौतुक आणि स्तुती केलेली दिसते.

आपल्या लेखनातून तिने केवळ स्थळांचे वर्णन केले नाही तर तेथील भूगोल, पौराणिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी, पर्यावरणीय स्थान आणि आजचे प्रश्न या सगळ्यांवरच अतिशय समर्पक आणि अभ्यासपूर्ण मांडणी दाखवली. त्यामुळेच तिची पुस्तके महत्त्वपूर्ण संदर्भसाहित्य म्हणून ओळखली जातात. अर्थातच यासाठी तिने पूर्ण अभ्यासाखेरीज कोणतेही लेखन न करण्याचा नियम अखेरपर्यंत पाळला. जाणीव प्रगल्भ असल्यामुळेच या सगळ्याचा संगम तिच्या बहुविध प्रवासवर्णनामध्ये दिसला. खरे तर मीनाने आणखी लेखन करायला हवे होते. पण तिने निर्माण केलेले साहित्य अतुलनीय आहे. अशी वैविध्यपूर्ण आणि परिपूर्ण प्रवासवर्णने लिहिणारी लेखिका आता आपल्यात नाही. मात्र आपल्या लेखनातून तिने वाचकांना घडवलेली देशोदेशींची सफर आणि त्यायोगे दिलेला आनंद अनमोल आहे. तो कधीही विसरणे शक्य नाही.



- मीना प्रभू पेशाने भुलतज्ज्ञ होत्या. परंतु, आपल्या प्रवासवर्णनांमधून त्यांनी स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली. म्हणूनच त्या डॉक्टर नव्हे तर, प्रवासवर्णनकार म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. 'माझं लंडन' हे पहिले पुस्तक लिहिल्यानंतर त्यांनी बारापेक्षा अधिक प्रवासवर्णने लिहिली. त्यामध्ये जगातील निरनिराळ्या ठिकाणांसंबंधीचे ज्ञान तसेच रंजक माहिती रसिकांपर्यंत पोहोचवली. त्यांची 'माझं लंडन', 'इजिप्तायन,' 'तुर्कनामा,' 'ग्रीकांजली,' 'चिनी माती' अशी अनेक पुस्तके आजही लोकप्रिय आहेत. मीना प्रभू यांनी जगातल्या अनेक देशांमध्ये प्रवास केला. पुस्तकांबरोबरच त्यांचे प्रवासवर्णनांवरील लेखही विविध वृत्तपत्रे, मासिके यामध्ये प्रकाशित झाले. मीना प्रभू यांनी गोव्यातील महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषवले होते. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यात दि. बा. मोकाशी पारितोषिक-2010, गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मृण्मयी पुरस्कार-2011, न. चिं. केळकर पुरस्कार-2012, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांचा समावेश आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार देखील मिळाले.

# ग्रंथालये आणि डिजिटल वाचन

**ग्रंथालये ही केवळ पुस्तके ठेवण्याची ठिकाणे नसून ज्ञान, विचार आणि संस्कृती जपणाऱ्या संस्था आहेत. पारंपरिक ग्रंथालयांमध्ये हजारो ग्रंथ, संदर्भ ग्रंथ आणि विविध प्रकारचे साहित्य संग्रहित असते. मात्र, डिजिटल क्रांतीमुळे वाचनाच्या सवयी आणि माध्यमे झपाट्याने बदलत आहेत. आज, डिजिटल वाचनाच्या सुविधांमुळे जगभरातील माहिती एका क्लिकवर उपलब्ध झाली आहे. या बदलत्या युगात ग्रंथालये आणि डिजिटल वाचन यांचा समन्वय कसा साधता येईल, याचा विचार करणे आवश्यक आहे.**

शैक्षणिक
किरण काळे, ग्रंथपाल पुणे
राष्ट्रसंचार

### परंपरागत ग्रंथालयांचे महत्त्व

- पारंपरिक ग्रंथालये ही ज्ञानाच्या साठवणुकीची आणि प्रसाराची मुख्य केंद्रे राहिली आहेत. या ग्रंथालयांचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे:

### १. सखोल वाचन आणि अध्ययनासाठी उत्तम साधन

- ग्रंथालयांमध्ये विविध विषयांवरील ग्रंथ, संशोधन पत्रे, संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रे उपलब्ध असतात. हे साहित्य विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि वाचनप्रेमींसाठी अमूल्य ठरते.

### २. समाजाच्या बौद्धिक प्रगतीसाठी योगदान

- ग्रंथालये केवळ पुस्तके उपलब्ध करून देत नाहीत, तर वाचनसंस्कृती जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. याठिकाणी होणाऱ्या वाचनालयीन उपक्रमांमुळे लोकांमध्ये ज्ञानाची आवड वाढते.

### ३. शांत आणि एकाग्र वाचनासाठी योग्य ठिकाण

- पुस्तकांच्या सान्निध्यात शांततेत वाचन आणि अभ्यास करण्यासाठी ग्रंथालये सर्वोत्तम ठिकाण असतात. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी ही एक प्रेरणादायक जागा असते.

### ४. ज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी महत्त्वाचे माध्यम...

- ग्रंथालयांमध्ये विविध स्तरांवरील वाचकांसाठी पुस्तके उपलब्ध असतात. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालये म्हणजे अमूल्य ज्ञानसंपत्ती असते.

### डिजिटल वाचनाचे वाढते महत्त्व

- तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल माध्यमातून वाचनाची संधी अधिक सोपी आणि सुलभ झाली आहे. इंटरनेट, स्मार्टफोन आणि ई-बुक रीडर्सच्या मदतीने जगभरातील माहिती सहज उपलब्ध झाली आहे.

### १. डिजिटल वाचनाची सोय आणि प्रवेशजोग्यता

- ई-बुक्स, ऑनलाइन ग्रंथालये आणि ऑडिओबुक्स यामुळे कोणत्याही वेळी, कुठेही वाचन करणे शक्य झाले आहे. पारंपरिक ग्रंथालयांप्रमाणे येथे वेळेचे बंधन नाही.

### २. माहितीचा वेगवान आणि व्यापक प्रसार

- ऑनलाइन माध्यमांमुळे माहितीचा प्रसार जलद आणि प्रभावी पद्धतीने होतो. संशोधन पत्रे, शैक्षणिक लेख, वर्तमानपत्रे आणि मासिके काही सेकंदांत डाउनलोड करता येतात.

### ३. पर्यावरणपूरक आणि किफायतशीर पर्याय

- पेपरलेस वाचनामुळे झाडांची कत्तल टाळता येते आणि त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. शिवाय, डिजिटल वाचन साहित्य प्रिंट माध्यमांच्या तुलनेत कमी खर्चिक ठरते.

### ४. संवादात्मक आणि समृद्ध अनुभव

- डिजिटल वाचनामध्ये व्हिडिओ, ऑडिओ, ॲनिमेशन आणि इतर संवादात्मक घटकांचा समावेश करता येतो. त्यामुळे वाचन अधिक रोचक आणि प्रभावी बनते.




## २७२ तळीरामांवर पिंपरी चिंचवड पोलिसांची कारवाई

**पिंपरी :** धुळवडीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात २५ ठिकाणी ड्रंक अँड ड्राईव्हच्या संदर्भात विशेष मोहीम राबवण्यात आली. यामध्ये २७२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. पुढील काही दिवसांमध्ये हे खटले कोर्टात पाठवले जाणार असल्याची माहिती वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धुळवडीचा सण साजरा होत असताना काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ड्रंक अँड ड्राईव्हच्या संदर्भातदेखील वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. सकाळी सात ते रात्री दहापर्यंत तब्बल २७२ तळीरामांवर कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयातील २५ ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. सांगवी वाहतूक विभाग ते तळवडे, देहूरोड, तळेगाव, रावेत, हिंजवडी, वाकड, भोसरी, चिंचवड अशा प्रत्येक ठिकाणी ही विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. २७२ जणांवरील खटले पुढील काही दिवसांमध्ये कोर्टात पाठवले जातील. पुढील कारवाई कोर्टातून होईल अशी माहिती वाहतूक पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली आहे.



## कोयत्यासह तरुणास अटक

**वाल्हेकरवाडी :** बेकायदेशीररित्या कोयता बाळगणाऱ्या एका तरुणाला गुन्हे शाखेने अटक केली. ही घटना बुधवारी (दि. १२) रोजी वाल्हेकरवाडी येथे घडली. अभिजित भारत शिंदे (वय २३, रा. साठे कॉलनी, चिंचवडेनगर, चिंचवड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलीस हवालदार सागर दशरथ अवसरे यांनी गुरुवारी (दि. १३) चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अभिजित याच्याजवळ कोयता असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून त्याला अटक केली. त्याच्याकडून एक कोयता हस्तगत करण्यात आला. चिंचवड पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.



## पाणपोई होतेय नामशेष

**पिंपळे सौदागर :** पूर्वी उन्हाळ्याच्या दिवसात वाटसरूंना पाणी पिण्यासाठी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, स्वःखर्चाने पाणपोई सुरू करत होते. परंतु, आता सर्वत्र जार व पाणी बॉटल्स विकल्या जातात. त्यामुळे बाजारपेठेतून पाणपोई गायब झाल्या असून पाणपोईचीही ओळख हरवत चालली आहे. वाटसरूंना मोफत पाणी उपलब्ध करून देण्यासाठी बसस्थानक, शासकीय कार्यालय, रहदारीचा रस्ता, आठवडे बाजार आदी ठिकाणी पाणपोई असायची. त्यामुळे गरीब, कष्टकऱ्यांची सोय होत होती. अलीकडे जारच्या माध्यमातून पाणी विकत मिळू लागल्याने पाणपोई नामशेष होत आहेत. मात्र ज्यांना बाटलीबंद पाणी विकत घेणे शक्य नाही, अशांची गैरसोय होत आहे.



## तोडफोड करणाऱ्या सात जणांना अटक

**पिंपरी :** बुलेटचा मोठमोठ्याने आवाज करू नका, असे सांगितल्याच्या कारणावरून सात जणांच्या टोळक्याने एकावर खुनी हल्ला केला. तसेच, तिथे असलेल्या चारचाकी वाहन आणि तीन दुचाकींचीही तोडफोड केली. ही घटना बुधवारी रात्री घडली. पोलिसांनी सातही आरोपींना अटक केली आहे. दिनेश जालिंदर सस्ते, (३०, रा. सस्तेवाडी मोशी) यांनी गुरुवारी (दि .१३) एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, साहिल संपत भोर (19, रा. चाकण रोड, चऱ्होली), रामेश्वर शाम टेकाळे (वय २०), रोहित एकनाथ इंगोले (१९, दोघेही रा. धुंडरे आळी, आळंदी), अभय सुभाष कालेल (२२, रा. काटे कॉलणी चऱ्होली), अनिल प्रकाश राठोड (27, रा. डुडुळगाव), चैतन्य लक्ष्मण पांचाळ (वय 20), शुभम नागनाथ कुंभार (वय २०, दोघेही रा. केळगाव) यांना अटक करण्यात आली आहे.

## जल्लोष




**आकुर्डी** **वितरण :** सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स यांच्या वतीने दरम्यान हैद्राबाद येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील इ-बाहा स्पर्धेत आकुर्डी येथील डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टीम प्रिडिएटर्स रेसिंग या संघाने अव्वल क्रमांक पटकावला. संकुलनाचे चेअरमन सतेज पाटील, डॉ. डी वाय पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस पाटील, डॉ. डी वाय पाटील शैक्षणिक संकुलनाचे संचालक रियर एडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांनी संपूर्ण विजेत्या संघाचे अभिनंदन आणि कौतुक केले.

## पर्यटन विकास, क्रीडा संकुलास मिळणार गती


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** मावळ तालुक्यातील विविध विकासकामांसदर्भात आमदार सुनील शेळके व पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कार्यालयात आढावा बैठक पार पडली.

यावेळी तालुक्यातील पर्यटन विकास, क्रीडा संकुल, वाहतूक नियोजन, नदी सुधार योजना व इतर पायाभूत सुविधा विकासासंदर्भात चर्चा करण्यात आली. मावळमधील विकास कामांना गती देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आल्याची माहिती आमदार शेळकेंनी दिली. यावेळी पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे यांच्यासोबत अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, मुख्य अभियंता अशोक भालकर, रिनाज पठाण, अधीक्षक अभियंता बागडे, नगर रचनाकार सुनील मरळे, श्वेता पवार, कार्यकारी अभियंता वसंत नाईक, सुयश शेवाळे, शुभम वाकचौरे आदी अधिकारी उपस्थित होते.

# लग्नाळूंची 'मॅट्रिमोनियल'वरून लूट





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यात येणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. प्रत्येकाला आयुष्यभर साथ देणारा आणि समजून घेणारा जोडीदार हवा असतो. हल्ली अनेक जण वधू-वर सूचक संकेतस्थळावर जोडीदार शोधण्यास अधिक पसंती देतात; पण जेव्हा संकेतस्थळावर तुम्ही जोडीदार शोधता तेव्हा अधिक काळजी घेणे खूप गरजेचे आहे.

सध्या असेच एक प्रकरण समोर आले आहे. असाच काहीसा प्रकार वाकड येथे घडला. आमची एका विवाह नोंदणी (मॅट्रिमोनियल) संकेतस्थळावर ओळख झाली होती. त्या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. आमच्यात जवळीक वाढल्याचा गैरफायदा घेत त्याने वेगवेगळी कारणे देत माझी फसवणूक केली. अशी कथा वाकड येथील एका तरुणीने सांगितली आणि पुन्हा विवाह नोंदणी (मॅट्रिमोनियल) संकेतस्थळ वादाच्या भोवऱ्यात अडकले.

अशा साईट वापरताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन 'महाराष्ट्र सायबर'तर्फे करण्यात आलं आहे. सध्याच्या काळात बऱ्याच उपवर मुलामुलींचे पालक आपल्या पाल्याच्या लग्नासाठी योग्य जोडीदार निवडण्यासाठी अनेक ऑनलाईन मॅट्रिमोनियल वेबसाईटवर नोंदणी करतात. बऱ्याच विवाह जमविणाऱ्या संस्थांनी पण आता स्वतःच्या वेबसाईट सुरु केल्या आहेत ज्यावर ते सर्व उपवर मुले व मुलींच्या पालकांना नोंदणी करण्यास सांगत आहेत. बऱ्याचदा पालक किंवा मुलगा /मुलगी स्वतः या वेबसाईटवर प्रोफाईल बनवून त्यात आपली माहिती ,परिवाराची माहिती व फोटो अपलोड करत आहेत . अशा वेबसाईट या सायबर भामट्यांकरिता या लोकांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक करण्यासाठी किंवा हा सर्व डेटा डार्कनेटवर किंवा इंटरनेटच्या काळ्या बाजारात विकण्यास एकदम सोपे असे लक्ष्य आहे. अशा वेबसाईटद्वारे ऑनलाईन फसविले जाणाऱ्यांची संख्यादेखील बऱ्याच प्रमाणात आहे. दुर्दैवाने यामध्ये फसविले गेलेल्यांमध्ये मुलींची संख्या ही मुलांच्या तुलनेने जास्त आहे .

### काय आहे स्थिती ?

- सावधगिरी आपण जर या अशा वेबसाईटचा वापर करत असाल तर सावध राहा, अशी विनंती महाराष्ट्र सायबरकडून करण्यात आली आहे. प्रोफाईल बनविताना आपली सर्वच माहिती त्यात देऊ नका तसेच फक्त एखाद दुसरा फोटोच अपलोड करा . प्रत्यक्ष मुलाचा किंवा मुलीचा मोबाईल क्रमांक देऊ नका घरातील कोणत्यातरी वयाने मोठ्या व्यक्तीचा मोबाईल क्रमांक द्या. तसेच परदेशातील भारतीय प्रोफाईलने मॅच केले म्हणून हुरळून जाऊ नका उलट अशा स्थळाची अजून सखोल चौकशी करा.

### फसवणुकीचे प्रकार

- परदेशातून महागडी भेट वस्तू पाठवून फसवणूक.
- संभाषणात एकमेकांबद्दल जवळीक निर्माण होऊन अनेक वैयक्तिक व खाजगी फोटोज व माहिती शेअर केली जाते. हळूहळू समोरची व्यक्ती मग तुम्हाला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात
- मुख्यतः फसवली जाणारी व्यक्ती या एकतर घटस्फोटित ,किंवा ज्यांचे जोडीदार जग सोडून गेलेत ,किंवा ज्यांची लग्न काही कारणाने होऊ शकले नाहीत अशा व्यक्ती असतात त्यातपण महिलांची संख्या अधिक आहे .

## श्री छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलावाला घरघर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आकुर्डी-प्राधिकरणातील श्री छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव गेल्या चार वर्षांपासून बंद आहे. हा तलाव भाडेतत्त्वावर चालविण्यास देण्यात येणार आहे. त्याबाबतची निविदा प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. येत्या महिनाभरात हा तलाव खुला करण्यात येईल, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.



### काय आहे स्थिती ?

- १) पोहताना झालेले अपघाती मृत्यू, तलावाची खोली कमी करणे, तलावातील गळती, फिल्टर सिस्टीम नादुरुस्त असणे आदी कारणे दाखवत आत्तापर्यंत पालिकेकडून तलाव पोहण्यासाठी खुला नाही.
- २) हा तलाव सुरु करण्यासाठी अनेक जलतरणप्रेमी, माजी लोकप्रतिनिधी, विविध राजकीय संघटनांनी महापालिका प्रशासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे.
- ३) महिनाभरात हा तरण तलाव पोहायला खुला होईल, असे महापालिकेकडून सांगण्यात येत आहे.
- ४) प्राधिकरणातील तलावाच्या तांत्रिक तपासण्या करून अन्य तलावांप्रमाणे खासगी एजन्सीला भाडेतत्त्वावर देण्याचे नियोजन आहे.
- ५) तलाव परिसरामध्ये जीवरक्षकांची संख्या वाढवुन तसेच सुरक्षेसाठी पुरेशा उपाययोजना करुन हा तलाव नागरिकांना पोहण्यासाठी खुला केला जाणार आहे.

"प्राधिकरणातील जलतरण तलाव खासगी एजन्सीला भाडेतत्त्वावर दिला जाणार आहे. त्याची निविदा प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. तलावाच्या परिसरात जीवरक्षकांची संख्या वाढविण्यात येईल. तसेच, सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येतील. येत्या महिनाभरात हा जलतरण तलाव खुला केला जाईल.

— **पंकज पाटील,** उपायुक्त (क्रीडा), महापालिका

## हभप भाऊसाहेब विठोबा गोरेंचा सपत्नीक सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहू :** समाजाला कशाची गरज आहे ते विचारात घेऊन मार्गदर्शन करणारा कीर्तनकार हा दिशादर्शक असतो. स्वतः अंध असून भाऊसाहेब विठोबा गोरे यांनी पत्नी सुवर्णा व चिरंजीव रामचंद्र यांच्या सहकार्याने ज्ञानेश्वरी मुखोद्गत केली हा त्यांच्यातला सदगुण आहे. अशा सदगुणांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम समाजाकडून झाले पाहिजे. दुर्गुणांना समाजाने लांब ठेवले पाहिजे. आज काही कीर्तनकार ओंगळवाणे प्रदर्शन करत कीर्तन करतात आणि वाहव्वा मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांपासून सर्वांनी सावध राहिले पाहिजे, असे परखड मत स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी व्यक्त केले.

संत तुकाराम महाराज वाङमय संशोधन मंडळाद्वारे गाथा मंदिर प्रकल्प अंतर्गत जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या सदेह वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन देहू येथे करण्यात आले आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते आढळगाव, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर येथील हभप भाऊसाहेब विठोबा गोरे महाराज यांचा पुरस्कार देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. ५१ हजार रुपये, प्रमाणपत्र, शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच संतश्री गुरूकुल संस्थान संचालित वारकरी शिक्षण संस्थेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव गोविंद गिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.



**देहू** तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त देहू येथे आयोजित हरिनाम सप्ताहात हभप भाऊसाहेब विठोबा गोरे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते हा सन्मान झाला.

# सावरकर उद्यानात अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई करा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** धुलीवंदनाच्या दिवशी निगडी प्राधिकरणातील सावरकर उद्यानात अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई करून अस्वच्छता दंड वसूल करण्याची मागणी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य नंदकुमार सातुर्डेकर यांनी केली आहे.

यासंदर्भात सातुर्डेकर यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरणातील सेक्टर नंबर २६ येथे महापालिकेने गणेश तलावामध्ये सावरकर उद्यान विकसित केले आहे. या ठिकाणी अनेक आबालवृद्ध व्यायामासाठी तसेच मॉर्निंग वॉकसाठी उद्यानात येत असतात. मात्र या उद्यानासमोरील पटांगण विविध खाजगी संस्था विविध कार्यक्रमांसाठी वापरत आहेत. त्यांच्यावर महापालिकेच्या उद्यान विभागाचे कोणतेही नियंत्रण दिसत नाही.

शुक्रवारी धुलीवंदन सणाच्या निमित्ताने प्राधिकरणातील भाजपच्या दोन पदाधिकाऱ्यांनी या उद्यानातील पटांगणात रंगोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमांमध्ये अल्पोपहार देण्यासाठी वापरलेल्या डिश आणि पाण्याच्या बिसलेरी बाटल्या व्यायामासाठी लावलेल्या साहित्याच्या ठिकाणी तशाच टाकून देण्यात आल्या.

### पदाधिकाऱ्यांनी दंड घेतलाच पाहिजे

- शहरात अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून महापालिका अस्वच्छता दंडाबद्दल पाच हजार रुपये दंड वसूल करते. मग हाच नियम सावरकर उद्यानात अस्वच्छता करणाऱ्या त्या दोन पदाधिकारी आणि उद्यानात अस्वच्छता करणाऱ्यांना लावणार का? या मंडळींकडून प्रत्येकी पाच हजार रुपये दंड वसूल करणार का? असा सवाल सातुर्डेकर यांनी केला आहे.

"या प्रकरणी लक्ष घालून आयोजकांकडून दंड वसूल करावा तसेच महापालिकेचे सदरचे उद्यान सुस्थितीत राहावे यासाठी उद्यानाची, त्यालगतची पटांगणाची जागा महापालिकेने यापुढे कोणालाही वापरासाठी देऊ नये. अन्यथा कार्यकर्ता म्हणून या विरोधात आवाज उठवावा लागेल.

— **नंदकुमार सातुर्डेकर**
माजी सदस्य,
वृक्ष प्राधिकरण समिती

# एआयमुळे ऊस उत्पादनात क्रांती घडेल

## ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांचा विश्वास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** ऊस हे पाणी पिणारे पीक असूनही कमीत कमी पाण्यामध्ये आणि कमी हेक्टरमध्ये आपण ऊसाचे अतिरीक्त उत्पादन घेऊ शकतो, हे केवळ एआय तंत्रज्ञानामुळे शक्य होत आहे. शेतकऱ्यांनी हे तंत्रज्ञान त्यांच्या शेतात अवलंबल्यास येत्या ३-४ वर्षात एआयच्या वापरामुळे ऊस उत्पादनासह अर्थकारणात क्रांतीकारक बदल होतील, असा विश्वास ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी व्यक्त केला.

साखर उद्योगाला नवी झळाळी प्राप्त करून देण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावीपणे वापर करण्यासंदर्भात विस्मा अर्थात वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन आणि ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आज बारामती येथे आयोजित विशेष कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ नेते आणि माजी




केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. बारामती येथील शारदानगर शैक्षणिक संकुलातील मंथन सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर खासदार सुप्रिया सुळे, आणि ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, ज्येष्ठ उद्योजक प्रतापराव पवार, साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळे निमित्त बारामती जवळील कृषी विज्ञान केंद्रात ऊसाची प्रात्यक्षिक पाहणी करून एआय तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ऊस उत्पादनामध्ये एआय तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी येणाऱ्या खर्चातील खारीचा वाटा म्हणून विस्मातर्फे ११ लाख रूपयांची देणगी जाहीर करण्यात आली.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन एकरी खर्च कमी करुन ऊस उत्पादन वाढविण्यासाठी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने मायक्रोसॉफ्ट व ऑक्सफर्ड यासारख्या जागतिक संस्थांच्या मदतीने प्रयोग केले असून ते यशस्वी झाले आहेत. कृषी क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडविण्याची सुरुवात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने सुरू झाली असून त्याचा लाभ राज्यभरातील सहकारी व खासगी साखर कारखाना कार्यक्षेत्रातील सर्वच ऊस उत्पादकांना व्हावा या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत कृत्रिम बुध्दिमत्तेसंदर्भात अमेरिका आर्यलँड, इंग्लंड व दुबई येथील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार म्हणाले की, ऊस क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संस्था, राज्य शासन आणि केंद्र शासन यांनी एकत्र येऊन धोरणात्मक पातळीवर निर्णय घेणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवरील तंत्रज्ञान आपण आता ऊस शेतीमध्ये आणत असून जमिनीची सुपिकता वाढवणे, रोगांचे नियंत्रण करणे, ऊसाचे उत्पादन आणि ऊसाची रिकव्हरी वाढवणे आदी घटकांवर काम करणे तंत्रज्ञानामुळे सहज शक्य होणार आहे.

यावेळी बोलताना विस्माचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे म्हणाले की, अलीकडचा साखर कारखाना उद्योग हा संकटात आला असून निदान १५० दिवस कारखाना सुरू राहणे अपेक्षित असताना ९० दिवसातच कामकाज ठप्प होत आहे. कारखान्यातील काम थांबले तरी ३६५ दिवसांचा पगार तसेच व्यवस्थापन आणि देखभाल खर्च कारखान्यांना करावाच लागतो. सर्व संशोधन संस्थांनी एकत्र येऊन टास्क फोर्सची स्थापना करणे आवश्यक आहे. एआय तंत्रज्ञानाची अंमलबजावणी केल्यानंतर एकदम चित्र पालटणार नसले तरी ऊस शेती आणि साखर कारखान्यांशी संबंधित अडचणींवर कृत्रिम बुद्धीमत्ता हा मार्ग दाखवणारा आशेचा किरण असेल, असे वाटते.

# नीरेत कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## सामाजिक बांधिलकीतून जबाबदारी उचलण्याची गरज - अँड. मुकुंदराव ननवरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** आपल्या गावातील एक जरी महिला सक्षम होऊन आपले शिक्षण व उच्चशिक्षण पुर्ण करू शकली तर आपल्या पुरूषार्थाला अर्थ असून समाजाची ही परिस्थिती बदलण्यासाठी आपण सामाजिक बांधिलकीतून जबाबदारी उचलण्याची गरज असल्याचे मत जेष्ठ विधीज्ञ अँड.मुकूंदराव ननवरे यांनी नीरा येथे व्यक्त केले.

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे जागतिक महिला दिनानिमित्त दामिनी,एकता व राजमाता महिला ग्रामसंघ व सर्व महिला बचतगट यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१५) इयत्ता नववीतील सई राहुल झुंजार या विद्यार्थीनीने अपघातग्रस्त वडिलांच्या आजारपणात स्वतः कष्ट करीत कुटूंब सावरले.शगुन अतिवीर शहा व सुनिता किशोर गदादे या उच्चशिक्षित महिलांनी स्वतःची किडनी आपल्या पतीला दान करून जीवदान दिले. अंकिता महेश जगदाळे या युवतीने इंडियन नेव्हीमध्ये एस. एस.आर पदाला गवसणी घातली. या आदर्श कर्तृत्ववान महिलांचा

मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून जेष्ठ विधीज्ञ अँड. मुकूंदराव ननवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी नीरेच्या सरपंच तेजश्री काकडे होत्या. मुकुंदराव ननवरे पुढे म्हणाले की, जगाच्या मोठ्या दुःखाबरोबर तुमच्या छोट्या दुःखाची तुलना केली तर त्याला सुखाची चव येते. हा आनंद समाजाला होणे हे थांबलं पाहिजे. सई झुंजार सारखी कर्तृत्ववान युवती कोणत्या घरातील आहे हे न पाहता या युवतीला शिक्षणासाठी मदत करणे समाजाचे कर्तव्य आहे.



### सई झुंजारला शिक्षणासाठी आर्थिक मदत

● इयत्ता नववीत शिकणा-या सई झुंजार या युवतीने नीरा ग्रामपंचायतीचे कर्मचारी असलेले आपले वडिल राहुल झुंजार यांचा अपघात झाल्यानंतर त्यांना गाडीत टाकले. स्वतः वाहन चालवित वडिलांना उपचार मिळवून दिले. उपचारानंतर हात लुळा पडल्याने वडीलांना काम करता येत नव्हते. कुटूंबाची फरपट होवू लागल्याने स्वतः प्लंबिंगची कामे करून तीन्ही बहीणी,आई वडील असलेले कुटूंब सावरले. या तिच्या कर्तृत्वाचे कौतुक करीत सईचे आर्मीत जाण्याचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी तीने उच्चशिक्षित व्हावे याकरिता तिला शिक्षणासाठी नीरा येथील जेष्ठ विधीज्ञ अँड. मुकूंदराव ननवरे यांनी पंचवीस हजार रूपयांचा डिमांड ड्राफ्ट देऊन आर्थिक मदत करून कर्तव्य केले.

अहिल्यादेवी होळकर, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.डॉ.महादेव रोकडे यांची टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी बांधकाम सभापती दत्ताजीराव चव्हाण, विराज काकडे, उपसरपंच राजेश काकडे, तुळशीराम जगताप, हरीष शेट्टी, श्रीराम वैद्य, अनिल चव्हाण, दिलीप फरांदे, कांचन निगडे, वैशाली काळे, मोहिनी भिसे, तनुजा शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# ओढ्यांचे खोलीकरण झाल्याने अवसरी बुद्रुक झाले पाणीदार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** राज्य शासनाच्या सहकार्याने नाम फाउंडेशन व टाटा मोटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव ) ग्रामपंचायतीने तीन पोकलँड मशीनचे साह्याने ती ओढयांचे आठ किलोमीटरचे खोलीकरण करण्यात आले आहे. खोलीकरण केलेल्या ओढ्यात डिंभे धरण उजवा कालव्यातील पाणी सोडल्यानंतर तीनही ओढे पाण्याने भरून वाहू लागले आहेत. या पाण्याचा उपयोग परिसरातील ७०० ते ८०० एकर क्षेत्र बागायती होण्यास मदत होणार असुन ओढ्या लगतच्या विहिरी पाण्याने तुडूंब भरल्या असून अवसरी बुद्रुक गाव पाणीदार झाले आहे. नाम फाउंडेशन व टाटा मोटर्स यांनी केलेल्या सहकार्यामुळे समस्त ग्रामस्थ यांनी त्यांचे अभिनंदन केले असल्याची माहिती उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांनी दिली.

अवसरी बुद्रुक गावच्या सरपंच सारिका हिंगे, उपसरपंच अनिल हिंगे पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत वाडेकर, कल्याणराव हिंगे पाटील यांनी नाम फाउंडेशन व टाटा मोटर्स यांच्या अधिकाऱ्यांशी गेली चार ते पाच महिन्यांपूर्वी ओढा खोलीकरण करण्यासाठी संपर्क साधला होता. त्यानंतर नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स यांनी अवसरी बुद्रुक गावातील तीन ओढे खोलीकरण्यासाठी तीन पोकलेन मशीन पाठवून दिल्यानंतर दहा दिवसात आठ किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण करण्यात आले आहे.

डिंभे उजवा कालव्यातून ओढ्याना पाणी सोडल्यानंतर ओढे, नाले पाण्याने तुडुंब भरून वाहत असल्याने विहिरींच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.अवसरी परिसरातील ७०० ते ८०० एकर क्षेत्र बाराही महिने बागायत होणार असल्याने शेतकऱ्यांना काही पीके वारंवार घेता येणार आहे. यामुळे शेतकरी पुन्हा दुग्ध व्यवसायाकडे वळतील.

# वन्य जीवांसाठी पाणवठे भरले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** कस्तुरी प्रतिष्ठान उरुळी कांचन या समाजसेवी संस्थेने आज वाढत्या उन्हाच्या तीव्रतेचा त्रास वन्य प्राणिमात्राला सहन करताना मदत व्हावी म्हणून तुकाई माळ, वाघापुर व वन परिसर, सिंगापुर याठिकाणी बांधलेले पाणवठे पाण्याने भरून घेतले, आणि वन्य जीवांसाठी दिलासा देणारे काम केले. सन - २०१६ साली या पाण्याच्या टाक्या प्रतिष्ठानच्या वतीने बांधण्यात आल्या आहेत. तेंव्हापासून दरवर्षी या पाणवठ्यात पाणी भरून वन्य जीवांचे जगणे सुसह्य करण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद मेमाणे व त्यांचे सहकारी झटत असतात. याही वर्षी ते पाणवठे साफ करुन त्यात पाणी भरून घेतले.



# आंबेगावात बिबट्याचा वावर?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** बिबटयाच्या संख्येत सर्वत्र दिवसेंदिवस वाढ होत असून त्याचे परिणाम मानवी जीवनावर होऊ लागले आहेत.नदी काठच्या गावात ऊस क्षेत्र मोठया प्रमाणावर असल्यामुळे बिबटे अश्या क्षेत्रात वास्त्याव्यास असायचे.मात्र सध्या ऊस तोड अंतिम टप्यात आल्याने बिबट्याचे दुष्काळ ग्रस्त व डोंगर भागात सुद्धा वास्तव्य वाढले आहे.बिबट्याचा धोका इतका प्रचंड प्रमाणात वाढला आहे की बिबटया राज रोसपणे दिसून येत आहे त्यामुळे सध्या तरी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये बिबट्याचे दर्शन कधीही, कुठेही होऊ लागले आहे.



# वीर देवांची शिरदाळे येथे मिरवणूक

**लोणी-धामणी :** उन्हाळा सुरू झाला की ग्रामीण भागातील सण,उत्सव यांची चाहूल लागते. त्यातच होळी आणि धुळवड हे दोन सण ग्रामीण संस्कृतीमध्ये भर टाकणारे सण आहेत.हे दोनही सण शिरदाळे (ता. आंबेगाव ) गावात अतिशय आनंदाने आणि ग्रामीण परंपरा जपत साजरे केले जातात. धुलिवंदन हा सण गावात गेल्या ४०० वर्षांची परंपरा जपत साजरा करण्यात आला.गावातील लहान तर काही जेष्ठ मंडळींनी वीर देवाची वेशभूषा करून मोठ्या संख्येने यात सहभाग नोंदवला होता.गावातून प्रदक्षिणा घालून गावच्या चौकामध्ये महिलांनी पाण्याने गोलाकार केलेले वर्तुळ आणि त्या वर्तुळावर वीर देवांचे धावणे ही शेकडो वर्षांची परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने जपण्याचे काम आजही केले जात आहे. चाफ्याच्या फुलांच्या माळा हातात,पायात आणि गळ्यात बांधल्या जातात,रंगेबिरंगी साड्या कमरेला बांधून हातात एक काठी आणि एका हातात देव असलेली वाटी तर अंगाला गंध आणि गळ्यात एखादा अलंकार,डोक्यावर फेटा असा वेष वीर देवाला चढवला जातो.ही सजावट करून प्रत्येकाच्या वाड्याचे वीर देव एकत्र गावच्या चौकात येतात.

# शहा ग्लोबल स्कूलमध्ये होळी साजरी



**इंदापूर :** शिक्षणासोबत संस्कार व संस्कृती जपण्याचे कार्य शहा ग्लोबल स्कूलमध्ये कायमच करण्यात येते. याच उद्देशाने भारतीय सणांची जपणूक करत १३ मार्च २०२२-रोजी प्रशालेमध्ये होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुभसंचालन शाळेच्या शिक्षिका ऋतुजा महाजन यांनी केले. त्यामध्ये गोष्टी सांगून होळी सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर के2 वर्गातील विद्यार्थीनी कु. आर्या व्यवहारे व नर्सरी वर्गातील विद्यार्थीनी कु. सिया शिंदे या विद्यार्थीनीन उत्फुर्त सहभाग दाखवत होळी सणाबद्दल माहिती दिली. व्याचबरोबर सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्सवासंदर्भात चित्रकला, रंगकाम असे विविध उपक्रम राबवत कार्यक्रमार्च शोभा वाढवली. सर्व शिक्षिकांनी मुलांना रंगीबेरंगी रंग लावून क्रार्यक्रमाची रंगत वाढवली. होळीच्या विविध गाण्यांवर नृत्य करत व विविध खेळ खेळत चिमुकल्यांनी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. 'हिच आमुची प्रार्थना... या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सरपंचपदी ज्योती लक्ष्मण सांबारे यांची निवड

**रांजणगाव गणपती :** निमगाव भोगी ता. शिरूर



ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ज्योती लक्ष्मण सांबारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निमगाव भोगीच्या मावळत्या सरपंच उज्वला इचके यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे ही निवडणूक घेण्यात आली. मंडल अधिकारी माधुरी बागले यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. सरपंच पदासाठी ज्योती सांबारे यांचा एकमेव अर्ज आल्याने माधुरी बागले यांनी ज्योती सांबारे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे अनावरण

**रांजणगाव गणपती :** येथील श्री शिवशाही प्रतिष्ठान, निर्मलग्राम ग्रामपंचायत रांजणगाव गणपती व समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्टीत पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे ग्रामस्थांच्या वतीने सांगण्यात आले. श्रीमंत युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१७) सायंकाळी सहा वाजता महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण होणार आहे. सर्व प्रकारच्या शासकीय परवानग्या घेऊन पुतळा उभारण्यात येणार असल्याची माहिती श्री शिवशाही प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे. श्री शिवशाही प्रतिष्ठान व रांजणगाव गणपती येथील ग्रामस्थांनी लोकवर्गणी गोळा करीत सदर खर्च केला आहे.

# इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत ओतूरच्या चैतन्य विद्यालयाचे यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश मिळवल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

याबद्दल अधिक माहिती देताना स्पर्धा परीक्षा विभागाचे प्रमुख बी.आर खाडे म्हणाले की,"इतिहास शिक्षक महामंडळ,महाराष्ट्र तर्फे घेण्यात आलेल्या इतिहास विषयाच्या राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत



चैतन्य विद्यालयातील पाचवी ते दहावीतील ९४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ६४ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले.१० विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी मिळाली. इतर विद्यार्थी उत्तीर्ण झाले.स्पर्धा परीक्षेला भावी काळात विद्यार्थ्यांनी सामोरे जावे यासाठी दरवर्षी ही परीक्षा चैतन्य विद्यालयात आयोजित केली जाते."

या सर्व विद्यार्थ्यांना उपमुख्याध्यापक संजय हिरे,बी. आर.खाडे,अजित डांगे,अमित झरेकर, दिनेश ताठे,सोनाली कांबळे,आशा डुंबरे,हर्षल सितोळे यांनी मार्गदर्शन केले.

प्रथम श्रेणी मिळवलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे.... आराध्या शशिकांत गायकर (५वी),आराध्य पंकज थोरात (५वी),आदित्य नवनाथ बोरुडे (९वी), आराध्य भाऊसाहेब खाडे (९वी),ओम सचिन डुंबरे(९वी),वेदांत यतीन शेटे(९वी),आराध्य रवींद्र डुंबरे (९वी),श्रावणी कैलास वारुळे (१०वी),तनिष्का मिलिंद खेत्री (१०वी),वेदिका लहू भालेराव (१०वी).

# ओलीस २१४ सैनिकांची हत्या

## बलुच लिबरेशन आर्मीचा दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बलुचिस्थान :** बलुचिस्तानमधील पाकिस्तानच्या रेल्वे अपहरणाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या फुटीरतावादी गट बलुच लिबरेशन आर्मीने मोठा दावा केला. त्यांनी ओलीस ठेवलेल्या सर्व २१४ सैनिकांची हत्या केल्याचे म्हटले आहे. बलुच बंडखोरांनी शुक्रवारी एक निवेदन जारी करत म्हटले की, मारेले गेले सर्व २१४ ओलिस हे पाकिस्तानाच्या लष्करातील जवान आहेत.

गेल्या मंगळवारी बलुच बंडखोरांनी क्वेटा येथून पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्सप्रेसचे अपहरण केले होते. या रेल्वेतून ४५० हून अधिक प्रवासी होते. त्यानंतर बलुच लिबरेशन आर्मीने २१४ पाकिस्तानी सैन्य त्यांच्या ताब्यात असल्याचा दावा केला होता. बलुच लिबरेशन आर्मीने राजकीय कैद्यांच्या अदलाबदलीसाठी पाकिस्तानी लष्कराला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला होता. ही मुदत शुक्रवारी संपली. पाकिस्तान सरकारने त्यांच्या अल्टिमेटमकडे लक्ष दिले नाही, यामुळे आम्ही टोकाचे पाऊल उचलल्याचे बलुच लिबरेशन आर्मीने म्हटले आहे.

### पाकिस्तानचा दावा खोटा ठरवला

- पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते अहमद शरीफ चौधरी यांनी म्हटले होते की, त्यांच्या सैनिकांनी ३३ बंडखोरांना ठार मारले आणि ३५४ ओलिसांची सुटका केली. बीएलएने आणखी कोणाला ओलिस ठेवल्याचा कोणताही पुरावा नसल्याचेही त्यांनी ठामपण सांगितले होते. पाकिस्तानी लष्कराच्या या दाव्यानंतर आता फुटीरतावादी गटाने एक निवेदन जारी केले. त्यात त्यांनी त्यांच्या ताब्यातील सर्व ओलिसांना ठार मारल्याचे म्हटले आहे.





### उद्धव ठाकरे विनोद तावडे यांच्यावर कडाडले

**नवी मुंबई :** विरारमध्ये झालेल्या ड्राम्याने लोकशाहीची लक्तरे वेशीवर टांगल्याची प्रतिक्रिया विरोधकांनी दिली आहे. विरार पूर्वेतील मनवेलपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे हे पैसे वाटप करत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केला. कार्यकर्त्यांना तावडे यांना जवळपास चार तास घेराव घातला. या हायहोल्टेज ड्राम्यामळे सर्वच जण आवाक झाले आहेत. प्रत्येक पक्षातून या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया येत आहे. तर तुळजापूर येथे आले असताना उद्धव ठाकरे यांनी त्याच खरपूस समाचार घेतला. ते विनोद तावडे यांच्यावर कडाडले."तुळजाभवानीच्या दर्शनाला येताना माझी बॅग तपासण्यात आली. बॅगेमध्ये तर काही सापडलं नाही. विनोद तावडे यांच्या बँगेत पैसे सापडले. तर काल अनिल देशमुख यांच्यावरती जो हल्ला झाला, ते तपासण्याचे काम कुणाचं होतं? असा सवाल त्यांनी केला. त्यामुळेच मी आई तुळजाभवानला साकडं घातलं आहे की, ही सगळी भ्रष्ट आणि दहशतीची राजवट लवकर हटव,

# १ एप्रिलपासून फास्ट टॅग अनिवार्य

## कॅश किंवा ऑनलाइन पमेंट केले तर दुप्पट टोल भरावा लागणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने फास्टॅगसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.आता १ एप्रिलपासून प्रत्येक टोल नाक्यावर फास्टॅग अनिवार्य असणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक कारला फास्टटॅग लावणे अनिवार्य आहे. जर तुम्ही कॅश, कार्ड किंवा यूपीआयद्वारे टोल भरला तर तुम्हाला टोलचे डबल पैसे भरावे लागणार आहे.

एमएसआरडीसीने याबाबत माहिती दिली आहे. त्यांनी परिपत्रक जारी करत फास्टॅग असणे अनिवार्य असल्याचे सांगितले आहे. यामुळे टोल घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी होणार आहे. तसेच टोल भरण्यासाठी जास्त वेळ रांगेत उभे राहावे लागणार आहे. भारतीय राष्ट्रीय प्राधिकरण विभागाने दिलेल्या निर्देषानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.



### वाहतूक कोंडी कमी होणार

- राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जवळपास ४५,००० किलोमीटरच्या महामार्ग आणि एक्सप्रेस वेसाठी टोल वसूल करते. १००० टोल प्लाझा आहेत. फास्टॅगमुळे टोल भरण्याचा कालावधीदेखील कमी झाला आहे. फक्त ४७ सेकंदात तुम्ही टोल भरु शकता. फास्टॅगसाठी १०३३ हेल्पलाइन नंबर देण्यात आली आहे. ४००० सर्व्हिस पॉइंटवर हा हेल्पलाइन नंबर असणार आहे.

- एमएसआरडी मुंबईतील पाच टोल प्लाझाला ऑपरेट करते.
- दहीसर टोल नाका, मुलुंड पश्चिम, मुलुंड पूर्व, ऐरोली आणि वाशी या टोल नाक्यांचा समावेश आहे.
- काही राज्य सरकारच्या बस किंवा शालेय बसला टोल भरण्यापासून सूट दिली जाईल.
- वांद्रा-वरळी सी लिंक, मुंबई-पुणे एक्सप्रेसवे, जुना मुंबई-पुणे हायवे, मुंबई नागपूर समुद्धी एक्सप्रेस वे, नागपूर इंटीग्रेटेड रोड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, सोलापूर इंटीग्रेटेड रोड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, छत्रपती संभाजी नगर इंटीग्रेटेड रोड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, काटोल बायपास या सर्व टोल नाक्यांवर तुम्हाला फास्टटॅग पद्धतीने टोल भरावा लागणार आहे.

## देशाच्या प्रगतीमध्ये पर्यटन व्यवसायाचा महत्वाचा वाटा - एग्नेलोराजेश अथायडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अर्थसंकेत 'महाराष्ट्राचा लोकप्रिय ब्रँड' पर्यटन विशेष कार्यक्रम कोहिनुर बिझनेस स्कुल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून पर्यटन संस्था यात सहभागी झाल्या होत्या. ट्युलिप हॉलिडेज,खवणे कयाक्स, दीपक वर्ल्ड व्हेकेशन्स 'मोस्ट पॉप्युलर ब्रँड' ठरले. बेसिल लीफ हॉलिडेज, जोगळेकर कॉटेज, शिवांजली हॉलिडे होम, राजगुरू टूर्स बेस्ट कस्टमर सर्व्हिस ब्रँड ठरले. ईशा टूर्स आणि फ्लाईंग कोकण मोस्ट इन्नोव्हेटिव्ह ब्रँड ठरले. 'आयकॉनिक टुरिझम ब्रँड ऑफ महाराष्ट्र' या पुरस्काराने 'वेदभुमी इको व्हिलेज'चा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्राची लोकसंख्या जवळपास १३ कोटी आहे, जगामधील अनेक देशांची लोकसंख्या इतकी नाही, त्यामुळे नुसते महाराष्ट्रात जरी पर्यटन विकासावर भर दिला, तरी खूप मोठी आर्थिक उलाढाल होऊ शकते. पर्यटनामुळे आयुष्यात बरेच काही शिकता येते. प्रवासात भेटणारी प्रत्येक व्यक्ती काही ना काही शिकवत असते. असे मत ग्लोबल सेंट अँजेलो ग्रुपचे सर्वेसर्वा एग्नेलोराजेश अथायडे यांनी मांडले. एजिलस डायग्नोस्टीक्सचे संस्थापक डॉ. अविनाश फडके हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अभिनेत्री व लेखिका व न्यूज स्टोरी टुडेच्या निर्मात्या अलका भुजबळ कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मंदार नार्वेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व रचना आर्टस् अँड क्रिएशन्सच्या संस्थापिका रचना लचके बागवे यांनी आभार प्रदर्शन केले.





अर्थसंकेतचे काम म्हणजे अप्रसिद्ध लोकांना प्रसिद्ध करणे, प्रसिद्ध लोकांना सुप्रसिद्ध करणे आणि सुप्रसिद्ध लोकांना सर्व सामान्यांसमोर आणणे हे आहे. जाहिरात, मार्केटिंग, ब्रँडिंग सातत्याने करणे गरजेचे आहे, कारण ज्यावेळेला ग्राहकाला वस्तू अथवा सेवा हवी असेल, तेव्हा आपले नाव त्याच्यासमोर येणे आवश्यक आहे.

**डॉ. अमित बागवे** अर्थसंकेतचे संस्थापक



### मुंबईनंतर पुण्यात मराठी बोलण्यावरून वाद,

**पुणे :** महाराष्ट्रात राहून मराठी भाषा बोलण्यास नकार दिल्याचा मुद्दा पुन्हा एकदा पेटलाय. एअरटेल गॅलरीमध्ये तरूणीनं दाखवलेल्या मुजोरीनंतर पुण्यातील डी मार्टमध्ये असाच काहीसा प्रकार घडला. एक माणूस मराठी बोलण्यास सांगत आहे. पण दुसरा व्यक्ती 'हिंदी ही बोलेंगे (आम्ही हिंदी भाषेतच बोलणार)' असे धमकावून सांगत आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियात प्रचंड व्हायरल होतोय. या व्हिडिओवर नेटकऱ्यांनी समिश्र प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# ट्रम्प सरकारकडून ४१ देशांवर प्रवासबंदी लागू ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमेरिका :** जगातील विविध देशांवर अतिरिक्त शुल्क लागू केल्यानंतर अमेरिकेतील ट्रम्प प्रशासन आता बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यासाठी कडक कारवाई करण्याच्या तयारीत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता ४१ देशांवर प्रवास बंदी घालण्याची तयारी करत आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ट्रम्प प्रशासन नवीन बंदी अंतर्गत डझनभर देशांच्या नागरिकांसाठी व्यापक प्रवास बंदी लागू करण्याचा विचार करत आहे, असे वृत्त रॉयटर्सने अमेरिकेतील अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिले आहे.



यासंदर्भात अमेरिका सरकारकडून एक निवेदन तयार करण्यात आले आहे. या निवेदनात एकूण ४१ देशांना तीन वेगवेगळ्या गटांमध्ये विभागण्यात आले आहे. १० देशांच्या पहिल्या गटात अफगाणिस्तान, इराण, सीरिया, क्युबा आणि उत्तर कोरिया यांचा समावेश आहे, ज्यांचे व्हिसा पूर्णपणे निलंबित केले जातील.

दुसऱ्या गटात, इरिट्रिया, हैती, लाओस, म्यानमार आणि दक्षिण सुदानसह पाच देशांना अंशतः निलंबनाचा सामना करावा लागेल, ज्यामुळे पर्यटक आणि विद्यार्थी व्हिसा तसेच काही अपवादांसह इतर स्थलांतरित व्हिसांवर परिणाम होण्याची शक्यतादेखील वर्तविली आहे.



### खुशखबर ! सुनिता विल्यम्स पृथ्वीवर परतणार ?

**स्पेन :** सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे जून 2024 पासून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अडकले आहेत. ते दोघेही बोईंगच्या स्टारलाइनरमधून आठ दिवसांच्या ISS मिशनवर गेले होते. आता सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर लवकरच पृथ्वीवर परतणार आहेत. नासा आणि स्पेसएक्सने क्रू मिशन सुरू केले आहेत. क्रू-10 मिशन अंतर्गत, चार नवीन अंतराळवीर ISS मध्ये जातील आणि क्रू-9 ची जागा घेतील.सुनिता आणि बुच या दोघांचीही पावलं लवकरचं जमिनीवर पडणार आहेत. अंतराळात अडकलेल्या सुनीता विल्यम्स आणि विल्मोरला घरी रत आणण्यासाठी नासा आणि स्पेसएक्सने त्यांचे अंतराळ यान पाठवले आहे. शुक्रवारी (स्थानिक वेळेनुसार) नासा आणि स्पेसएक्सने एक महत्त्वपूर्ण क्रू मिशन लॉन्च केले. या मिशनद्वारे अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना परत आणले जाणार आहे. त्यामुळे काहीच दिवसात ते पृथ्वीवर वापसी करतील. त्यांच्या आगमनाकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

## वेरूळ लेणीत किरणोत्सवाची पर्वणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजी नगर :** जगप्रसिद्ध वेरूळ लेणीत शनिवारी अंमळ जास्तच लोक दिसले. कारण होतं किरणोत्सवाचं . दरवर्षी एका दिवशी वेरूळ लेणीत सूर्यास्ताची किरणे तथागत गौतम बुद्धांच्या चेहऱ्यावर काही काळ स्थिरावतात. तो हा दिवस मावळत्या सूर्यकिरणांची तिरीप बुद्धांच्या चेहऱ्यावर रेंगाळताना दिसल्याने वेरूळ लेणीत पर्यटकांना किरणोत्सवाची पर्वणीच मिळाली. वेरूळच्या बुद्ध लेण्या करणाऱ्या कारागिरांनी केलेली रचना केवढी दांडगी आणि भली आहे याची अनुभूती या किरणोत्सवाने मिळाली.



वेरूळच्या दहा क्रमांकाच्या लेणीत सुरेख आणि वैशिष्ट्यपूर्ण कोरीव शिल्पामुळे तयार झालेला हा विलक्षण योग संभाजीकरांनी अनुभवला. धम्मचक्र प्रवर्तक मुद्रेतील असणाऱ्या गौतम बुद्धांच्या मूर्तीच्या एका बाजूला पद्मपाणी तर दुसऱ्या बाजूला वज्र पाणी ही बोधिसत्व आहेत. या किरणोत्सवाची पर्वणी अनेक रसिकांनी अनुभवली .



**ठाणे** धुलिवंदन सणाच्या निमित्ताने ठाणे शहरातील टेंभीनाका येथील आनंदआश्रमात जाऊन धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला वंदन करून त्यांच्या प्रतिमेस रंग लावताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे. यावेळी शिवसैनिक तसेच ठाणेकर नागरिक उपस्थित होते.

### उल्हास नदीत बुडून चार मुलांचा मृत्यू

**बदलापूर :** सर्वत्र होळीचा उत्साह आणि आनंदाचं वातावरण असताना शुक्रवारी मात्र अशा या वातावरणाला गालबोट लावणारी घटना बदलापूरमधून समोर आली. अंगाला लागलेला रंग काढण्यासाठी उल्हास नदीत उतरलेल्या चार मुलांचा बुडून मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त झाली. पाण्याचा अंदाज न आल्यानं ही दुर्घटना घडली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. आर्यन मेदर, आर्यन सिंग, सिद्धार्थ सिंग आणि ओमसिंग तोमर असे या घटनेत मृत्यू झालेल्या मुलांची नावं आहेत. हे चारही मुलं पोद्दार गृह संकुलातील रहिवासी होते. होळीनिमित्त धुळवड खेळल्यानंतर रंग काढण्यासाठी हे चारही मुलं आपल्या इतर मित्रांसोबत उल्हास नदीच्या काठावर आले. ते नदीत उतरले. मात्र त्यांना नदीच्या पाण्याचा अंदाज आला नाही. पाण्याचा अंदाज न आल्यानं बुडून त्यांचा मृत्यू झाला आहे.

# तळीरामांचा उपद्रव! अर्धा हेक्टर जंगल जळून खाक





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** बोरीवलीच्या संजय गांधी नॅशनल पार्कमध्ये होळी साजरी करण्यासाठी गेलेल्या तळीरामांनी आधी पार्टी केली नंतर जंगलालाच आग लावली. या घटनेत अर्धा हेक्टर जंगल जळून खाक झाले.नॅशनल पार्क मध्ये तळीराम सर्रासपणे येऊन कशा काय पार्ट्या झोडत आहेत ? याकडे वनविभागाचे दुर्लक्ष होताना दिसून आल्याने वन सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

मुंबईमध्ये होळीच्या दिवशी धक्कादायक घटना घडली. संजय गाधी राष्ट्रीय उद्यानातील जंगलामध्ये होळी साजरी करण्यासाठी गेलेल्या तळीरामांनी आग लावली. यामुळे अर्धा हेक्टर जंगल जळून खाक झाले. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. यासंदर्भात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानचे सुरक्षारक्षक आणि पोलिस तपास करत आहेत.

होळी साजरी करण्यासाठी मोठ्या संख्येमध्ये तळीराम संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात असलेल्या जंगलामध्ये गेले होते. दहिसर परिसरात हे तळीराम होळीनिमित्त पार्टी करत होते. होळी साजरी करत असताना चक्क या तळीरामांनी जंगलाला आग लावली. आग वाढत चालल्याचे पाहून तळीरामांनी घटनास्थळावरून पळ काढला.



### मुंबईकरांकडून संताप व्यक्त ..

- अग्निशमन दलाच्या ५ गाड्यांच्या मदतीने ही आग विझवण्याचे प्रयत्न करण्यात आले. बऱ्याच तासांच्या प्रयत्नांनंतर ही आग अटोक्यात आणण्यात यश आले. पण तोपर्यंत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानचे अर्धा हेक्टर जंगल जळून खाक झाले. घटनेमुळे मुंबईकरांनी संताप व्यक्त केला .




“रोहित शर्माकडे निवृत्तीचे कोणतेही कारण नाहीये. त्याने कोणतीही टीका सहन करण्याचे कोणतंही कारण नाही. त्याचे रेकॉर्डचं सर्व सांगतात. इतकंच नाही तर त्याने त्याचा खेळही बदलला आहे.” “तो का निवृत्त होईल? केवळ कर्णधार म्हणूनच नाही तर फलंदाज म्हणूनही त्याला अशा विक्रमासह पुढे खेळायला आवडेल. अंतिम सामन्यात ७६ धावा करून त्याने भारताला शानदार सुरुवात करून दिली आणि संघाच्या यशाचा पाया रचला आणि जेव्हा संघ दबावात तेव्हाही त्याने आघाडी घेत नेतृत्व केले.” “इतर कर्णधारांच्या तुलनेत रोहित शर्माच्या विजयाची टक्केवारी पाहिली तर ती जवळपास ७४ टक्के आहे, जी यापूर्वी होऊन गेलेल्या कोणत्याही कर्णधारापेक्षा जास्त आहे. तो असाच पुढे जात राहिला तर तो आतापर्यंतचा एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोत्तम कर्णधार असल्याचे सिद्ध होईल. रोहित शर्मा स्वत:देखील म्हणाला की तो निवृत्त होत नाहीये आणि अशा अफवा पसरवू नये.

— ए.बी.डिव्हिलियर्स

# धाराशिव, सोलापूर, सांगली, मुंबई उपनगर, रत्नागिरी, अहिल्यानगर गटात अव्वल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

## राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा



**पुणे :** हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात साखळी सामन्यात पुरुष गटात धाराशिव, सोलापूर, सांगली यांनी तर महिला गटात धाराशिव, मुंबई उपनगर व रत्नागिरी यांनी विजय मिळवत गटात अव्वल स्थान मिळवले आहे.

अहिल्यानगर शेवगाव येथे होत असलेल्या हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा खंडोबा क्रिडांगणावर सुरु आहे. महिला गटात धाराशिव संघाने छ. संभाजीनगरचा (२२-५) पराभव केला. विजयी संघातर्फे मिताली पवार (३.४० मि. संरक्षण), संध्या सुरवसे (३ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चांगला खेळ केला.

दुसऱ्या सामन्यात रत्नागिरीने जालन्याचा १२-९ गुणांनी पराभव केला. विजयी संघातर्फे रिद्धी चव्हाण (३ मि. संरक्षण व २ गुण), अपेक्षा सुतार (२ मि. संरक्षण व २ गुण), पायल पवार (१ मि संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर जालना तर्फे वैष्णवी मदन (१.१०, १.२० मि. व २ गुण), वैशाली वाघ (१.१० मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ.

तिसऱ्या सामन्यात फ गटात मुंबई संघाने सातारा संघाचा एक गुणाने (१०-९) पराभव केला. विजय संघातर्फे सेजल यादव २ मि., २.१० मि. संरक्षण व १ गुण), सिया नाईक (२ मि., २.१० मि. संरक्षण व २ गुण), रिद्धी कबीर (४ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर सातारा संघातर्फे भाग्यश्री फाले (२ मि., १.४० मि. संरक्षण व २ गुण), सलोनी भोसले (२.५० मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला.

पुरुष गटात धाराशिवने धुळ्याचा (१७-९) सहज पराभव केला. धाराशिव तर्फे हार्दा वसावे (२.२० मि., ३.३० मि. संरक्षण), विजय शिंदे १ मि. संरक्षण व ५ गुण), सचिन पवार (२.४० मि. संरक्षण व १ गुण), भगतसिंग वसावे (१.३०, १ मि. संरक्षण व १ गुण) यांनी तर धुळेकडून विकी धनगर (१ मि. संरक्षण व ४ गुण ) यांनी चांगला खेळ केला. दुसऱ्या सामन्यात सोलापूरने नंदुरबार चा एक डाव एक गुणाने (१२-११) पराभूत केले. सोलापूर कडून अजय कश्यप (३.३० मि. संरक्षण व २ गुण), जुबेर शेख (१.३० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर नंदुरबार तर्फे कैलास पटेल (१.१०, १ मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला.

### नामांकित खेळाडूंचा सहभाग

● प्रसिद्ध अल्टीमेट खो-खो स्पर्धा आणि नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या जागतिक खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघात सहभागी महाराष्ट्रातील खेळाडू प्रतीक वाईकर, प्रियांका इंगळे, सुयश गरगटे, अनिकेत पोटे, रेश्मा राठोड, अश्विनी शिंदे हे विविध संघातून या स्पर्धेत सहभागी झालेले आहेत. त्यांचा खेळ पाहण्यासाठी नगरवासियांनी खंडोबा मैदानावर यावे असे आवाहन अहमदनगर खो-खो असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे.


## नितीश रेड्डीने केली कमाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गाजवण्यासाठी तंदुरुस्त झाला आहे. सनरायझर्स हैदराबादच्या या अष्टपैलू खेळाडूचा तंदुरुस्ती अहवाल शनिवारी राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने सादर केला. नितीश रेड्डी आयपीएल २०२५ खेळण्यासाठी तंदुरुस्त असल्याचे त्यांनी म्हटले. जानेवारीत भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातल्या ट्वेंटी-२० मालिकेत झालेल्या दुखापतीनंतर रेड्डी पुनर्वसनासाठी NCA मध्ये दाखल झाला होता. आयपीएल २०२५ सुरू होण्यास आठवडा शिल्लक असताने त्याचे ताफ्यात दाखल होणे ही SRH साठी खूप मोठी गोष्ट आहे.

नितीश रेड्डीने यो यो टेस्टमध्ये १८.१ गुण कमावल्याचे आहे. विराट कोहलीपेक्षा हे गुण जास्त असल्याने नितीशचा फिटनेस किती जबरदस्त आहे, याचा अंदाज बांधता येतोय. २१ वर्षीय नितीशने आयपीएल २०२४ मध्ये SRH कडून १३ सामन्यांमध्ये ३०३ धावा केल्या होत्या. आयपीएल २०२४ पर्यंत त्याला २० लाख रुपये पगार मिळत होता, पण आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावापूर्वी SRH ने त्याला ६ कोटी रुपयांना कायम ठेवले.


## दिग्विजय, कमल, लक्ष्मण, शिवम अरोरा यांचा उपांत्य फेरीत प्रवेश





**पुणे :** पीवायसी मोतीलाल ओसवाल खुल्या स्नूकर स्पर्धेत दिग्विजय कडियन, कमल चावला, लक्ष्मण रावत, शिवम अरोरा यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. पीवायसी हिंदू जिमखाना, आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत कमल चावला याने फैजल खानचा ४-०(९७-१६, ५९-१६, ६८-३४, ५८-४६) असा एकतर्फी पराभव करून उपांत्य फेरी गाठली. लक्ष्मण रावतने हिमांशू जैनवर ४-१(५९-४१, ७७-१५, ७१-५१, ००-८४(८४), ७७-५१) असा विजय मिळवत आगेकूच केली. शिवम अरोराने सोनू मातंगचा ४-०(७१-४६, ६६-३२, ५८-२५, ७४-४६) असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. हरियाणाच्या दिग्विजय कडीयनने महेश जगदाळेचे आव्हान ४-१(८६(७८-००, ५७-६७(६७), ६९-३७, ७४(५०)-१०, ८२(६२)-३७) असे मोडीत काढले.

## चॅम्प्स करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत ५ संघ सहभागी



**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत ५ संघांनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा १२ वर्षाखालील गटात धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी मैदानावर १६ मार्च २०२५ पासून रंगणार आहे. स्पर्धेत सहारा क्रिकेट अकादमी, लाईफ फिट क्रिकेट अकादमी, पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी, एके स्पोर्टस, मोरया क्रिकेट अकादमी हे ५ संघांनी आपला सहभाग नोंदवला आहे. तसेच, ही स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेचे सामने २५ षटकांचे होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या, उपविजेत्या संघाला करंडक, पदक अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज, सर्वोत्कृष्ट गोलंदाज, मालिकावीर, सामनावीर यांना आकर्षक अशी पारितोषिके देण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धा संचालक गोविंद पवार यांनी दिली.

## सॅमसन फीट दिसतोय, पण विकेटकिपींग करणार का?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंडियन प्रिमिअर लीगच्या १८ व्या हंगामाला सुरूवात होण्यापूर्वी राजस्थान रॉयल्ससाठी एक आनंदाची बातमी आहे. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन दुखापतीतून सावरून संघात परतण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे आरआर (RR) संघाची चिंता आता मिटणार आहे. पण संजू यष्टीरक्षण करणार की नाही हे अद्याप निश्चित झालेलं नाही. त्यामुळे संघातील नव्या खेळाडूला आपले नशिब आजमावण्याची संधी मिळणार आहे.

इंग्लंडविरूद्धच्या ट्वेंटी-२० मालिकेदरम्यान त्याच्या बोटाला दुखापत झाली. त्यामुळे तो सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये उपचार घेत आहे. संजू पूर्णत: दुखापतीतून सावरला असून त्याच्या फलंदाजीच्या क्षमतेवर फिझीओ खूश आहेत. त्यामुळे लवकरच त्याला एनसीएकडून आयपीएलमध्ये खेळण्याची परवानगी देण्यात येईल.

पण संजू आयपीएलमध्ये विकेटकिपींग करणार की नाही हे अजूनही निश्चित झालेले नाही. त्याने विकेटकिंपीमध्ये कार्यक्षमता न दाखल्यास ध्रुव जुरेलवर विकेटकिपींगची जबाबदारी सोपवण्यात येईल. त्यामुळे जुरेलला आयपीएलमध्ये यष्टीरक्षण करण्याची संधी मिळू शकते. लखनौ सुपर जायंट्स संघ मात्र अजूनही चिंतेत आहे. त्यांचे तीन्ही वेगवान गोलंदाज NCA मध्ये उपचार घेत आहेत.

## टेनिस : नवीता येवले, थिया देसाई,पलक पाटील यांचा मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन महाराष्ट्रीय मंडळ टेनिस अकादमी १२ व १४ वर्षाखालील गोल्ड सिरिज टेनिस २०२५ स्पर्धेत मुलींच्या गटात नवीता येवले, पलक पाटील, थिया देसाई या खेळाडूंनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत आगेकूच केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्र मंडळ टेनिस कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत १२ वर्षाखालील मुलींच्या गटात दुसऱ्या फेरीत बिगरमानांकित नवीता येवलेने दुसऱ्या मानांकित श्रीनिधी अय्यरचा ६-२ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. थिया देसाईने तिसऱ्या मानांकित यायरा सॅमसनचा ६-२ असा पराभव केला. सहाव्या मानांकित समायरा ताम्हाणेने मनल शेखवर ६-१ असा एकतर्फी विजय मिळवला. बिगर मानांकित पलक पाटीलने सातव्या मानांकित समिका टेपणचा ६-२ असा पराभव करून आगेकूच केली.





## लक्ष्य सेनचा पराभव; भारतीय खेळाडूंचे आव्हान संपुष्टात




**नवी दिल्ली :** भारतीय संघाचे ऑल इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेतील आव्हान शुक्रवारी संपुष्टात आले. लक्ष्य सेन याचा पुरुष एकेरी विभागात, तर ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद यांचा महिला दुहेरी विभागात उपांत्यपूर्व फेरीत पराभव झाला. जागतिक क्रमवारीत १५व्या स्थानावर असलेला लक्ष्य सेन व जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानावर असलेला चीनचा ली शी फेंग यांच्यामध्ये उपांत्यपूर्व फेरीची लढत रंगली. शी फेंग याने या लढतीत जोखीम घेतली नाही. स्मॅशचे दमदार फटके मारताना त्याने लक्ष्य सेन याच्यावर वर्चस्व गाजवले. ली फेंगने २१-१० असा पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये ली फेंग याच्याकडे १८-१५ अशी आघाडी असताना लक्ष्य सेन याच्या बोटामधून रक्त वाहू लागले. थोड्या विश्रांतीनंतर खेळ सुरू झाल्यानंतर ली फेंग याने दुसरा गेम २१-१६ असा आपल्या नावावर केला व पुढल्या फेरीत प्रवेश केला. लिऊ शेंगशू व टॅन निंग या चीनच्या जोडीने ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद या जोडीवर २१-१४, २१-१० असा विजय मिळवत पुढे पाऊल टाकले. भारतीय जोडीचा ४६ मिनिटांमध्ये पराभव झाला. याआधी सात्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीने दुखापतीमुळे या स्पर्धेतून माघार घेतली. तसेच मालविका बनसोड, पी. व्ही. सिंधू यांना महिला एकेरीत, तर रोहन कपूर-ऋत्विका शिवानी यांना दुहेरीत पराभवाचा सामना करावा लागला होता. एकूणच काय तर भारतीयांकडून या स्पर्धेमध्ये निराशा झाली.

## स्पोर्ट्स मॅनियाचा मुंबई सिटी एफसीकडून पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पोर्ट्स मॅनिया टर्फवर सुरू असलेल्या एआयएफएफ सब ज्युनियर लीग २०२४-२५ च्या सामन्यात बुधवारी स्पोर्ट्स मॅनियाला मुंबई सिटी एफसीकडून पराभव लागला. त्यांचा हा पहिलाच पराभव पत्करावा लागला.

डीसोझा एफसी. आणि रिलायन्स फाउंडेशन यंग चॅम्प्सविरुद्ध पहिले दोन सामने जिंकल्यानंतर मुंबई सिटी एफसीविरुद्ध खेळताना स्पोर्ट्स मॅनियाला सातत्य राखता आले नाही आणि मुंबई सिटी एफसीने ५-० अशा फरकाने त्यांच्यावर विजय मिळवला.

दोन विजयांसह सुरुवात केल्यानंतर स्पोर्ट्स बुधवारी स्पोर्ट्स मॅनिया टर्फवर त्यांचा पहिला सामना गमावला.

मुंबई सिटीला स्वयम संतोष चुरमुरेने (२५ वा मिनिट) खाते उघडून दिले. त्यानंतर पाच मिनिटांनी हंझाला अन्सारne (३० वा मिनिट) आघाडी दुप्पट केली. त्यानंतर, मुंबई सिटीने सामन्यात वर्चस्व गाजवताना आणखी तीन गोल केले. मोहम्मद हुजैल अन्सारी (३७ व्या मिनिटाला) ३-० अशी आघाडी मिळवून दिली परंतु दुर्दैवाने कार्तिकेयने स्वयंगोल केल्याने स्पोर्ट्स मॅनिया ४-० असा पिछाडीवर पडला. उर्वरित वेळात मुंबई सिटीच्या याहा शेखने (७०+६ व्या मिनिटाला) गोल करताना संघाची ५-० अशी आघाडी पूर्ण केली.

## आयपीएल विजेता कर्णधार तामिळ सिनेमातून झळकणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** साऊथ इंडियन सिनेमाची क्रेझ सध्या सगळीकडे वाढत असताना आता एका आयपीएल विजेत्या कर्णधारालाही या इंडस्ट्रीची भुरळ पडली आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेटर आणि सनरायजर्स हैदराबादचा माजी खेळाडू असलेला डेव्हिड वॉर्नर आता साऊथ इंडियन सिनेमात पदार्पण करतोय. सोशल मीडियावर सिनेमाचं पोस्टर शेअर करत त्याने ही बातमी शेअर केली.

पुष्पा 2 फेम श्रीलीला आणि नितीन या कलाकारांची मुख्य भूमिका असलेल्या रॉबिनहूड सिनेमाची चर्चा सध्या सगळीकडे आहे. याच सिनेमातुन डेव्हिड सिनेइंडस्ट्रीत पदार्पण करत असून तो पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसणार आहे. वेंकी कुडूमुला यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे.

आक्रमक फलंदाजी आणि उत्तम नेतृत्वगुणांसाठी ओळखला जाणारा वॉर्नर आता सिनेमात कस काम करणार याकडे चाहत्यांचं लक्ष लागून राहिलं आहे. सिनेमाच्या टीमने नुकतंच सोशल मीडियावर पोस्टर शेअर करत त्याच्या पदार्पणाची बातमी सगळ्यांना सांगितली. "क्रिकेटमध्ये चमक दाखवल्यानंतर आणि स्वतःची छाप सोडल्यानंतर आता रुपेरी पडद्यावर चमकण्याची वेळ आली आहे."असं कॅप्शन त्याच्या पोस्टरला देण्यात आलं आहे.

## 'पीडीएफए लीग मध्ये राम स्पोर्टींग, पुणेरी वॉरीयर्स संघांचे सहज विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या प्रथम श्रेणी गटाच्या सामन्यात राम स्पोर्टींग संघ आणि पुणेरी वॉरीयर्स या संघांनी अनुक्रमे पुणे शहर पोलिस आणि रूपाली स्पोटर्स क्लब या संघांचा पराभव करून आगेकूच केली.

कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या प्रथम श्रेणीगटाच्या झालेल्या सामन्यामध्ये राम स्पोर्टींग अ संघाने पुणे शहर पोलिस संघाचा ५-१ असा सहज पराभव केला. सामन्याच्या पुर्वार्धात ओंकार डांगर आणि शैलेंद्र अंडे यांनी गोल नोंदवून राम स्पोर्टींग संघाला २-० अशी आघाडी मिळवून दिली. उत्तरार्धात ओंकार डांगर, मयुर चव्हाण आणि आदित्य काळे यांनी गोल नोंदवून संघाला ५-१ असा विजय मिळवून दिला. पुणे शहर पोलिस संघाकडून पियुश झांब्रे याने एक गोल केला.

पियुश कुलकर्णी याने केलेल्या हॅट्ट्रीकसह चार गोलांच्या जोरावर पुणेरी वॉरीयर्सने रूपाली स्पोटर्स क्लबचा ४-१ असा सहज पराभव केला. पियुश याने १२ व्या मिनिटाला पहिला गोल केला. पुर्वार्धात पुणेरी संघाकडे ही आघाडी कायम होती. उत्तरार्धात पियुश कुलकर्णी याने ५७, ६३ आणि ६८ व्या मिनिटाला गोल नोंदवून संघाची आघाडी ४-१ अशी वाढवली.

## मैदानावर उतरताच असा पराक्रम करणार जो...

# रहाणे पहिल्याच सामन्यात इतिहास घडवणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीग २०२५ च्या लिलावात पहिल्या फेरीत अनसोल्ड गेलेल्या अजिंक्य रहाणेला गतविजेत्या कोलकाता नाइट रायडर्सने अंतिम क्षणाला १.५० कोटींच्या मुळ रकमेत आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले. त्यानंतर कोलकाता नाइट रायडर्सने आयपीएल २०२५ साठी कर्णधारपदाची जबाबदारीही अजिंक्यच्या खांद्यावर सोपवली. केकेआरचा पहिला सामना इडन गार्डन्सवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध २२ मार्चला खेळवण्यात येणार आहे. या सामन्यासाठी मैदानावर पाऊल ठेवताच अजिंक्य रहाणे ऐतिहासिक कामगिरी नोंदवणार आहे.

अजिंक्यने यापूर्वी २०१९ मध्ये राजस्थान रॉयल्स संघांचे नेतृत्व सांभाळले होते. श्रेयस अय्यरला रिलीज केल्यानंतर गतविजेत्यांनी अजिंक्यकडे नेतृत्व सोपवले. त्यांनी वेंकटेश अय्यरसाठी २३ कोटी रक्कम मोजली होती आणि त्यालाच कर्णधार करतील अशी चर्चा होती. पण, वेंकटेश संघाचा उप कर्णधार असणार आहे.

अजिंक्य रहाणे आयपीएलमध्ये RCB विरुद्ध नाणेफेक करायला येईल, तेव्हा त्याच्या नावावर भारी विक्रम नोंदवला जाणार आहे. असा पराक्रम करणारा तो पहिला भआरतीय कर्णधार ठरणार आहे. आयपीएलमध्ये तीन वेगवेगळ्या संघाचे नेतृत्व करणारा रहाणे हा पहिला भारतीय कर्णधार ठरणार आहे. यापूर्वी त्याने रायझिंग पुण जायंट्सचे २०१७ मध्ये एका सामन्यात नेतृत्व सांभाळले होते. त्या सामन्यात स्टीव्ह स्मिथला खेळता आले नव्हते.

रहाणे २०१८ मध्ये पुन्हा राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यात पतरला आणि त्याच्याकडे कर्णधारपद सोपवले गेले. या पर्वात स्मिथवर बंदी घातली गेली होती. २०१९ मध्ये अजिंक्यकडे नेतृत्व कायम टेवले गेले, परंतु त्याला हटवले गेले. २०१९ मध्ये वर्ल्ड कपच्या तयारीसाठी स्मिथ मध्यंतरालाच आयपीएल सोडून मायदेशात परतला.

#रा